श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर

यांनीं

# हिंदू कायद्याचे निबंध

अश्विन शुद्ध १० शके १८४२ तारीख २२
माहे आक्टोबर सन १९२० इ० रोजीं
मंजूर करून प्रसिद्ध केले आहेत.

ज्ञानसागर प्रेस, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका.

## हिंदू वारशाचा निबंध.


कलम.

उद्देश.

बाब १ ली.

प्रारंभीचे नियम.

१ संज्ञा.
स्थानिक व्याप्ति.
२ सुरुवात.
देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.
३ व्याख्या.
सगोत्र.
सपिंड.
सगोत्र सपिंड.
समानोदक.
बंधु.
अप्रतिबंध वारसा.
सप्रतिबंध वारसा.
४ पिढ्या मोजण्याची रीत.

बाब २ री.

वारशाचीं सामान्य धोरणें.

५ वारशाचे संक्रमणाचे प्रसंग.

कलम
६ कोणत्या मिळकतीच्या वारसाचें संक्रमण होऊं शकेल.
७ वारसा कोणाचीही वाट पहात नाहीं.
८ वारशाचा हक्क ठरविण्याचीं सामान्य धोरणें.
९ वारशाचा वर्गवार क्रम.
१० एक वर्गाचे अभावीं दुसरा वर्ग.
११ लांबची आणि जवळची पिढी.
१२ पूर्वज आणि वंशज यांचे आणि कन्या वंशानें खंडित अखंडित पिढी वारस.
१३ स्त्रीपुरुष सावत्र आणि सावत्र सहोदर वगैरेचा वारसा.
१४ थडवार आणि व्यक्तिवार वारसा.
१५ सहभागी किंवा स्वतंत्र वारसा.
१६ अविभाज्य मिळकतीचा वारसा.

बाब ३ री.

विशिष्ट वारसा.

१७ संतानाचा सर्वांपेक्षां श्रेष्ठ हक्क.
१८ विधवेचा वारशाचा हक्क.
१९ अनेक विधवांचा एकत्र हक्क.

कलम

२० मुलीचा वारशाचा हक्क.

२१ मुलीच्या मुलाचा वारशाचा हक्क.

२२ वारशावर आईबापांचा हक्क.

२३ वारशावर सखा भाऊ आणि पुतण्या यांचा हक्क.

२४ आजीचा वारशाचा हक्क.

२५ वारशावर सख्या बहिणीचा हक्क.

### बाब ४ थी.

#### अविशिष्ट वारसा.

२६ वारशावर सगोत्र सपिंड आणि समानोदक यांचा हक्क.

२७ बंधूंचा प्रकार.

२८ सगोत्र सपिंडाची मुलगी आत्मबंधु आहे.

### बाब ५ वी.

#### वारशासंबंधी.

२९ शेवटच्या अविभक्त इसमांचा वारसा.

३० संसृष्ट इसमाच्या मिळकतीचा वारसा.

३१ संतानानंतर आईबाप आणि भाऊ यांना खालीलप्रमाणे वारसा मिळतो.

कलम.

३२ यति आणि ब्रम्हचारी यांचा वारसा.

३३ संसृष्ट कुटुंबांतील दुसरे अंगभूत नातलग

३४ शेवटचा वारस राजा.

### बाब ६ वी.

#### स्त्रीची मिळकत आणि तिचा वारसा.

३५ स्त्रीच्या मिळकतीचा प्रकार.

३६ स्त्रीधनाचे प्रकार.

३७ स्त्रीच्या इतर मिळकतीचे प्रकार.

३८ स्त्रीधनावर स्त्रीचें स्वामित्व.

३९ कुमारिकेच्या स्त्रीधनाचा वारसा.

४० शुल्केतर स्त्रीधनाचा वारसा.

४१ शुल्काचा वारसा.

४२ स्त्रीचे इतर मिळकतीचा वारसा.

४३ स्त्रीचें इतर मिळकतीवरील स्वामित्व.

४४ स्त्रीच्या इतर साधारण मिळकतींपैकीं ज्या मिळकतीवर स्त्रीचें स्वतंत्र किंवा मर्यादित स्वामित्व असेल त्यांचा वारसा.

४५ स्त्रीधनाचा वारसा सप्रतिबंध आहे.

कलम.

बाब ७ वी.

अनंश.

४६ वारशाकरितां नालायकी.
४७ अनंशाचा वारसा.
४८ संप्राप्त झालेला वारसा मागाहूनचे नालायकीमुळें गमावला जात नाहीं.
४९ नालायकी बंद झाल्याचा परिणाम.

---

# हिंदू लग्न निबंध.

उद्देश.

बाब १ ली.

प्रारंभीचे नियम.

१ संज्ञा.
स्थानिक व्याप्ति.
२ सुरवात.
देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.

बाब २ री.

कायदेशीर लग्नाचीं अवश्यक तत्वें.

३ वधुवराचा वर्ण कोणता असला पाहिजे.

कलम.

४ व्यंग अथवा वय बाध करीत नाहीं.
५ एकच सामान्य पूर्वज असलेल्या इसमामध्यें लग्न होऊं शकणार नाहीं.
६ गोत्र कोणतें असलें पाहिजे.
७ नवरा हयात असून बायकोला पुन्हां लग्न करतां येणार नाहीं.
८ कन्यादान कोण करूं शकेल.
९ लग्न केव्हां पूर्ण होतें.

बाब ३ री.

स्त्रीपुरुषांचे परस्पर हक्क.

(क) जात हक्काविषयीं.

१० लग्न झाल्यावर बायकोचा नवऱ्याबरोबर कोणत्या प्रकारचा संबंध उत्पन्न होतो.
११ नवऱ्याला बायकोबरोबर सहवास करण्याचा केव्हां हक्क आहे.

(ख) मिळकतसंबंधींचे हक्काविषयीं.

१२ नवऱ्याचा स्वतःचे मिळकतीचें स्वत्वार्पण करण्याचा हक्क.
१३ नवऱ्याच्या मिळकतींत बायकोचें स्वामित्व.

कलम.
१४ बायकोचा आपल्या नवऱ्याच्या मिळकतींत हक्क.
१५ नवऱ्याच्या मरणानंतर बायको त्याच्या मिळकतीची वारस केव्हां होऊं शकेल.
१६ कोणती मिळकत स्त्रीधन आहे.
१७ संयुक्त मिळकतींत बायकोचा हिस्सा स्त्रीधन आहे.
१८ बायकोचें स्वतंत्र स्वामित्व केव्हां आहे.
१९ नवरा बायकोच्या स्त्रीधनाचा केव्हां उपयोग करूं शकेल.
२० बायकोचें स्त्रीधन परत देण्यास नवरा केव्हां बांधला जात नाहीं.
(ग) स्त्रीपुरुषांचा कार्य-अधिकार.
२१ नवराबायको एक व्यक्ति केव्हां नसते.
२२ नवराबायकोचा मिळकतीसंबंधीं परस्पर व्यवहार.
२३ तिऱ्हाईत माणसाबरोबर व्यवहार करण्याची स्त्रीची सत्ता.
बाब ४ थी.
कर्तव्य आणि जबाबदारी.
२४ पतीचें कर्ज देण्यास स्त्री जबाबदार नसते.
कलम.
२५ स्त्रीच्या कर्जाबद्दल पति जबाबदार नाहीं.
२६ पति स्त्रीचें पालन करण्यास केव्हां बांधला जातो.
२७ स्त्रीला पतिकडून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क केव्हां नसतो.
२८ पतीच्या उत्पन्नांतून अन्नवस्त्र मागण्याचा स्त्रीला केव्हां हक्क आहे.
बाब ५ वी.
लग्नगांठीची अविच्छिन्नता.
२९ विधिपूर्वक झालेलें लग्न विच्छिन्न होत नाहीं.

## हिंदू दत्तक निबंध.

उद्देश.
बाब १ ली.
प्रारंभीचे नियम.
१ संज्ञा.
स्थानिक व्याप्ति.
२ सुरुवात.
देशाचाराला व कुळाचाराला बाध येत नाहीं.
३ व्याख्या.

कलम.

## बाब २री.

### दत्तक कोण घेऊं शकेल.

(क) सामान्य.

४ दत्तक घेण्याचा अधिकार.

५ अधिकारी पुरुष.

६ अधिकारी स्त्री.

७ विभक्त पतीच्या विधवेचा अधिकार.

८ अविभक्त पतीच्या विधवेचा अधिकार.

९ निविष्ट हक्कवाल्यांचे संमतीची जरूरी.

१० कायदेशीर संमतीची जरूरी

११ अल्पवयी विधवेला संमतीची खास जरूरी.

१२ दत्तक घेण्यास विधवेस भाग पाडतां येणार नाहीं.

१३ आईचा दत्तक घेण्याचा हक्क.

१४ अनेक सहविधवांपैकीं अधिकारी विधवा.

१५ स्त्रीचा स्वतःकरितां दत्तक घेण्याचा अधिकार.

## बाब ३री.

### दत्तक कोण देऊं शकेल.

१६ दत्तक देण्याचा अधिकार.

१७ जनक मातेचा अधिकार.

कलम.

१८ दत्तक देण्याचा अधिकार दुसऱ्यावर सोंपवितां येणार नाहीं.

१९ दत्तक केव्हां निरर्थक होतो.

## बाब ४थी.

### दत्तक कोण घेऊं शकेल.

२० दत्तक होणेची योग्यता.

२१ दत्तक होण्यास अयोग्य आहे.

२२ दत्तकाची संमति.

२३ द्व्यामुष्यायण.

## बाब ५वी.

### दत्तक कोणत्या रीतीनें होऊं शकेल.

२४ दत्तविधानासंबंधीं आवश्यक क्रिया.

## बाब ६वी.

### दत्तक झाल्यानें काय परिणाम होतात.

२५ दत्तक झाल्याचा परिणाम.

२६ दत्तकपुत्र आणि त्यानंतर जन्मलेला औरस पुत्र.

२७ दत्तक आणि अनौरस पुत्र.

२८ द्वयामुष्यायणाचे वारशाचा हक्क

कलम.
२९ द्व्यामुष्यायण आणि मागाहून जन्मलेला औरस पुत्र.
३० मिळकतीच्या झालेल्या व्यवस्थेसंबंधीं दत्तकाचा अधिकार.
३१ निविष्ट झालेल्या हक्कावर दत्तकाचा अधिकार.
३२ मृत्युपत्रानें व्यवस्था केलेल्या वडिलोपार्जित मिळकतीवर दत्तकाचा अधिकार.
३३ दत्तकाच्या संमतीनें मिळकतीची व्यवस्था करण्याबाबतचा करार.
३४ दत्तक आईचा वारशाचा हक्क.
३५ अनेक आईपैकीं दत्तक आईचा वारशाचा हक्क.

बाब ७ वी
किरकोळ.

३६ बेकायदेशीर दत्तविधानाचे परिणाम.
३७ दत्तक न घेण्याबद्दल अगर तहकूब ठेवण्याबद्दल करार.

# अविभक्त हिंदू कुटुंबाविषयीं निबंध.

कलम.
उद्देश.

बाब १ ली.
प्रारंभीचे नियम.

१ संज्ञा.
स्थानिक व्याप्ति.
२ सुरुवात.
देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.
३ व्याख्या.

बाब २ री.
अविभक्त कुटुंब.

४ अविभक्त कुटुंब.
५ सहभागीदार.
६ समाश्रित.

बाब ३ री.
सहभागीदाराची मिळकत.

७ सहभागीदाराची स्वार्जित मिळकत केव्हां मानली जाते.
८ कोणती मिळकत अविभक्त कुटुंबाची समाईक मिळकत मानली जाईल.

कलम.

९ कुटुंबाची नष्ट झालेली आणि पुन्हां प्राप्त झालेली मिळकत.

## बाब ४ थी.

**समाईक मिळकतींत सहभागीदारांचे परस्पर हक्क व जबाबदाऱ्या.**

१० सहभागीदाराचे परस्पर हक्क.

११ एखाद्या सहभागीदाराच्या मरणानंतर त्याचा हितसंबंध कोणत्या रीतीनें दुसऱ्याकडे जातो.

१२ कोणत्या प्रकारचा खर्च सहभागीदाराला समाईक मिळकतींतून मिळूं शकेल.

१३ मिळकतीच्या उपयोगासंबंधीं सहभागीदारांचा हक्क.

१४ अविभाज्य मिळकतींतून सहभागीदार आणि समाश्रित यांना मिळण्याचा हक्क आहे.

१५ सहभागीदारास हिशेब घेण्याचा किंवा हिस्सा मागण्याचा हक्क नाहीं.

१६ हिशेब मागण्याचा प्रकार.

## बाब ५ वी.

**इतर माणसासंबंधीं सहभागीदारांचे हक्क व जबाबदाऱ्या.**

१७ कर्ता कोणास ह्मणावा.

कलम.

१८ कर्त्यानें केलेल्या दावा वगैरेनें इतर सहभागीदारावर होणारा परिणाम.

१९ कोणत्या व्यवहारांनीं कुटुंबाच्या जातीवर अगर मिळकतीवर जबाबदारी पडत नाहीं.

२० सहभागीदारास कोणतीं कृत्यें करण्याचा अधिकार आहे.

२१ कोणता व्यवहार कुटुंबास केवढ्याकरितां बंधनकारक आहे.

२२ स्वत्वार्पण केलेली अगर विकलेली मिळकत कोणत्यारीतीनें प्राप्त करता येईल.

२३ सहभागीदारांचा सहभागीदारपणा हितसंबंध देऊन टाकण्यानें नष्ट होत नाहीं.

२४ सहभागीदारावर काम अगर बजावणी कोणत्यारीतीनें चालवितां येईल.

२५ कर्त्यानें केलेला करार केव्हां रद्द करता येईल.

## बाब ६ वी.

**समाश्रित इसमांचे हक्क.**

२६ अनंश केव्हां सहभागीदार होतो.

कलम.

२७ समाश्रितांचा समाईक मिळकतींतून अन्नवस्त्राचा हक्क.

२८ विधवा आणि समाश्रित यांचा सहभागीदाराच्या मरणानंतर त्याची मिळकत घेणाऱ्याकडून अन्नवस्त्राबद्दलचा हक्क.

२९ सहभागीदाराच्या विधवेला अन्नवस्त्रासाठीं निराळी नेमणूक.

३० अन्नवस्त्र मिळणारांना घरांत रहाण्याचा हक्क.

३१ अन्नवस्त्राच्या हक्कानें बोजा उत्पन्न होत नाहीं.

३२ मागाहून स्वत्वार्पण घेणारास अन्नवस्त्राचा बोजा केवळ्यापुरता बंधनकारक आहे.

३३ अन्नवस्त्राच्या हक्काचा कित्येक प्रसंगीं अबाधितपणा.

## बाब ७वी.

### वांटप.

३४ वांटप.

३५ कोणत्या प्रसंगीं कुटुंब अविभक्त राहूं शकतें.

३६ सहभागीदार विभक्त झाले असें केव्हांपासून मानतात.

३७ सहभागीदारास आपल्या हिश्शाची वांटणी करवून घेण्याचा हक्क आहे.

कलम.

३८ अज्ञान सहभागीदाराच्या तर्फे वांटप करून मागतां येत नाहीं.

३९ सहभागीदाराच्या गैरहजेरीमध्यें आणि अज्ञानपणामध्यें केलेलें वांटप.

४० वांटप न करण्याचा करार.

४१ कोणती मिळकत सहभागीदारापाशीं राहूं शकते.

४२ जात उपभोगाचे मिळकतीचें वांटप.

४३ स्वाभाविक स्वरूपामुळें अविभाज्य वस्तु

४४ वंशपरंपरेचें वतन किंवा वृत्ति यांचें वांटप कोणत्या रीतीनें करावें.

४५ येण्याचें कोणत्या रीतीनें वांटप करावें.

४६ भाग घेण्याची इच्छा न करणारे कोणत्या रीतीनें विभक्त होऊं शकतात.

४७ कोणती मिळकत वांटपाचे वेळीं दाखल करावी.

४८ वांटपाच्या दाव्यांत एकंदर समाईक मिळकत दाखल केली पाहिजे.

४९ वांटप फक्त एकवारच होतें.

कलम.

५० वांटप केव्हां रद्द होऊं शकेल.

५१ पुन्हां 'प्राप्त' झालेल्या मिळकतीचें वांटप.

५२ कोणत्या गोष्टी वांटपाचा पुरावा ह्मणून मानल्या जातात.

५३ प्रत्यक्ष मिळकतीचेच भाग पडूं शकतात.

५४ स्वतंत्र कबज्यांतील आणि सुधारलेल्या मिळकतींत सहभागीदाराचा हक्क.

५५ समाईक मिळकतींत कोणाचा किती हक्क पोंचतो.

५६ आई वगैरे स्त्रियांचा हिस्सा.

५७ अविभक्त कुटुंबाचे जबाबदारींची वांटपाचे वेळीं करण्याची व्यवस्था.

५८ वांटप झाल्यानंतर गर्भ राहून जन्मलेल्या सहभागीदाराचा हक्क.

५९ वांटपाचे वेळीं गर्भांत असलेल्या अगर परागंदा झालेल्या सहभागीदाराचा हिस्सा.

कलम.

बाब ८ वी.

संसृष्टाविषयीं.

६० संसृष्ट ह्मणजे काय.

६१ संसृष्ट इसमामध्यें फिरून वांटणी.

६२ संसृष्ट सहभागीदाराच्या मरणानंतर वारशाचा क्रम.

६३ संसृष्ट इसमाच्या पुरुष वारसाची स्थिति.

६४ संसृष्ट इसमाचे हक्क आणि कर्तव्यें.

बाब ९ वी.

किरकोळ.

६५ अविभक्तपणाचें अनुमान.

६६ सहभागीदार विभक्त असल्याचें अनुमान.

६७ अविभक्तपणाचीं अनुमानें कोणत्या रीतीनें करावीं.

६८ एकत्रपणावरून कोणतीं अनुमानें करतां येतील.

६९ परधर्म स्वीकारणारा.

## हिंदू वडिलार्जित कर्ज वारण्याच्या नियमनासंबंधीं निबंध.

कलम.

उद्देश.

### बाब १ ली.

#### प्रारंभीचे नियम.

१ संज्ञा.

स्थानिक व्याप्ति.

२ सुरुवात.

देशाचार व कुलाचार यांना बाध येत नाहीं.

३ अर्थ.

४ मयत हिंदू इसमाचा मुलगा किंवा मुलाचा मुलगा अशा नात्यामुळेंच मात्र मयताचे कर्जाबद्दल जबाबदार होणार नाहीं.

५ वारशानें मिळालेल्या मिळकतीपुरतीच जबाबदारी; आणि वाजवी रीतीनें व्यय केला नसेल तितक्यापुरती जातीनें जबाबदारी.

## हिंदू मिळकतीचे व्यवस्थेसंबंधींचा निबंध.

कलम.

उद्देश.

### बाब १ ली.

#### प्रारंभीचे नियम.

१ संज्ञा.

स्थानिक व्याप्ति.

२ सुरुवात.

देशाचार व कुलाचार यांना बाध येत नाहीं.

### बाब २ री.

#### मृत्युपत्रावरून व्यवस्था करण्याबाबत.

३ मृत्युपत्रानें मिळकतीची व्यवस्था कोण करूं शकेल.

४ कोणत्या व किती मिळकतीची मृत्युपत्रानें व्यवस्था करतां येईल.

५ मृत्युपत्रानें व्यवस्था केलेल्या मिळकतीचा कोण लाभ घेऊं शकेल.

६ शर्तीची व्यवस्था हिंदुधर्मशास्त्रास असंमत असतां कामा नये.

कलम.

७ मृत्युपत्राच्या व्यवस्थेनें मिळकत स्वामित्वरहित ठेविली जाणार नाहीं.

८ मृत्युपत्र करण्याची रीति.

९ मृत्युपत्राचा अर्थ.

### बाब ३ री.

#### स्त्रीचें स्वामित्व.

१० स्वतंत्र स्वामित्व असलेल्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा स्त्रीचा अधिकार

११ मर्यादित-स्वामित्व असलेल्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा स्त्रीचा अधिकार

१२ मर्यादित स्वामित्व असलेल्या मिळकतीच्या केलेल्या व्यवस्थेनें पडणारी जबाबदारी.

१३ मर्यादित स्वामित्व असलेल्या मिळकतीची स्त्रीनें केलेली व्यवस्था अगदीं निरर्थक नाहीं.

१४ उत्तराधिकारी यांच्या संमतीचा परिणाम.

१५ मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीविरुद्ध मिळविलेला हुकूमनामा कोणास बंधनकारक होतो.

कलम.

१६ मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीस मिळकतीचा गैरउपयोग करण्यापासून अटकाव करण्याचा उत्तराधिकाऱ्याचा अधिकार.

---

## आईबाप आणि मुलगे यांविषयींचा निबंध.

उद्देश.

### बाब १ ली.

#### प्रारंभाचे नियम.

१ संज्ञा.

स्थानिक व्याप्ति.

२ सुरवात.

देशाचार व कुलाचार यांना बाध येत नाहीं.

३ पाल्यपालक निबंधाचा अबाधितपणा.

४ व्याख्या.

५ कर्त्याच्या हक्काचा अबाधितपणा.

### बाब २ री.

#### पालकपणाविषयीं.

६ पालकपणाचा हक्क.

कलम.
७ मुलाचें पालनपोषण कोणी करावें.
८ अज्ञानास आपल्या धर्मांत वाढविण्याचा बापाचा हक्क.
९ अज्ञानाच्या शिक्षण वगैरेचा खर्च.

बाब ३ री.
मिळकतीविषयीं.

१० बाप आणि मुलगे मिळून एक अविभक्त कुटुंब.
११ कोणती मिळकत बापाची वडिलोपार्जित मानली जाते
१२ मुलगा बापाचा सहभागीदार.
१३ मुलाच्या स्वार्जित मिळकतींत बापाचा हक्क नाहीं.
१४ वडिलोपार्जित मिळकतीच्या बापानें केलेल्या वांटपाचा परिणाम.
१५ स्वतःच्या मिळकतीसंबंधीं बापाचा अधिकार.
१६ अविवाहित मुलीचा हक्क.
१७ बापाला कुटुंबाची वहिवाट करण्याचा हक्क.
१८ वडिलोपार्जित मिळकतींतून बापानें केलेलें कर्ज फेडीस पात्र आहे.

कलम.
१९ वडिलोपार्जित मिळकतीचे विक्रीस हरकत घेणाऱ्या मुलानें काय शास्त्रांत केलें पाहिजे.
२० वांटपानंतर बापाचे देण्याबद्दल मुलाची जबाबदारी.
२१ स्वार्जित मिळकतीवर बापाची सत्ता.

---

(ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालेले कायदे)

# कोल्हापूर इलाख्यांतील विवाहासंबंधीं कायदा.

उद्देश.

१ स्थानिक व्याप्ति.
२ व्याख्या.
३ विवाह कोणत्या शर्तीवर करणेचे.
४ विवाह नोंदणाराची नेमणूक.
५ कोणीतरी एक पक्षानें नोंदणारास नोटीस देणें.
६ नोटीस फैल करून नक्कल नोटीस बुकास दाखल करणें.
७ विवाहास हरकत.

कलम.
८ हरकत आलेनंतर काम चालविणेची रीत.
९ हरकतदारास दावा लावणेचा अखत्यार आहे.
१० दावा दाखल केल्याचें सर्टिफिकेट नोंदणाराचे हवालीं करणेचें.
११ हरकत सयुक्तिक नसेल तेव्हां कोर्टास दंड करण्याचा अखत्यार.
१२ उभयपक्ष व साक्षीदार यांचा इकरार.
१३ विवाह लावणेची रीति.
१४ विवाह लावणेची जागा.
१५ विवाहाचे दाखलेबुकांतील नोंदीच्या दाखले नकला दिवाण यांजकडे पाठविणें.
१६ फी.
१७ विवाहित स्त्रीनें या नियमाप्रमाणें पुनः विवाह केल्याबद्दल शिक्षा.
१८ दोन लग्नाबद्दल शिक्षा.
१९ कोल्हापूरचा डायव्होर्स आक्ट लागू असणें.
२० या नियमांतील लग्नाच्या प्रजेस कायदा लागू असणें.

कलम.
२१ या नियमाशिवाय इतरप्रकारें झालेल्या विवाहाचा बचाव.
२२ खोट्या गोष्टी असलेल्या इकरारावर अगर दाखल्यावर सही केल्याबद्दल शिक्षा.
२३ वारसाचे हक्काविषयीं.
परिशिष्ट १ लें
विवाहाची नोटीस.
परिशिष्ट २ रें.
वरानें इकरार करण्याचा तो.
नवरीनें करून देणेचा इकरारनामा.
परिशिष्ट ३ रें.
नोंदणराचा दाखला.

---

# कोल्हापूरच्या काडी मोडण्याच्या कायद्याचा हेतू व कारणें.

उद्देश.

१ संज्ञा.
२ नियमांची व्याप्ति.
३ नवऱ्यानें काडी मोडण्याकरितां केव्हां अर्ज करावा.

कलम.
७ मुलाचें पालनपोषण कोणी करावें.
८ अज्ञानास आपल्या धर्मांत वाढविण्याचा बापाचा हक्क.
९ अज्ञानाच्या शिक्षण वगैरेचा खर्च.

## बाब ३ री.

### मिळकतीविषयीं.

१० बाप आणि मुलगे मिळून एक अविभक्त कुटुंब.
११ कोणती मिळकत बापाची वडिलोपार्जित मानली जाते
१२ मुलगा बापाचा सहभागीदार.
१३ मुलाच्या स्वार्जित मिळकतींत बापाचा हक्क नाहीं.
१४ वडिलोपार्जित मिळकतीच्या बापानें केलेल्या वांटपाचा परिणाम.
१५ स्वतःच्या मिळकतीसंबंधीं बापाचा अधिकार.
१६ अविवाहित मुलींचा हक्क.
१७ बापाला कुटुंबाची वहिवाट करण्याचा हक्क.
१८ वडिलोपार्जित मिळकतींतून बापानें केलेलें कर्ज फेडीस पात्र आहे.

कलम.
१९ वडिलोपार्जित मिळकतीचे विक्रीस हरकत घेणाऱ्या मुलानें काय शाबीत केलें पाहिजे.
२० वांटणीनंतर बापाचे देण्याबद्दल मुलाची जबाबदारी.
२१ स्वार्जित मिळकतीवर बापाची सत्ता.

---

(ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालेले कायदे)

# कोल्हापूर इलाख्यांतील विवाहासंबंधीं कायदा.

उद्देश.

१ स्थानिक व्याप्ति.
२ व्याख्या.
३ विवाह कोणत्या शर्तीवर करणेचे.
४ विवाह नोंदणाराची नेमणूक.
५ कोणीतरी एक पक्षानें नोंदणारास नोटीस देणें.
६ नोटीस फैल करून नक्कल नोटीस बुकास दाखल करणें.
७ विवाहास हरकत.

कलम.

८ हरकत आलेनंतर काम चालविणेची रीत.

९ हरकतदारास दावा लावणेचा अखत्यार आहे.

१० दावा दाखल केल्याचें सर्टिफिकेट नोंदणाराचे हवालीं करणेचें.

११ हरकत सयुक्तिक नसेल तेव्हां कोर्टास दंड करण्याचा अखत्यार.

१२ उभयपक्ष व साक्षीदार यांचा इकरार.

१३ विवाह लावणेची रीति.

१४ विवाह लावणेची जागा.

१५ विवाहाचे दाखलेबुकांतील नोंदीच्या दाखले नकला दिवाण यांजकडे पाठविणें.

१६ फी.

१७ विवाहित स्त्रीनें या नियमाप्रमाणें पुनः विवाह केल्याबद्दल शिक्षा.

१८ दोन लग्नाबद्दल शिक्षा.

१९ कोल्हापूरचा डायव्होर्स आक्ट लागू असणें.

२० या नियमांतील लग्नाच्या प्रजेस कायदा लागू असणें.

कलम.

२१ या नियमाशिवाय इतरप्रकार झालेल्या विवाहाचा बचाव.

२२ खोट्या गोष्टी असलेल्या इकरारावर अगर दाखल्यावर सही केल्याबद्दल शिक्षा.

२३ वारसाचे हक्काविषयीं.

परिशिष्ट १ लें.

विवाहाची नोटीस.

परिशिष्ट २ रें.

वरानें इकरार करण्याचा तो.

नवरीनें करून देणेचा इकरारनामा.

परिशिष्ट ३ रें.

नोंदणराचा दाखला.

---

# कोल्हापूरच्या काडी मोडण्याच्या कायद्याचा हेतू व कारणें.

उद्देश.

१ संज्ञा.

२ नियमांची व्याप्ति.

३ नवऱ्यानें काडी मोडण्याकरितां केव्हां अर्ज करावा.

कलम
४ बायकोनें काडी मोडण्याकरितां केव्हां अर्ज करावा.
५ संगनमत केल्याबद्दल कोर्टाची खात्री होणें.
६ अर्ज काढून टाकणें.
७ काडी मोडून देण्याचा हुकूमनामा देण्याचा कोर्टाचा अधिकार.
८ वैवाहिक हक्क प्रस्थापित करण्याचा हुकूमनामा.
९ कोणती गोष्ट तक्रारींत मांडतां येणार नाहीं.
१० विवाह रद्द करणें.
११ जारकर्म करणाऱ्या मनुष्यापासून नवऱ्यानें नुकसानी मागावी.
१२ खर्च देण्याबद्दल जारास हुकूम करण्याचा अधिकार.
१३ काम चालू असतांना अन्नवस्त्र खर्च.
१४ कायमचा अन्नवस्त्र खर्च देण्याचा हुकूम देण्याचा अधिकार.
१५ अन्नवस्त्र खर्च बायकोला अगर तिच्या ट्रस्टीला देण्याचा कोर्टानें हुकूम करावा.
कलम.
१६ नवऱ्याच्या व मुलाच्या फायद्याकरितां बायकोची इस्टेट लावून हुकूम देण्याचा अधिकार.
१७ नुकसानी ठरविणें.
१८ वेडे अगर अज्ञान यांचे तर्फे दावे.
१९ समन्साची वगैरे बजावणी.
२० पुरावा घेण्याची पद्धत.
२१ क्रूरपणा अगर परित्याग केल्याचा पुरावा देण्याची नवराबायकोची पात्रता
२२ दरवाजे बंद करणेचा अधिकार.
२३ तहकुबीचा अधिकार.
२४ हुकमाची व हुकूमनाम्याची बजावणी व त्यावरील अपिलें.
२५ संमतीचा हुकूमनामा.
२६ काडी मोडण्याचा अंमल केव्हां होणेचा आहे.
२७ चालीरीति बेकायदेशीर आहेत.
२८ नियमांत फेरबदल करण्याचा अखत्यार.

## स्त्रियांना क्रूरपणानें वागविणेचें नाहींसें करावें किंवा त्यांस प्रतिबंध करावा ह्मणून केलेले नियम.

कलम.

### बाब १ ली.

प्रस्तावना.

उद्देश.

१ नांव, आरंभ, आणि व्याप्ति.

२ अर्थाचे कलम.

### बाब २ री.

३ साधारण अपवाद.

### बाब ३ री.

४ या नियमाखालील अपराध.

५ अधिक शिक्षा.

६ इं० पि० कोडांतील कलमें लागू आहेत.

### बाब ४ थी.

७ कोर्ट व प्रोसीजर.

८ कोणत्या कायद्याप्रमाणें अपराध घडला याबद्दल शंका येईल तेव्हां कसें करणेचें.

९ गुन्हा जामिनाचा वगैरे असल्याबद्दल..

कलम.

१० आरोपीची हमी व फिर्याद निकालांत टाकणें.

११ क्रि० प्रो० कोडाचीं कलमें कोणत्याप्रकारें लागू आहेत.

---

## अनौरस संतति व जोगतिणीसंबंधीं कायदा.

उद्देश.

संज्ञा.

स्थानिक व्याप्ति.

व्याख्या.

मागील नियमावरील परिणाम.

### कलम १ लें.

हिंदु हिंदूमध्यें फरक केला जाणार नाहीं.

### कलम २ रें.

जोगतीणी वगैरेचा कोणता दर्जा व हक्क मान्य केला जाणार नाहीं.

# हिंदू वारशाचा निबंध.

उद्देश — हिंदुधर्मशास्त्रांतील वारशासंबंधीं मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा केला आहे:—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

१. संज्ञा. (१) या निबंधाला "हिंदू वारशाचा निबंध" ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति. (२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

२. सुरुवात. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं. (२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यामध्यें वारशासंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतीरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेट-मध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ यानें अगर इतर कोणत्याहि नियमानें कोणत्याहिप्रकारें बाध येणार नाहीं.

३. विषयावरून अगर पूर्वापार संबंधावरून निराळा अर्थ कर-
व्याख्या. ण्याचा हेतु दिसत नसेल तर या निबंधांत वापर-
लेल्या खालील शब्दांचा अर्थ खालीं लिहिल्या-
प्रमाणें समजावा.

(क) "सगोत्र" ह्मणजे एकाच सामान्य मूळ वडिलापासून
"सगोत्र." फक्त पुरुषांनीं बनलेल्या अखंड रेषेनें आलेले
असतील असे वंशज.

## उदाहरण.

कोणीही इसम आपला नातू, आजा, भाऊ, पुतण्या, काकाचा मुलगा, वगैरे पितृव्य यांजबरोबर सगोत्राचें नातें धारण करतो.

(ख) "सपिंड" ह्मणजे

सपिंड. (१) आपल्या बापाच्या बाजूनें मोजलें असतां
आपल्या पूर्वींच्या सात पिढ्यांमधील, अगर

(२) आपल्या आईच्या बाजूनें मोजलें असतां
आपल्या पूर्वींच्या पांच पिढ्यांमधील,

एकच सामान्य मूळ वडिलापासून झालेले असतील असे वंशज.

(ग) "सगोत्र सपिंड" ह्मणजे

सगोत्र सपिंड (१) मयताचे

(अ) आपल्यानंतरचे सात पिढयांपर्यंतचे पुरुषवंशज.

(आ) आपल्या पूर्वीचे सात पिढयांपर्यंतचे पुरुषपूर्वज.

(२) मयताचे पूर्वींच्या सात पिढयांपर्यंतचे पुरुष-
पूर्वजांपैकीं प्रत्येक वडिलापासून सात पिढयां-
मध्यें झालेले पितृव्य पुरुषवंशज आणि

(३) पोटकलम ग मधील १ आणि २ यांत सांगि-
तलेल्या इसमांच्या बायका.

(घ) "समानोदक" ह्मणजे

समानोदक. (१) मयत इसमापासून मोजतां सातव्या पिढीपासून तेरा पिढीपर्यंतचे पुरुष.

(अ) वंशज आणि

(आ) पूर्वज.

(२) मयत इसमापासून मोजतां सातव्या पिढीपासून तेराव्या पिढीपर्यंतचे पुरुषपूर्वजांपैकीं प्रत्येक वडिलापासून सात पिढ्यांमध्यें झालेले पितृव्य पुरुषवंशज.

(३) मयत इसमाच्या पहिल्या सात पिढ्यांचे पुरुष पूर्वजांपैकीं प्रत्येक वडिलांचे सात ते तेरा पिढ्यांमध्यें झालेले पितृव्य पुरुषवंशज. आणि

(४) पोटकलम घ मधील (१), (२), व (३) यांमध्यें सांगितलेल्या इसमांच्या बायका.

(ङ) "बंधु" अथवा भिन्न गोत्र सपिंड ह्मणजे जे सगोत्र बंधु. नाहींत असे

(१) आपल्या

(अ बापाच्या बाजूचें किंवा

(आ) आईच्या बाजूचें अथवा

(२) आपल्या बापाच्या आईच्या बाजूचें

अथवा

(३) आपल्या आईचे आईच्या बाजूचें,

सपिंड नातें धारण करीत असतील ते.

## उदाहरण.

मुलाची मुलगी, पुतणी, भाचा, मामा, आते, आतेच्या मुलीचा

मुलगा, बापाच्या मामाचा मुलगा, आईच्या मावशीचा मुलगा, यांस बंधु ह्मणतात.

अप्रतिबंध वारसा.

(च) "अप्रतिबंध वारसा" ह्मणजे केवळ जन्म झाल्यामुळेंच पित्याच्या दायधनामध्यें हक्क प्राप्त होतो तो, आणि.

सप्रतिबंध वारसा.

(छ) "सप्रतिबंध वारसा" ह्मणजे कांहीं अमूक एक गोष्ट घडेल तेव्हांच सुरू होऊन अमलांत येऊं शकेल असा अवलंबून राहिलेला वारसा.

पिढ्या मोजण्याची रीत.

४. (१) सरळ रेषेमध्यें उतरती अगर चढती पिढी मोजण्यांत ज्या इसमापासून पिढी मोजावयाची असेल त्यास सोडून देऊन त्याचेनंतरचे वंशज अगर त्याचे आधींचे पूर्वज यांपैकीं जो पहिला येईल त्याजपासून अनुक्रमें एक, दोन याप्रमाणें पिढी मोजली पाहिजे.

(२) बाजूच्या आडव्या रेषेनें पिढी मोजण्यांत ज्या इसमाची पिढी मोजावयाची असेल त्यास सोडून देऊन सामान्य मूळ पुरुषापर्यंत चढती पिढी मोजून तेथपासून ज्या इसमाचें नातें पाहावयाचें असेल तेथपर्यंत उतरती पिढी चालू अनुक्रमानें मोजावी. मात्र शेंड्यावरील सामान्य मूळ पुरुषास एकच वेळ मोजलें पाहिजे.

## उदाहरणें.

१ भाऊ हा दुसऱ्या पिढीचा सगोत्र–सपिंड होतो.

२ पुतण्या आणि काका हे तिसऱ्या पिढीचे सगोत्र सपिंड होतात.

३ बापाची आते आणि मावशीचा मुलगा चौथ्या पिढीचे बंधु होतात.

४ बापाच्या मामाची मुलगी आणि आईच्या आतेचा मुलगा पांचव्या पिढीचे बंधु होतात.

# बाब २ री.

## वारशाची सामान्य धोरणें.

५. जेव्हां एखादा इसम

वारशाचे संक्रमणाचे प्रसंग.

(क) मरण पावेल अथवा

(ख) संन्यास घेऊन संसारांतून विरक्त होईल,

तेव्हां त्याचे मिळकतीचा वारसा संक्रमण होण्याचा प्रसंग आला आहे असें मानतात.

६. वारशाचा हक्क फक्त

कोणत्या मिळकतांच्या वारशाचें संक्रमण होऊं शकेल

(क) विभक्त झालेल्या इसमाची,

(ख) कोणत्याही इसमाची स्वसंपादित, किंवा

(ग) संसृष्ट झालेल्या इसमाची,

मिळकत मृत्युपत्रावरून व्यवस्था झाल्याशिवाय राहिली असेल तिला लागूं होतो.

वारसा कोणाचीहि वाट पाहात नाहीं.

७. वारसा येतो त्यावेळीं जे इसम हयात असतील त्यांपैकीं श्रेष्ठ हक्कदारांना वारसा प्राप्त होतो. जन्मास न आलेल्या वारसांची वाट पाहातां येणार नाहीं.

**खुलासा :**—वारसा उतरण्याच्या वेळेस जें मूल गर्भस्थ असेल तें वारशाच्या कारणांसाठीं जन्मलेलेंच आहे असें मानावें.

वारशाचा हक्क ठरविण्याची सामान्य धोरणें.

८. (क) विशिष्ट वारशाचा, आणि

(ख) स्त्रीधन अगर स्त्रीची इतर मिळकत यांचा,

वारशाचे ठरावास पात्र राहून वारशाचे श्रेष्ठ हक्काचा निर्णय या बाबींत दिलेल्या सामान्य धोरणांस अनुसरून करावा.

वारशाचा वर्गवार क्रम.

९. वारशाचा हक्क, प्रथम

(क) सगोत्र सपिंडांना, त्यानंतर

(ख) समानोदक यांना, आणि त्यानंतर

(ग) बंधूंना

प्राप्त होतो.

एक वर्गाचे अभावीं दुसरा वर्ग.

१०. या निबंधांत अन्य रीतीनें ठरविलें नसेल तर निरनिराळे वर्गाचे किंवा पिढीचे वारस एकमेकांबरोबर वारसा घेऊं शकत नाहींत; परंतु प्रथमचा वर्ग किंवा पिढी यांतील वारसांच्या अभावीं मात्र नंतरचा वर्ग किंवा पिढी यांतील इसमास वारसाची पाळी येऊं शकते.

लांबची आणि जवळची पिढी, आणि सारख्या पिढींतील नातलगांचा हक्क.

११. (१) इतर सर्व तऱ्हेनें सारख्या दर्जाच्या वारसांपैकीं जे जास्त नजीकच्या पिढींतील नातलग असतील ते दूरच्या पिढींतील नातलगाच्या अगोदर प्रथम वारसा घेतात.

(२) एकसारख्या हक्काचे अनेक वारस असतील तेव्हां या निबंधांत अन्य रीतीनें ठरविलें नसेल तर वारसा घेणाऱ्या इसमांना सारखा भाग मिळूं शकेल असा आणि इतका वारसाचा भाग करून प्रत्येक इसमास एक एक भाग द्यावा.

पूर्वज आणि वंशज यांचे आणि कन्या वंशानें खंडित अखंडित पिढी वारस.

१२. इतर सर्व तऱ्हेनें सारख्या दर्जाच्या वारसांपैकीं

(क) पूर्वज आणि त्यांचे पिढींतील वारस यापेक्षां वंशज आणि त्यांचे पिढींतील वारस यांचा, आणि

(ख) ज्या पिढीचे रेषेंत सुरवातीपासून पुरुषवंश कन्यावंशानें तुटला असेल त्यांचेपेक्षां ज्या पिढीची रेषा

अधिक लांबवर अखंडित चालली असेल त्या पिढीच्या वारसांचा,

श्रेष्ठ हक्क मानला जातो.

## उदाहरणें.

१ मुलाचे मुलीचा मुलगा भाच्यापेक्षां श्रेष्ठ हक्कवाला बंधु आहे.

२ नातवाचे मुलीचा मुलगा मुलीच्या नातवापेक्षां श्रेष्ठ हक्कवाला बंधु आहे.

३ पुतणीचा मुलगा हा मुलीच्या मुलीच्या मुलग्यापेक्षां श्रेष्ठ हक्कवाला बंधु आहे.

स्त्री, पुरुष, सावत्र आणि सावत्र सहोदर, वगैरेंचा वारसा.

१३. एकच पिढीच्या किंवा वर्गाच्या वारसांपैकीं

(क) स्त्रीपेक्षां पुरुषाचा,

(ख) कलम २६ यांतील पोटकलम २ यांतील ठरावास पात्र राहून सावत्रांपेक्षां सहोदर नातलगांचा, आणि

(ग) केवळ आईचे बाजूच्या नातलगांपेक्षां एकट्या बापाचे बाजूच्या नातलगांचा,

वारशाचा हक्क श्रेष्ठ मानला जातो.

थडवार आणि व्यक्तिवार वारसा.

१४ सप्रतिबंध वारसा घेणारांपैकीं

(क) ज्या इसमानें वारसा

(१) घेतला नसेल, किंवा

(२) घेऊं शकत नसेल,

त्याचे मार्फत त्याचा प्रतिनिधि ह्मणून कोणताही इसम वारसा घेऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणे

(ख) जे इसम

(३) अमुक थडाचे प्रतिनिधी या नात्यानें त्याचे मार्फत वारसाचा हक्क करीत असतील ते थडवार, आणि

(४) जे मयताबरोबर आपल्या स्वतःच्या नात्यानें वारसाचा हक्क करीत असतील ते व्यक्तिवार,

वारशाचा भाग घेऊं शकतात.

## उदाहरणें.

(क) आपल्या पाठीमागें आपला वारस ह्मणून आपला पुतण्या ब यास ठेवून अ मयत झाला. अ बरोबर ब आपल्या स्वतःच्या नात्यांवरून वारसाचा हक्क करीत असल्यामुळें तो अचा वारसा व्यक्तिवार घेतो.

(ख) वरील दृष्टांतांत ब हा अचा पुतण्या नसतां काकाचा मुलगा असेल आणि तो अचा वारस असेल तर तोही आपल्या स्वतःच्या नात्यांवरून अचा वारसा व्यक्तिवार घेतो.

सहभागी किंवा स्वतंत्र वारसा.

१५. या निबंधांत अन्य तऱ्हेनें ठरविलें नसेल, तर—

(क) अप्रतिबंध वारसा घेणारे इसम सहभागीदार ह्मणून, आणि

(ख) सप्रतिबंध वारसा घेणारे आपापली स्वतंत्र मिळकत ह्मणून, वारसा घेतात.

अविभाज्य मिळकतीचा वारसा.

१६. मिळकत अविभाज्य असेल आणि वारसा एकमेकांबरोबर अनेक इसमांकडे आला असेल तेव्हां त्यांपैकीं सर्वांत वडील इसमालाच त्या वारशावर हक्क प्राप्त होतो.

# बाब ३ री.

## विशिष्ट वारसा.

संतानाचा सर्वांपेक्षां श्रेष्ठ हक्क आहे.

१७. (१) मयत इसमाच्या संतानाचा वारशावर सर्वांत श्रेष्ठ हक्क आहे.

खुलासा:—संतान ह्मणजे मयताचा मुलगा, नातू आणि पणतु.

(२) मात्र संतानाचा वारसा अप्रतिबंध मानला आहे.

(३) अनेक संतान असतील तर ते एकमेकांबरोबर सहभागिदार ह्मणून वारसा घेतात. आणि वांटणीचे वेळीं थडवार सारखा भाग करून त्यांस त्यांचा भाग दिला पाहिजे.

(४) मिळकत अविभाज्य असेल आणि कुटुंबांत वडिलकीचा रिवाज शाबीत होईल तर सर्वांत वडील पुत्राला वारसा मिळतो.

(५) दत्तक पुत्राला वारशाचा हक्क दत्तक निबंधांत सांगितल्याप्रमाणें मिळेल.

विधवेचा वारसाचा हक्क.

१८. (१) मयत इसमास संतान नसेल तर त्याचे विधवेस वारसा मिळतो.

(२) जर अनेक विधवा असतील तर त्या सहभागीदार म्हणून एकमेकींबरोबर एकत्र वारसा घेतात.

(३) अविभाज्य मिळकत असेल तर त्यांमध्यें सर्वांत प्रथम लग्न झालेल्या विधवेला ती प्राप्त होते.

(४) जर नवरा मयत होणेपूर्वी विधवा व्यभिचारणी झाली असेल तर तिचा नवऱ्याचे इस्टेटीवरचा वारसाहक्क नष्ट होतो.

अनेक विधवांचा एकत्र हक्क.

१९. अनेक विधवांस एकमेकींबरोबर प्राप्त झालेली वारसाची स्थावर अगर जंगम मिळकत यांत त्या

(क) आपआपसांतील समजुतीनें, अगर

(ख) न्यायाधिशाच्या हुकूमनाम्यावरून,

विभाग पाडूं शकतील.

मुलीचा वारशाचा हक्क

२०. (१) मयत इसमास विधवा नसेल तर त्याचे मुलीला वारसा मिळतो.

(२) मुलींमध्यें

(क) विवाहितापेक्षां अविवाहित मुलीचा, आणि

(ख) विवाहित मुलींमध्यें श्रीमंत मुलीपेक्षां गरीब मुलीचा, आणि

(ग) अविभाज्य मिळकत असेल तर कलम (क) आणि (ख) यांतील ठरावास पात्र राहून त्या वर्गामध्यें ज्येष्ठ मुलीचा,

हक्क श्रेष्ठ मानला जातो.

मुलीच्या मुलाचा वारशाचा हक्क.

२१. (१) मयत इसमाचे मुलीचे अभावीं त्याचे मुलीचे मुलास वारसा मिळतो.

(२) एकाच मुलीपासून अगर निरनिराळ्या मुलींपासून झालेले नातू आपआपला स्वतंत्र व्यक्तीवार वारसा घेतात.

वारशावर आई-बापांचा हक्क.

२२. (१) मयत इसमाच्या मुलीच्या मुलाचे अभावीं त्याच्या सख्या आईला वारसा मिळतो.

(२) आईच्या अभावीं बापाला वारसा मिळतो.

(३) सावत्र आईला मात्र सगोत्र सपिंड म्हणून वारसा मिळूं शकतो.

वारशावर सखा भाऊ आणि पुतण्या यांचा हक्क.

२३. (क) मयत इसमाचे बापाचे अभावीं त्याचे सख्या भावाला आणि नंतर सावत्र भावाला वारसा मिळतो.

(ख) वरील दोघांचे अभावीं सख्या भावाचे मुलाला वारसा मिळतो व त्याचे अभावीं सावत्र भावाचे मुलाला वारसा मिळतो.

आजीचा वारशाचा हक्क.

२४. मयत इसमाचे पुतण्याचे अभावीं त्याचे बापाच्या आईला वारसा मिळतो.

वारशावर सख्या बहिणीचा हक्क.

२५. मयत इसमाचे बापाच्या आईच्या अभावीं त्याचे सख्खे बहिणीस वारसा मिळतो. तिचे अभावीं सावत्र बहिणीला वारसा मिळतो.

---

# बाब ४ थी.

## अविशिष्ठ वारसा.

वारशावर सगोत्र, सपिंड आणि समानोदक यांचा हक्क.

२६. (१) मयत इसमाचे सख्या बहिणीच्या अभावीं,

(क) त्याच्या सगोत्र सपिंडांना, आणि त्यानंतर

(ख) त्याच्या समानोदकांना,

बाब नंबर २ यांतील ठरावास अनुसरून वारसा मिळतो.

(२) सगोत्र सपिंड, आणि समानोदक यांमध्यें सहोदर सावत्र हा भेद मानला जात नाहीं.

(३) (ग) सगोत्र सपिंडाची, अगर

(घ) समानोदकाची,

विधवा आपल्या नवऱ्याच्या जागीं मानली जाते. आणि आपल्या इतक्याच दूरच्या पिढीच्या नातलगांपैकीं अनुक्रमें एखादा पुरुष सगोत्र सपिंड अगर पुरुष समानोदक यांचे अभावीं वारशाची हक्कदारीण मानली जाते.

बंधूंचा प्रकार. २७. बंधूमध्यें वारशाचे हक्काचा क्रम खालीं लिहिल्याप्रमाणें मोजण्यांत येईल:—

प्रथम

(क) आत्मबंधु,

१ बापाच्या बाजूचे, नंतर,

२ आईच्या बाजूचे त्यानंतर,

(ख) पितृबंधु आणि शेवटीं,

(ग) मातृबंधु.

## उदाहरणें.

(१) आतेचा मुलगा बापाच्या बाजूचा आत्मबंधु आहे.

(२) मामाचा मुलगा, मावशीचा मुलगा हे आईच्या बाजूचे आत्मबंधु आहेत.

(३) बापाच्या मामाचा मुलगा, आणि बापाचे मावशीचा मुलगा हे पितृबंधु आहेत.

(४) आईच्या मामाचा मुलगा, व आईच्या मावशीचा मुलगा हे मातृबंधु आहेत.

सगोत्र सपिंडाची मुलगी आत्मबंधु आहे. २८. (१) सगोत्र सपिंडाची मुलगी आणि तिचा मुलगा, नातू आणि मुलीचा मुलगा हे बंधु होत असतील तर ते मयताच्या बापाच्या बाजूचे आत्मबंधु मानले जातात.

(२) आईचा बाप आणि त्याचे पूर्वज आणि वंशज आणि त्यांची मुलगी आणि त्या मुलीचा मुलगा, नातू आणि मुलीचा मुलगा बंधु होत असतील तर ते मयताच्या आईच्या बाजूचे आत्मबंधु मानले जातात.

### उदाहरणें.

१ बापाची आते, बापाच्या आतेचा मुलगा, काकाची मुलगी, काकाच्या मुलीचा नातू, पुतणीच्या मुलीचा मुलगा हे बापाच्या बाजूचे आत्मबंधु आहेत.

२ मामाची मुलगी, आणि मामाच्या मुलीच्या मुलीचा मुलगा, मावशी, मावशीचा नातू, आईचा काका आणि आईच्या काकाचे मुलीचा मुलगा, आईची आते, आणि आईच्या आतेचा नातू हे आईच्या बाजूचे आत्मबंधु आहेत.

---

## बाब ५ वी.

### वारशासंबंधीं.

शेवटच्या अविभक्त इसमाचा वारसा.

२९. (१) अविभक्त कुटुंबांतील सहभागीदारांपैकीं जो शेवटीं एकटाच जिवंत राहिला असेल त्या इसमाच्या मिळकतीचा वारसा जणूं काय तो विभक्त झालेलाच आहे याप्रमाणें जाईल.

(२) अशा प्रसंगीं जर प्रथम मरण पावलेल्या सहभागिदाराच्या विधवा हयात असतील तर त्यास कलम २६ पोट कलम ३ अन्वयें वारसा मिळूं शकत नसेल तर मात्र अन्नवस्त्राचा हक्क राहील.

संसृष्ट इसमाच्या मिळकतीचा वारसा.

३०. (१) जेव्हां एखादा सहभागीदार एकवार विभक्त झाल्यावर फिरून एकत्र होईल तेव्हां त्याला संसृष्ट झाला आहे असें ह्मणण्यांत येतें.

(२) संसृष्ट झालेल्या इसमाचा वारसा प्रथम तो जणूं काय विभक्तच आहे, असें मानून त्याप्रमाणें त्याचे संततीकडे जातो.

(३) संततीपैकीं जे संसृष्ट झाले असतील त्यास विभक्त संततीच्या अगोदर वारसा मिळतो.

संतानानंतर आई-बाप आणि भाऊ यांना खालीलप्रमाणें वारसा मिळतो.

३१. (१) संसृष्ट झालेल्या इसमाच्या संतानाचे अभावीं संसृष्ट झालेल्या सहभागीदाराचा वारसा दुसऱ्या संसृष्ट भागीदारांना खालीलप्रमाणें मिळतो.

(२) संतानाचे अभावीं संसृष्ट सहोदर भावाला व संसृष्ट सहोदर भावाचे अभावीं संसृष्ट सावत्र भाऊ व असंसृष्ट (विभक्त) सहोदर भाऊ या दोघांना मिळून मिळतो.

(३) संसृष्ट सहोदरादियांच्या अभावीं संसृष्ट आईला वारसा मिळतो. नंतर संसृष्ट बापाला वारसा मिळतो.

यति आणि ब्रह्मचारी यांचा वारसा.

३२. विशेष रिवाजाला पात्र राहून

(क) यतीचा वारसा त्याच्या शिष्याकडे, आणि

(ख) ब्रह्मचाऱ्यांचा वारसा त्यांच्या गुरुकडे,

जातो

संसृष्ट कुटुंबांतील दुसरे अंगभूत नातलग

३३. (१) कलम २९, ३०, आणि ३१ यांत सांगितलेल्या कोणत्याही नातलगांच्या अभावीं

(क) जो कोणी सहभागीदार मयताबरोबर संसृष्ट होऊन रहात असेल त्याजकडे,

(ख) अशा इसमाच्या अभावीं मयताच्या विधवेकडे, आणि

(ग) मयताच्या विधवेच्या अभावीं मयताच्या मुलीकडे,

मयताच्या मिळकतीचा वारसा जातो.

(२) कलम २९, ३०, ३१ आणि ३३ पोट कलम १ रकम (क) यांत सांगितलेले वारस असतील तर मयताच्या विधवेस आणि लग्न होईपर्यंत त्याचे मुलीस मात्र अन्न-वस्त्र मिळण्याचा हक्क आहे.

शेवटचा वारस राजा.

३४. बाब २, ३, ४, आणि ५ यांत सांगितलेला कोणताही वारस मागें ठेवल्याशिवाय एखादा इसम मरण पावेल तेव्हां, त्याचे निवारशी मिळकतीचा वारसा श्रीमंत छत्रपति सरकारास प्राप्त होतो.

---

# बाब ६ वी.

## स्त्रीची मिळकत आणि तिचा वारसा.

स्त्रीच्या मिळकतीचे प्रकार.

३५. स्त्रीची मिळकत दोन प्रकारची असते.

(क) स्त्रीधन अगर स्त्रीची खास मिळकत, आणि

(ख) त्याशिवायची स्त्रीची इतर साधारण मिळकत

स्त्रीधनाचे प्रकार.

३६. स्त्रीधनामध्यें खालीं लिहिलेल्या प्रकारच्या मिळकतीचा समावेश होतो:—

(क) यौतक; ह्मणजे लग्नाचे वेळीं लग्ननिमित्त कन्येला कोणत्याही इसमाकडून मिळालेली मिळकत; आणि त्यांत

(१) विवाह होम होते वेळीं अग्निसमोर जें कांहीं मिळालें असेल त्या अध्यग्नी स्त्रीधनाचा,

(२) सासरीं पाठविण्याचे वेळीं अगर माहेरीं आणण्याचे वेळीं अहेरादाखल, अगर दुसऱ्या रीतीनें जें कांहीं मिळालें असेल त्या अध्यावाहनिक स्त्रीधनाचा, आणि

(३) नवऱ्याकडून, अगर कन्यादान झाल्यावर कन्येचे आई-बाप, भाऊ, वगैरे माहेरच्या नातलगांकडून, त्याच-प्रमाणें सासरीं आल्यावर सासू, सासरा, वगैरे यांना नमस्कार करतेवेळीं सासऱ्याकडून, जें मिळालें असेल त्या प्रीतिदत्त अगर परिणय स्त्रीधनाचा,

समावेश होतो.

(ख) अयौतक; ह्मणजे लग्नापूर्वी अगर लग्नानंतर विवाहित स्थितिमध्यें मिळालेली मिळकत, आणि त्यांत

(४) लग्नानंतर नवऱ्याचे कुटुंबांतून जें कांहीं मिळालें असेल अशा अन्वाधेय स्त्रीधनाचा,

(५) लग्न झालेल्या अगर लग्न न झालेल्या, स्त्रीला सासऱ्याकडून अगर माहेरच्या आईबाप, भाऊ अगर इतर नातलगांकडून जें कांहीं मिळेल अशा सौदा-इक स्त्रीधनाचा,

(६) एका नंतर दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करतेवेळीं पहिल्या स्त्रीचें मन वळविण्याकरतां जें कांहीं दिलें असेल अशा अधिवेदनिक स्त्रीधनाचा, आणि

(७) अन्नवस्त्राबद्दल जें कांहीं मिळालें असेल त्या वृत्तीचा,

समावेश होतो.

(ग) शुल्क; ह्मणजे पत्नी अगर सासरीं आपला संसार बरोबर चालविण्यांत यावा ह्मणून घरसंसाराच्या वापरण्याच्या वस्तुऐवजीं जें कांहीं मिळालें असेल तें, व

(घ) वर सांगितलेल्या कोणत्याही प्रकारच्या स्त्रीधनानें संपादन केलेली मिळकत.

स्त्रीच्या इतर मिळकतीचे प्रकार.

३७. (१) स्त्रीच्या इतर साधारण मिळकतीमध्यें स्त्रीधनाशिवाय

(क) (१) पुरुष, अगर

(२) स्त्री,

यांचे बाजूनें वारशानें आलेली,

(ख) तिऱ्हाईत माणसाकडून बक्षीस मिळालेली,

(ग) वांटपावरून मिळालेली,

(घ) अंगमेहनत अथवा स्वकौशल्यानें संपादन केलेली, अगर अन्य रीतीनें मिळालेली,

(ङ) खरेदी केलेली,

(च) सांपडलेली,

अशा मिळकतींचा समावेश होतो.

(२) पोट कलम (१) पैकीं रकम (ख) व (घ) यांजमध्यें सांगितलेली मिळकत जर पतीच्या मरणानंतर कायम राहिली असेल तर त्यावेळीं ती स्त्रीधन मानली जाते.

स्त्रीधनावर स्त्रीचें स्वामित्व.

३८ (१) पतीकडून मिळविलेल्या स्थावर मिळकतीशिवाय इतर सर्व प्रकारच्या स्त्रीधनावर स्त्रीचें स्वामित्व आहे, आणि

(२) तशाप्रकारचें स्त्रीधन स्त्रीच्या मरणानंतर तिच्या स्वतःच्या वारसाकडे जातें.

कुमारिकेच्या स्त्रीधनाचा वारसा.

३९. (१) कुंवार कन्येच्या स्त्रीधनाचा वारसा, तिच्या

(क) सहोदर भावाकडे, त्याचे अभावीं

(ख) आईकडे, आणि आईचे अभावीं

(ग) बापाकडे, आणि बापाचे अभावीं

(घ) बापाच्या बाजूच्या नातलगाकडे, साधारण वारशाचे नियमाप्रमाणें आणि क्रमाप्रमाणें,

जातो.

(२) परंतु लग्नापूर्वी सासऱ्याकडून जे कांहीं दागदागिने अगर भेटी मिळाल्या असतील त्या सासऱ्याकडे परत जातात.

शुल्केतर स्त्रीधनाचा वारसा.

४०. विवाहित स्त्रीच्या स्त्रीधनापैकीं यौतकाचा वारसा, तिच्या

(क) मुलीकडे, आणि मुलींपैकीं प्रथम

(१) अविवाहित मुलीकडे, आणि त्यानंतर

(२) विवाहित मुलीकडे, आणि त्यांपैकीं ज्या निर्धन असतील त्यांजकडे प्रथम, आणि त्यांचे अभावीं श्रीमंत मुलीकडे,

(ख) मुलीच्या अभावीं मुलीचें मुलीकडे, आणि

(ग) तिचे अभावीं मुलीचे मुलाकडे,

(घ) मुलीचे मुलाच्या अभावीं, मुलाकडे,

(ङ) मुलाच्या अभावीं, नातवाकडे, आणि

(च) नातवाच्या अभावीं

(३) जर त्या स्त्रीचें लग्न ब्रह्मादि सुसंमत विधीप्रमाणें झालेलें असेल तर तिच्या नवऱ्याकडे, आणि

(४) नवऱ्याच्या अभावीं नवऱ्याचे नातलगाकडे, आणि त्याचे अभावीं तिच्या आईबापाकडे आणि त्याचे नातलगाकडे साधारण वारशाचे नियमाप्रमाणें आणि क्रमाप्रमाणें, आणि

(५) जर त्या स्त्रीचें लग्न असुरादि असंमत विधीनें झालेलें असल तर तिच्या आईकडे आणि त्या नंतर तिच्या बापाकडे, आणि

(६) बापाच्या अभावीं बापाच्या नातलगाकडे, आणि त्यांचे अभावीं तिच्या नवऱ्याकडे आणि त्याच्या नातलगाकडे साधारण वारशाचे नियमाप्रमाणें आणि क्रमाप्रमाणें,

जातो.

शुल्काचा वारसा. ४१. विवाहित स्त्रीच्या स्त्रीधनापैकीं शुल्काचा वारसा खालीलप्रमाणें जातो :—

( क ) प्रथम सख्या भावाकडे, व त्याचे अभावीं

( ख ) आईकडे.

स्त्रीचे इतर मिळकतीचा वारसा. ४२. स्त्रीच्या इतर साधारण मिळकतीचा वारसा स्त्रीधनाच्या वारशाचे नियम आणि क्रम याप्रमाणेंच मात्र खालील फेरफारास अनुसरून जातो, ह्मणजे एकाच पिढीच्या वारसांमध्यें स्त्रीसंततीपेक्षां पुरुषसंततीचा श्रेष्ठ हक्क मानला जातो.

स्त्रीच्या इतर मिळकतीवरील स्वामित्व ४३ स्त्रीची इतर साधारण मिळकत, जर त्या स्त्रीनें

( क ) (१) मुलीच्या नात्यानें,

(२) बहिणीच्या नात्यानें, किंवा

(३) पुतणीच्या नात्यानें,

मिळविली असल-तर त्यावर त्या स्त्रीचें स्वतंत्र स्वामित्व मानलें जातें.

( ख ) (४) विधवा पत्नी या नात्यानें, अगर

(५) आईचे नात्यानें, अथवा

(६) इतर कोणत्याही नात्यानें,

जी मिळकत वारशांत मिळविली असेल तिजवर त्या स्त्रीचें मर्यादित स्वामित्व मात्र मानलें जातें.

(ग) परंतु जर आईच्या, आजीच्या अगर इतर नात्यानें एकाद्या स्त्रीच्या बाजूनें तिला वारशांत मिळकत मिळाली असेल तर तिजवर त्या स्त्रीचें स्वतंत्र स्वामित्व मानलें जातें.

स्त्रीच्या इतर साधारण मिळकतीपैकीं ज्या मिळकतीवर स्त्रीचें स्वतंत्र किंवा मर्यादित स्वामित्व असेल त्याचा वारसा.

४४. स्त्रीच्या इतर साधारण मिळकतीपैकीं ज्या मिळकतीवर तिचें

(क) स्वतंत्र स्वामित्व असतें तें तिचे मरणानंतर कलम ४२ मध्यें सांगितलेल्या तिच्या स्वतःच्या वारसाकडेसच जातें, आणि

(ख) मर्यादित स्वामित्व असतें तें तिच्या मरणानंतर तिच्या पूर्वीच्याच स्वतंत्र स्वामित्ववाल्या मालकाच्या वारसाकडे जातें

स्त्रीधनाचा वारसा सप्रतिबंध आहे.

४५. स्त्रीधनाचा आणि स्त्रीच्या इतर मिळकतीचा वारसा सप्रतिबंध मानला आहे.

---

## बाब ७ वी.

### अनंश.

वारशाकरितां नालायकी.

४६. या कलमांत सांगितलेले इसम अनंश ह्मणजे वारशाकरितां नालायक मानले जातात. आणि वारसा येण्याचे प्रसंगीं ते जणूं काय हयातच नाहींत असें मानलें जाईल.

(क) जन्मापासून

(१) नपुंसक,

(२) आंधळा, अगर

(३) मुका, अगर

(४) बहिरा,

असेल,

(ख) किळस येईल अशा सांसर्गिक अगर असाध्य रोगानें पीडित असेल,

(ग) खऱ्या खोट्याची पारख न करितां येण्यासारखा उन्मत्त अगर पूर्ण वेडा असेल,

(घ) संन्याशी असेल, आणि

(ङ) विधवा व्यभिचारिणी असेल,

असे इसम.

अनंशाचा वारसा

४७. अनंश इसमाच्या वारसांस अनंशाचे प्रतिनिधी ह्मणून वारसा मिळत नाहीं; परंतु मूळ मयत इसमाच्या बरोबर त्यांचे स्वतःच्या नात्यावरून वारशावर त्यांचा हक्क उत्पन्न होऊं शकतो.

संप्राप्त झालेला वारसा मागाहूनचे नालायकीमुळें गमावला जात नाहीं.

४८. अनंशाची नालयकी ही वारसा येण्याच्या वेळीं मात्र प्रतिबंध करिते परंतु वारसा एकदां प्राप्त झालेवर अशा नालायकीमुळें मिळालेला वारसा परत घेतां येणार नाहीं.

नालायकी बंद झाल्याचा परिणाम.

४९. अनंशाची नालायकी बंद झाल्यावर तो इसम वारशासाठीं लायक आणि हक्कदार होतो; मात्र अशा प्रसंगीं ज्या इसमाला वारसा एकवार प्राप्त होऊन चुकला

असेल, त्याचा हक्क तो हिरावून घेऊं शकत नाहीं. परंतु अशा प्राप्त झालेल्या हक्कदार इसमाच्या मरणसमयीं लायक झालेला अनंश वारशाच्या क्रमांत येतो.

---

# हिंदू लग्न निबंध.

उद्देश. हिंदुधर्मशास्त्रांतील "लग्नासंबंधींच्या" मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीलप्रमाणें कायदा केला आहे:—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

१. संज्ञा. (१) या निबंधास "हिंदू लग्न निबंध" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति. (२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

२. सुरवात. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं. (२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यांमध्यें लग्नासंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतिरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेट-मध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ या नियमानें अगर इतर कोणत्याही नियमानें कोणत्याहीप्रकारें बाध येणार नाहीं.

---

# बाब २ री.

## कायदेशीर लग्नाचीं आवश्यक तत्वें.

वधुवरांचा वर्ण कोणता असला पाहिजे.

३. वधू आणि वर एकच वर्णाचे असले पाहिजेत असें नाहीं.

व्यंग अथवा वय बाध करीत नाहीं.

४. कोणत्याही शारीरिक अथवा मानसिक व्यंगाच्या सबबीवर अथवा वयाच्या सबबीवर कायदेशीर लग्न होण्यास बाध येत नाहीं.

एकच सामान्य पूर्वज असलेल्या इसमामध्यें लग्न होऊं शकणार नाहीं.

५. देशाचार अगर कुलाचार नसेल तर, आपल्या बापाच्या बाजूनें मोजलें असतां आपल्यानंतर सातवे पिढीपर्यंत आणि आपल्या आईच्या बाजूनें मोजलें असतां आपल्यानंतर पांचवे पिढीपर्यंत ज्यांचा सामान्य पूर्वज एकच येत असेल अशा कोणत्याही दोन इसमांमध्यें नवराबायकोचा संबंध होणार नाहीं.

खुलासा १—दत्तक घेणार बापाच्या आईबापांचा अथवा दत्तक पुत्राच्या जनक आईबापांचा पूर्वज सदरच्या नियमांत सांगितलेला सामान्य पूर्वज होऊं शकेल.

खुलासा २—सावत्र आईचा,

(१) भाऊ,

(२) बहीण,

(३) मुलगी, अथवा
(४) मुलीची संतती,

यांजबरोबर लग्नाच्या कारणाशिवाय दुसऱ्या बाबतीमध्यें या कलमाच्या अर्थाप्रमाणें सावत्र आई पूर्वज नव्हे.

गोत्र कोणतें असल पाहिजे.

६. देशाचार अगर कुलाचार नसेल तर कोणताही पुरुष आपल्या गोत्राच्या कुटुंबामध्यें जन्मलेल्या, त्याचप्रमाणें जर तो एखाद्या ठिकाणीं दत्तक गेला असेल तर दत्तक घेणार कुटुंबाच्या गोत्रांत जन्मलेल्या, मुलीबरोबर लग्न करूं शकणार नाहीं.

नवरा हयात असून बायकोला पुन्हां लग्न करतां येणार नाहीं.

७ ज्या बायकोचा नवरा, नवरा या नात्यानें हयात असेल अशा बायकोबरोबर लग्न होऊं शकणार नाहीं.

कन्यादान कोण करूं शकेल.

८. (१) बाप, आजा, भाऊ अथवा बापाचे कुटुंबांतील अगदीं जवळचा पितृव्य अगर जनक आई, आईचा बाप, मामा अथवा आईच्या बापाच्या कुटुंबांतील अगदीं जवळचा पितृव्य, अथवा न्यायाधीश, अथवा वधू स्वतः, एकाच्या अभावीं त्याच्या नंतरचा, अशा क्रमानें वधूचें कन्यादान करूं शकेल.

(२) परंतु योग्य विधीपूर्वक एकवार झालेलें लग्न ज्या माणसानें वधूचें लग्न केलें पाहिजे त्यानें न केल्यामुळें निरर्थक ठरत नाहीं.

लग्न केव्हां पूर्ण होतें.

९. (१) सप्तपदीच्या अंतीं विवाहहोमाच्या विधीनें एकमेक लग्नास योग्य वधूवर कायदेशीर लग्नाचेसंबंधानें कायमचे जोडले जातात.

(२) परंतु दगलबाजीनें अथवा जबरीनें अशी वधू मिळवून लग्न केलें असेल आणि त्या वधूची संमती नसेल तर तें कायदेशीर लग्न

होत नाहीं. आणि अशा प्रसंगीं सदरहू वधूचें कोणत्याही लग्नास योग्य अशा दुसऱ्या वराबरोबर लग्न होऊं शकेल.

(३) त्याचप्रमाणें सप्तपदीसुद्धां विवाहहोमाचा विधि झाला असेल तरी पण तें लग्न एकमेकाबरोबर लग्न होण्यास या निबंधाप्रमाणें अयोग्य वधुवराचें असेल तर तें लग्न निरर्थक होतें. परंतु त्या वधूचें दुसऱ्या योग्य वराबरोबर लग्न होईपर्यंत पहिल्या वराकडून त्या वधूला अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे.

(४) कलम ७ मध्यें निर्दिष्ट केलेली स्त्री सप्तपदीसुद्धां विवाहहोमाच्या विधीपूर्वक पुन्हां लग्न करील तरी पण तें लग्न निरर्थक होईल, आणि तिला त्या दुसऱ्या नवऱ्याकडून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क नाहीं.

## बाब ३ री.

### स्त्रीपुरुषांचे परस्पर हक्क.

#### (क) जात हक्काविषयीं.

लग्न झाल्यावर बायकोचा नवऱ्याबरोबर कोणत्या प्रकारचा संबंध उत्पन्न होतो.

१०. लग्न झाल्यावर बायको नवऱ्याच्या कुटुंबांतील माणूस होतें, व नवऱ्याला तिचें पालन करण्याचा हक्क प्राप्त होतो.

नवऱ्याला बायकोबरोबर सहवास करण्याचा केव्हां हक्क आहे.

११. नवरा,

(क) अक्षम्य निर्दयपणा दाखवीत असेल,

(ख) पालनपोषण करण्याचें नाकारीत असेल,

(ग) कंटाळा येण्यासारखा आणि सांसर्गिक रोगानें पीडित असेल,

(घ) अथवा परस्त्रीबरोबर व्यभिचार करून राहत असेल,

या प्रसंगाशिवाय इतर प्रसंगीं त्याला आपल्या बायकोबरोबर सहवास करण्याचा हक्क आहे; त्याचप्रमाणें,

बायको,

(ङ) नवऱ्याचा जीव घेण्याचा यत्न अगर युक्ति करीत असेल,

(च) कंटाळा येण्यासारखा व सांसर्गिक रोगानें पीडित असेल,

(छ) व्यभिचारिणी असेल,

या प्रसंगाशिवाय इतर प्रसंगीं तिचा नवऱ्याला त्याग करतां येणार नाहीं, आणि नवऱ्याबरोबर सहवास करण्याचा तिला हक्क आहे.

**खुलासा** :— शरीरप्रकृतीस अथवा सुरक्षितपणास अपाय होईल अशी प्रत्यक्ष मारहाण झाली नसेल अथवा शरीरप्रकृति अथवा सुरक्षितपणा यास अपाय होईल अशी मारहाण होण्याची भीति बाळगण्याचें योग्य कारण नसेल, तर निर्दयपणा आहे असें ह्मणतां येणार नाहीं.

## (ख). मिळकतसंबंधींचे हक्काविषयीं.

नवऱ्याचा स्वताचे मिळकतीचें सत्वार्पण करण्याचा हक्क.

१२. आपल्या बायकोला निराश्रित करण्याच्या इराद्यानें, नवरा आपल्या मिळकतीचें स्वत्वार्पण, अथवा ती निराश्रित होईल अशा रीतीनें आपल्या हयातींत अथवा मृत्युपत्रावरून बक्षिसपत्र, करूं शकणार नाहीं.

नवऱ्याच्या मिळकतींत बायकोचें स्वामित्व.

१३. आपल्या नवऱ्याच्या हयातींमध्यें बायकोचें नवऱ्याच्या मिळकतींत गौण स्वामित्व आहे. परंतु स्त्रीधनामध्यें नवऱ्याचें कोणत्याही प्रकारचें स्वामित्व नाहीं.

बायकोचा आपल्या नवऱ्याच्या मिळकतींत हक्क

**१४.** बायकोला नवऱ्याच्या मिळकतीची वांटणी करून मागण्याचा हक्क नाहीं; परंतु

(क) नवरा आणि मुलगे यांचेमध्यें वांटणी होईल,

अथवा

(ख) नवऱ्याच्या मरणानंतर त्याचे मुलगे व नातू यांचेमध्यें वांटणी होईल, तर

बायको एक मुलाच्यां हिश्शाइतकी हक्कदारीण असते; पण नवऱ्याकडून अथवा त्याच्या कुटुंबाकडून बायकोला स्त्रीधन मिळालें असेल तर तिला त्या मिळकतींतून इतकाच हिस्सा मिळण्याचा हक्क आहे कीं, तो हिस्सा आणि स्त्रीधन मिळून एक मुलाच्या हिश्शाबरोबर तो सर्व हिस्सा होऊं शकेल.

नवऱ्याच्या मरणानंतर बायको त्याच्या मिळकतींची वारस केव्हां होऊं शकेल.

**१५.** नवऱ्याच्या मरणानंतर बायको जर पतिव्रता असेल, तर

(क) मुलगा, नातू, अगर पणतू, अथवा सहभागीदार, यांच्या अभावीं नवऱ्याच्या मिळकतींची वारस होते;

अथवा

(ख) कलम १४ मध्यें ठरविल्याप्रमाणें नवऱ्याच्या मिळकतींची वांटणी होईल त्यावेळीं भाग घेण्याचा तिला हक्क आहे;

अथवा

(ग) वारसा अथवा भाग मिळूं शकणार नाहीं अशा प्रसंगीं नवऱ्याच्या मिळकतींतून अन्नवस्त्र घेण्याचा तिला हक्क आहे.

कोणती मिळकत स्त्रीधन आहे.

**१६.** स्त्रीनें,

(क) लग्नाच्यापूर्वी संपादन केलेली,

(ख) लग्नाच्या वेळीं संपादन केलेली, आणि

(ग) विवाहित स्थितीमध्यें, अंगमेहनत, अथवा स्वकौशल्यानें उपार्जन केलेली, आणि तिऱ्हाईत माणसाकडून बक्षिस मिळालेली मिळकत शिवाय करून, संपादन केलेली,

सर्व मिळकत स्त्रीचें स्त्रीधन आहे.

**खुलासा १ :—** विशेष प्रसंगीं वापरण्याकरितां दिलेला कपडालत्ता आणि दागिने स्त्रीधन नाहीं.

**खुलासा २ :—** विवाहित स्थितीमध्यें स्त्रीनें अंगमेहनत करून अथवा स्वकौशल्यानें उपार्जित केलेली आणि तिऱ्हाईत माणसाकडून बक्षिस मिळालेली मिळकत जर कायम असेल तर ती नवऱ्याच्या मरणानंतर स्त्रीचें स्त्रीधन समजलें जाईल.

संयुक्त मिळकतींत बायकोचा हिस्सा स्त्रीधन आहे.

१७. नवराबायको यांची जर मिळकत असेल तर त्या संयुक्त मिळकतींतील बायकोचा स्वताचा हिस्सा स्त्रीधन होतो.

बायकोचें स्वतंत्र स्वामित्व केव्हां आहे.

१८. लग्नापूर्वी अथवा नंतर आईबाप अथवा त्यांचे नातलग यांजकडून मिळविलेलें स्त्रीधन, आणि त्या स्त्रीधनानें उपार्जन केलेली मिळकत, त्याचप्रमाणें लग्नानंतर नवऱ्याकडून मिळविलेली जंगम मिळकत, यांजवर स्त्रीचें स्वतंत्र स्वामित्व आहे. इतर स्त्रीधनाची नवऱ्याचे हयातीमध्यें बायको त्याच्या संमतीशिवाय स्वत्वार्पण करूं शकणार नाहीं.

नवरा बायकोच्या स्त्रीधनाचा केव्हां उपयोग करूं शकेल.

१९. आपलें अगर कुटुंबाचें पालनपोषण, आवश्यक धर्मकार्य, व्याधिनिवारण, अथवा पैसा देण्याची लायकी नसल्यामुळें झालेल्या कैदेंतून मुक्तता होण्याकरितां, अशा जरूरीच्या प्रसंगीं पतीला अन्य साधनांच्या अभावीं आपल्या स्त्रीच्या स्त्रीधनाचा उपयोग करण्याचा हक्क आहे.

२०. कलम १९ प्रमाणें उपयोगांत घेतलेलें अथवा स्त्रीनें खुषीनें दिलेलें स्त्रीधन, स्त्रियेच्या कसुरीशिवाय पति तिचा (स्त्रीचा) त्याग अथवा अनास्था करणार नाहीं, अथवा तिचें पालनपोषण करण्याचें नाकारणार नाहीं, तोंपर्यंत परत देण्यास, पति बांधला गेला नाहीं.

बायकोचें स्त्रीधन परत देण्यास नवरा केव्हां बांधला जात नाहीं.

## (ग) स्त्रीपुरुषांचा कार्यअधिकार.

नवराबायको एक व्यक्ति केव्हां नसतं.

२१. दिवाणी आणि फौजदारी कायद्याच्या कामाकरितां नवराबायको एक व्यक्ति असण्याचें कायद्याचें अनुमान नाहीं.

नवराबायकोचा मिळकतींसंबंधीं परस्पर व्यवहार.

२२. (१) आपल्या स्त्रीधनासंबंधीं स्त्री पतीबरोबर करार आणि त्यांतून देवघेव करूं शकेल.

(२) परंतु पति आपल्या मिळकतींतून स्त्रीला जें कांहीं देईल तें कांहीं तिचें कर्ज सामान्यतः मानलें जाणार नाहीं.

तिऱ्हाईत माणसांबरोबर व्यवहार करण्याची स्त्रीची सत्ता.

२३. तिऱ्हाईत माणसांबरोबर स्वतःच्यातर्फे

(क) करार करण्यास, अथवा

(ख) ज्यांत मिळकतीचा उपयोग करण्याची जरूरी पडेल असा व्यवहार करण्यास,

स्त्री समर्थ आहे; परंतु अशा कराराकरितां किंवा व्यवहाराकरितां तिची जबाबदारी ज्या स्त्रीधनाचें स्वत्वार्पण करण्याचा तिचा स्वतंत्र अधिकार आहे तितक्या पुरतीच आहे.

## बाब ४ थी.

### कर्तव्य आणि जबाबदारी.

पतीचें कर्ज देण्यास स्त्री जबाबदार नसते.

२४ (क) पतीचें कर्ज देण्याचें कबूल केलें असेल
(ख) त्याची मिळकत वारस ह्मणून घेतली असेल, अथवा

(ग) पतीबरोबर करारांत सामील असेल,

याशिवाय पतीचें कर्ज देण्यास स्त्री जबाबदार नाहीं; स्त्रीनें वारस ह्मणून पतीची मिळकत घेतली असेल तेव्हां त्या मिळकतीपुरतीच ती पतीच्या देण्यास जबाबदार आहे.

स्त्रीच्या कर्जाबद्दल पती जबाबदार नाहीं.

२५. पतीनें स्पष्ट अथवा गर्भित रीतीनें अधिकार दिला नसेल तर स्त्रीनें केलेलें कर्ज अथवा करार याबद्दल पति जबाबदार नाहीं; असा अधिकार दिला असल्याचें सामान्यतः खालील प्रसंगीं अनुमान होतें, ह्मणजे:—

(क) (१) पतीच्या गैरहजेरीमध्यें,

(२) त्याच्या असमर्थतेमुळें, अथवा

(३) त्याच्या स्पष्ट परवानगीनें,

जेव्हां घरचा कारभार स्त्री चालवीत असेल, आणि कर्ज अथवा करार कुटुंबाच्या कार्याकरितां करण्यांत आला असेल तेव्हां; अथवा

(ख) योग्य कारणावरून पतीपासून स्त्री निराळी रहात असेल आणि पति स्त्रीचें पालनपोषण करीत नसेल, व जें कर्ज अथवा करार केला असेल तें पालनपोषणाकरितांच असेल तेव्हां.

२६. पति यथाशक्ति पतिव्रता स्त्रीचें पालनपोषण करण्यास बांधला गेला आहे. व्यभिचारिणी स्त्री जर आपली निंद्य वर्तणूक सोडून देईल तर तिला प्राणरक्षण होईल इतकें अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे.

पति स्त्रीचें पालनपोषण करण्यास केव्हां बांधला जातो.

२७ योग्य कारणावांचून पतीच्या परवानगीशिवाय स्त्री जर निराळी रहात असेल तर जोंपर्यंत अशा रीतीनें ती निराळी राहील तोंपर्यंत पतीकडून अन्नवस्त्र मागण्याचा तिला हक्क नाहीं.

स्त्रीला पतीकडून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क केव्हां नसतो.

२८. (१) योग्य कारणावरून स्त्री निराळी रहात असेल, अथवा योग्य कारणाशिवाय पति तिचा त्याग करील, तर स्त्रीला पतीच्या उत्पन्नांतून एक तृतियांश भागापर्यंत निराळें अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे. अशा अन्नवस्त्राची रकम पतीच्या मिळकतीवर बोजा मानली जाणार नाहीं, आणि कांहीं रकम देणें झाली असतां दिली नसेल तर त्या रकमेचे आधीं पतीचें कर्ज त्याच्या मिळकतींतून वसूल करून घेण्याचा सावकाराचा श्रेष्ठ हक्क आहे.

पतीच्या उत्पन्नांतून अन्नवस्त्र मागण्याचा स्त्रीला केव्हां हक्क आहे.

(२) परंतु अन्नवस्त्राची रक्कम मुक्रर करून करार अथवा हुकूमनाम्यावरून पतीची सर्व मिळकत अथवा तिचा भाग यांवर बोजा ह्मणून घालण्यांत आल्यावर जें देणें करण्यांत आलें असेल त्या देण्यास श्रेष्ठतेचा लाभ मिळणार नाहीं.

---

## बाब ५ वी.

### लग्नगांठीची अविच्छिन्नता.

विधिपूर्वक झालेलें लग्न विच्छिन्न होत नाहीं.

२९. ज्ञातिरिवाज नसेल तर जे स्त्रीपुरुष कायदेशीर लग्नसंबंधानें कायमचे जोडलेले असतात त्यांचें लग्न कोणत्याहि वेळीं विच्छिन्न होत नाहीं.

# हिंदू दत्तक निबंध.

उद्देश

हिंदुधर्मशास्त्रांतील दत्तकासंबंधींच्या मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा केला आहे :—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

संज्ञा.

१. (१) या निबंधाला "हिंदू दत्तक निबंध" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति.

(२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

सुरवात.

२. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यामध्यें दत्तकासंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतीरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेट-मध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ यानें अगर इतर कोणत्याहि नियमानें कोणत्याहिप्रकारें बाध येणार नाहीं.

व्याख्या. ३. विषयावरून अगर पूर्वापार संबंधावरून बाध येत नसेल तर या निबंधामध्यें

(क) "पुत्र" या शब्दामध्यें औरस पौत्र (नातू) प्रपौत्र [पणतू] व दत्तक पुत्र आणि दत्तकानंतर झालेला पौत्र व प्रपौत्र यांचा समावेश होतो असें समजावें.

(ख) "संन्याशी" ह्मणजे ज्या इसमानें कायमचा संसाराचा त्याग केला असेल तो इसम समजावा, आणि

(ग) "अनंश" ह्मणजे हिंदुधर्मशास्त्रांतील वारशाच्या नियमान्वयें शारीरिक व्यंगामुळें अगर इतर कारणांमुळें वारशाकरितां जो इसम नालायख असतो तो अनंश समजावा.

## बाब २ री.

### दत्तक कोण घेऊं शकेल.

#### (क) सामान्य.

दत्तक घेण्याचा अधिकार. ४. या निबंधांतील इतर ठरावास पात्र राहून ज्याला मुलगा नसेल अशा कोणत्याहि जाणत्या इसमास एकाच वेळीं फक्त एकच मुलगा दत्तक घेण्याचा अधिकार आहे.

खुलासा १ ला:—आपली पत्नी गर्भवती असल्याकारणानें कोणी इसमास मुलगा होण्याचा संभव आहे एवढ्यावरून त्या वेळीं त्याला मुलगा आहे असें समजूं नये.

: खुलासा २रा :—एखाद्या इसमाचा मुलगा हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें कोणत्याहि कारणांवरून अनंश झाला असेल तेव्हां त्याला मुलगा आहे असें समजूं नये.

## (ख) अधिकार असलेला पुरुष.

अधिकारी पुरुष. ५. संन्याशाशिवाय कोणत्याहि पुरुषास, मग तो

(क) अविवाहित असो,

(ख) विधुर असो,

तरी पण त्याला दत्तक घेण्याचा अधिकार आहे.

## (ग) अधिकार असलेली स्त्री.

अधिकारी स्त्री ६. कोणत्याहि विवाहित स्त्रीला

(क) फक्त आपल्या पतीकरितांच, आणि

(ख) आपल्या पतीच्या स्पष्ट संमतीवरून,

दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार आहे.

अपवाद:— जिचा पति

(ग) संन्याशी झाला असेल, अगर

(घ) कायमचा वेडा झाला असेल,

तिला आपल्या पतीच्या संमतीशिवाय स्वतःच्या इच्छेवरून दत्तकपुत्र घेण्याला हरकत नाहीं.

विभक्त पतीच्या विधवेचा अधिकार.

७. (१) कोणत्याही पुत्र नसलेल्या विधवा स्त्रीला, तिचा पति आपल्या कुटुंबांतून विभक्त झाला असेल अथवा अशा पतीची विधवा स्वतः वारस असेल, तेव्हां जर दत्तकाचे बाबतींत पतीनें स्पष्ट अगर गर्भित

रीतीनें निषेध अगर निर्बंध केलेला नसेल, तर मात्र आपल्या पतीकरितां दत्तकपुत्र घेण्याचा तिला अधिकार आहे.

(२) व्यभिचारिणी विधवेला आपल्या पतीसाठीं दत्तकपुत्र घेणेचा अधिकार नाहीं.

अविभक्त पतीच्या विधवेचा अधिकार.

८. जेव्हां एखाद्या विधवा स्त्रीचा पती आपल्या कुटुंबांतून विभक्त झाला नसेल, तेव्हां त्याच्या स्वसंपादित मिळकती-शिवाय इतर मिळकतींसंबंधीं त्या विधवेला

(क) आपल्या पतीच्या स्पष्ट संमतीशिवाय, अथवा

(ख) पतीनें स्पष्ट अगर गर्भित रीतीनें विरोध केला नसेल तर,

(१) त्या अविभक्त कुटुंबांतील सहभागीदारांपैकीं जास्त इसमांच्या संमतीशिवाय अथवा

(२) आपल्या सासऱ्याचे अगर अविभक्त कुटुंबांतील जो कर्ता असेल त्याचे स्पष्ट संमतीशिवाय

दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार नाहीं.

## उदाहरण.

(१) अ व ब हे भाऊ एका अविभक्त कुटुंबांतील इसम आहेत. अ आपली स्त्री क इला दत्तक घेण्यास स्पष्ट संमती देत आहे. आणि अ अविभक्त स्थितीमध्येंच मरण पावला. अ ची विधवा क हीं ब च्या संमतीशिवाय ड नांवाच्या इसमास दत्तक घेत आहे. हें दत्त-विधान कायदेशीर आहे.

(२) अ व त्याचे चार पुत्र ब क ड आणि ई एका अविभक्त कुटुंबांतील इसम आहेत. त्यांपैकीं, ब हा अशा स्थितींत मरण पावला. ब ची विधवा फ ही आहे. ती क, ड, आणि ई यांचे संमतीनें अथवा एकट्या अ च्या संमतीनें ग ला दत्तक घेते. हा दत्तक कायदेशीर आहे.

९ कलम १३ मध्यें ठरविण्यांत आलें आहे, त्याशिवाय जेव्हां आपल्या पतीच्या मिळकतीवर आपल्याशिवाय अगर आपल्या सहविधवेशिवाय दुसऱ्या कोणास वारशाचा हक्क प्राप्त झाला असेल तेव्हां अशा दुसऱ्या इसमाच्या स्पष्ट संमतीशिवाय त्यांचे अशा प्रकारचे हक्कास बाध येईल अशा रीतीनें कोणत्याही विधवेस दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार नाहीं.

निविष्ट हक्कवाल्यांचे संमतीची जरूरी.

## उदाहरण.

अ आणि ब नांवाचे बंधु एका अविभक्त कुटुंबांतील आहेत. प्रथम अ आपली क नांवाची विधवा मागें ठेवून मरण पावला. आणि नंतर ब हा आपली ड नांवाची विधवा मागें ठेवून मरण पावला. म्हणजे त्या ड विधवेला सगळ्या मिळकतीवर वारस या नात्यानें हक्क निविष्ट (प्राप्त) झाला आहे. अ ची विधवा क हिनें फ ला ड च्या संमतीशिवाय दत्तक घेतला. या दत्तविधानानें ब ची विधवा ड हिला जो हक्क प्राप्त झाला आहे, तो नष्ट होऊं शकणार नाहीं.

१०. कलम ८ व ९ यांत निर्दिष्ट केलेली स्पष्ट संमति ही दत्तक घेण्यापूर्वी अगर घेण्याचे वेळीं दिलेली कायदेशीर संमति असली पाहिजे. अशा कायदेशीर स्पष्ट संमतीशिवाय घेतलेला दत्तक मागाहून जरी तसा कबूल करण्यांत आला, तरी तेवढ्यावरून तो कांहीं कायदेशीर दत्तक होऊं शकणार नाहीं.

कायदेशीर समतीची जरूरी.

११. कलम ८ व ९ प्रमाणें जेव्हां दत्तक घेण्यास विधवेला तिच्या पतीची, सहभागिदारांची अगर सासऱ्याची संमति असेल, तेव्हां विधवा अल्पवयी असली तरी पण तिला दत्तकपुत्र घेण्यास प्रतिबंध नसतो.

अल्पवयी विधवेला संमतीची खास जरूरी.

दत्तक घेण्यास विधवेस भाग पाडतां येणार नाहीं.

१२. कोणत्याहि विधवेला दत्तक घेण्याच्या बाबतींत पतीची आज्ञा झाली असेल अगर त्याची अनुमति असेल, तरी

(क) त्या विधवेची मर्जी असेल तरच, आणि जेव्हां मर्जीस येईल तेव्हां, व

[ख] अमूक मुलगा दत्तक घ्यावा वगैरे शर्तीवर अनुमति दिली असेल तेव्हां पतीचा मुख्य उद्देश व्यर्थ न होईल अशा शर्तीस अनुसरून,

या विधवेला दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार आहे.

पुत्राच्या मरणानंतर आपल्याशिवाय इतरांना वारशाचा हक्क प्राप्त झाला असेल तर आईचा दत्तक घेण्याचा हक्क नष्ट होतो.

१३. विधवेच्या पुत्राला आपल्या पतीकडून आलेला वारशाचा हक्क त्या पुत्राच्या मरणानंतर आपल्याशिवाय इतर कोणाही त्याच्या वारसास एकवार प्राप्त झाला असेल तर त्या विधवेचा दत्तक घेण्याचा अधिकार कायमचा नष्ट होतो.

## उदाहरण.

(१) सन १८५० मध्यें गौरीकिशोर मरण पावला. त्या वेळीं त्याच्या पाठीमागें त्याची विधवा चंद्रावली, मुलगा भवानीकिशोर व मुलाची बायको भुवनमयी इतकीं माणसें त्याच्या कुटुंबांत होतीं. वारसा, मुलगा भवानीकिशोर यांजकडे आला. भवानीकिशोर हा सन १८५४ मध्यें मरण पावला, तेव्हां त्याचा वारसा त्याची विधवा भुवनमयी इजकडे आला. त्यानंतर ती विधवासुद्धां एक वर्षानंतर मरण पावली. तेव्हां भवानीकिशोरचा वारसा त्याची आई चंद्रावली इजला प्राप्त झाला. चंद्रावलीनें आपला मयत नवरा गौरीकिशोर यानें देऊन ठेवलेल्या परवानगीप्रमाणें दत्तकमुलगा घेतला. हा दत्तकमुलगा कायदेशीर मानला जाणार नाहीं.

(२) सन १८७९ मध्यें जिवाजीनें आपली मिळकत प्रतिवादी-कडे गहाण ठेविली. सन १८८४ मध्यें तो संततीशिवाय मरण पावला. त्याची स्त्री त्याचे पूर्वीच मरण पावली होती. ह्मणून त्याची आई तुळसी त्याची वारस झाली. सन १८९४ मध्यें तुळशीनें वादी यास आपला नवरा कृष्णाजी याजकरतां दत्तक घेतला आणि त्यानंतर ती मरण पावली. वादीनें प्रतिवादीविरुद्ध गहाण मिळकतीकरितां आणलेल्या दाव्यांत वादी हा कायदेशीर दत्तक नाहीं अशी प्रतीवादीची तक्रार मान्य केली जाणार नाहीं.

अनेक सहविधवा-पैकीं अधिकारी विधवा.

१४. (१) पतीच्या मरणानंतर त्याच्या पाठीमागें त्याच्या अनेक सहविधवा असतील तर त्यांपैकीं ज्येष्ठ विधवेचा मात्र दत्तक घेणेचा अधिकार आहे.

(२) परंतु जर

(क) पतीनें एखाद्या कनिष्ठ विधवेस दत्तक घेण्याचा अधिकार स्पष्टरितीनें दिला असेल, अगर

(ख) वडील विधवेनें कनिष्ठ विधवेस दत्तक घेणेचे बाबतींत संमति दिली असेल, अगर

(ग) वडील विधवा कोणत्याहि कारणावरून दत्तक घेण्यास अयोग्य झाली असेल,

तर कनिष्ठ विधवेस दत्तकमुलगा घेणेचा अधिकार आहे.

स्त्रीचा स्वतःक-रितां दत्तक घेण्याचा अधिकार.

१५. कोणत्याही स्त्रीला स्वतःकरितां दत्तक घे-ण्याचा अधिकार नाहीं.

खुलासाः—नायकिणीला मुलगी दत्तक घेतां येत नाहीं.

# बाब ३ री.

## दत्तक कोण देऊं शकेल.

दत्तक देण्याचा अधिकार.

१६ बापाच्या हयातीमध्यें पुत्राला दत्तक देण्याचा अधिकार, फक्त

(क) त्याच्या जनक बापाला, आणि

(ख) बापाच्या स्पष्ट अगर गर्भित अनुमतीनें जनक मातेला, आहे.

**खुलासा**:—जनक बाप अगर जनक माता यांनीं आपला धर्म बदलला असला तरी त्यावरून त्यांचा दत्तक देण्याचा अधिकार नष्ट होत नाहीं.

जनक मातेचा अधिकार.

१७. (१) (क) बाप मयत असेल अगर मयत झाल्याचे कायद्याप्रमाणें अनुमान होत असेल, अगर

(ख) बाप संन्यासी झाल्यामुळें किंवा वेडा झाल्यामुळें अनुमति देण्यास नालायख झाला असेल,

तेव्हां जनक मातेला मुलगा दत्तक देण्याचा अधिकार आहे.

(२) मयत होण्यापूर्वीं अगर अनुमति देण्यास नालायख होण्यापूर्वीं बापानें आपला पुत्र दत्तक देण्यास स्पष्ट अगर गर्भितरीतीनें निषेध केलेला असेल तेव्हां जनक आईला दत्तक देण्याचा अधिकार रहात नाहीं.

(३) पुनर्विवाह केला असेल अशा जनक मातेचा, मुलगा दत्तक देण्याचा अधिकार जात नाहीं.

दत्तक देण्याचा अधिकार दुसऱ्यावर सोंपवितां येणार नाहीं

१८. (१) दत्तक देण्याचा अधिकार ज्या इसमास असेल त्या इसमास तो अधिकार दुसऱ्यावर सोंपवितां येणार नाहीं.

(२) परंतु अधिकारी इसमानें दत्तक देण्याची परवानगी एकवार दिली असेल तर फक्त दत्तविधान क्रिया करण्याचा अधिकार दुसऱ्या कोणास देण्याला हरकत नाहीं.

दत्तक केव्हां निरर्थक होतो.

१९ (१) ज्या इसमाला दत्तक देण्याचा अधिकार असेल तो कांहीं पूर्वगामी शर्थ घालून दत्तक देण्याची संमति देण्यास मुखत्यार आहे.

(२) अशा प्रसंगीं जर ती पूर्वगामी शर्थ पाळल्याशिवाय दत्तकपुत्र घेण्यांत आला असेल तर तो दत्तक निरर्थक समजावा.

---

## बाब ४ थी.

### दत्तक कोण होऊं शकेल.

२०. कोणीही पुत्र

दत्तक होणेची योग्यता.

(क) त्याची जनक आई दत्तक घेणाऱ्या बापाचे वरील पिढींतील नातेवाईक नसेल, आणि

(ख) त्याचे जनक आईबरोबर दत्तक बापाचा तिचे कुंवारपणीं विवाह होऊं शकला असता,

तर तो पुत्र

(ग) कोणत्याही वयाचा असेल,

(घ) लग्न झालेला असेल अगर त्यास मुलें झालेलीं असतील,

(ङ) जनकबापाचा ज्येष्ठ मुलगा असेल, अगर

(च) जनकबापाचा एकुलता एक मुलगा असेल, तरी पण तो दत्तक घेणाऱ्या बापाचा दत्तकपुत्र होण्यास योग्य आहे.

अपवादः—(१) मुलीचा मुलगा, आणि

(२) बहिणीचा मुलगा,

यांचेसंबंधीं वरील पोट कलम (ख) मध्यें सांगितलेल्या लग्न होण्याबद्दलच्या शक्यतेचा प्रतिबंध लागूं पडत नाहीं.

उदाहरणें:—( पोटकलम (क) चीं )

(१) अ आणि ब हे सावत्र बंधु आहेत. अच्या मरणानंतर त्याची विधवा ही बला दत्तक घेते. हा दत्तक गैरकायदेशीर आहे.

(२) अ हा बचा सखा काका आहे. बची विधवा अला दत्तक घेते. हा दत्तक गैरकायदेशीर आहे.

(३) कचा ख हा सख्खा मामा आहे. कची विधवा खला दत्तक घेते. हा दत्तक बेकायदेशीर आहे.

उदाहरणः—(पोटकमल (ख) चें)

(४) अ इसम बच्या स्त्रीचा सख्खा भाऊ आहे. बच्या मरणानंतर त्याला संतति नसल्यामुळें बची स्त्री आपला भाऊ अला दत्तक घेते. हा दत्तक कायदेशीर आहे.

दत्तक होण्यास अयोग्य आहे.

२१. एकादा मुलगा

(क) पुत्र या नात्यानें करावयाच्या धर्मक्रियेसाठीं अगर वारसाचा हक्क धारण करण्यास नालायख असेल,

(ख) स्वतः एकदा दत्तक झाला असेल, अगर त्याचे आईबाप नसतील, तर

तो दत्तक होण्यास अयोग्य मानला जाईल.

२२. दत्तक घ्यावयाचा मुलगा जर तो जाणता असेल आणि दत्तक होण्याचे वेळीं स्वतः दत्तक होण्यास सम्मती देत नसेल तर तो कायदेशीर दत्तक होऊं शकत नाहीं.

दत्तकाची संमती.

२३. (१) एकाच मुलाला एकाच वेळीं दोन इसमांना दत्तक घेतां येणार नाहीं.

द्वयामुष्यायण.

(२) परंतु एकुलत्या एक मुलावर त्याचा जनक बाप आपला पितृत्वाचा हक्क कायम ठेवून स्पष्ट करार करून असा मुलगा दुसऱ्या इसमास दत्तक देईल तर तो मुलगा द्वयामुष्यायण आहे ह्मणजे जनक बाप व दत्तक बाप ह्या दोघांचाही मुलगा होऊं शकतो.

(३) दोन भावांच्या विधवांनाहि सदरहूप्रमाणें स्पष्ट करार करून एकाच मुलाला द्वयामुष्यायण मुलगा करतां येईल.

---

## बाब ५ वी.

### दत्तक कोणत्या रीतीनें होऊं शकल.

दत्तविधानासंबंधीं आवश्यक क्रिया.

२४. (१) दत्तक पुत्र घेण्यांत पुत्राचें
(क) प्रत्यक्ष दान, आणि
(ख) प्रत्यक्ष प्रतिग्रह,
हीं आवश्यक आहेत.

(२) सगोत्रांतील पुत्र दत्तक घेण्यांत दत्तहोम वगैरे धर्मविधी आवश्यक नाहींत.

---

## बाब ६ वी.

### दत्तक झाल्यानें काय परिणाम होतात.

दत्तक झाल्याचा परिणाम.

२५. मुलगा दत्तक झाला ह्मणजे

(क) तो जनक बापाच्या कुटुंबांतून कमी होऊन त्या कुटुंबांतील आपल्या जनक बापाचा पुत्र या नात्यानें त्याचे वारशाचे, सहभागिदारीचे आणि धर्मक्रिया करण्याचे वगैरे सर्व हक्क आणि त्याच्या जबाबदाऱ्या हीं नष्ट होतात; आणि

(ख) दत्तक घेणाऱ्या बापाच्या कुटुंबामध्यें औरस पुत्र या नात्यानें सर्व हक्क व जबाबदाऱ्या त्याला प्राप्त होतात.

**अपवाद १ ला:**—जनक कुटुंबांत एक रक्ताच्या नात्यावरून लग्न करण्यास, दत्तक देण्याघेण्यास वगैरे संबंध जोडण्यास, जो प्रतिबंध असेल तो तेवढाच. परंतु त्याचा त्या कुटुंबाशीं एकरक्ताच्या नात्याचा संबंध तो दत्तक झाल्यामुळें तुटत नाहीं.

**अपवाद २ रा:**—दत्तविधान होण्यापूर्वी त्या मुलाची कांहीं स्वसंपादित मिळकत असेल किंवा त्यास दुसरा कांहीं वारसा किंवा हक्क, त्या कुटुंबातर्फे नव्हे, असा प्राप्त झाला असेल तर त्यावरील त्याचा हक्कसंबंध त्याच्या दत्तविधानानें नष्ट होत नाहीं.

दत्तकपुत्र आणि त्यानंतर जन्मलेला औरसपुत्र.

२६. दत्तकपुत्र घेतल्यानंतर जर दत्तक घेणाऱ्या बापाला एक अगर अनेक औरसपुत्र झाले, तर औरसपुत्रापेक्षां दत्तकपुत्राचा कोणत्याहि प्रकारचा वारशाचा हक्क कमी होऊन प्रत्येक औरसपुत्रास जो भाग मिळेल त्याचा $\frac{1}{5}$ एकपंचमांश दत्तकपुत्रास मिळूं शकेल.

**खुलासा:**—याप्रमाणें मागाहून जन्मलेला औरसपुत्र जर नंतर एकत्रपणांतच कांहीं संततीशिवाय मरण पावेल तर दत्तकपुत्राला मागें

जिवंत राहिल्याच्या सबबीवर दत्तकबापाच्या मिळकतीवर जे हक्क प्राप्त होतील त्यास कांहीं बाध येणार नाहीं.

अपवाद :—दत्तकबापाच्या अविभाज्य मिळकतीसंबंधीं औरस आणि दत्तकपुत्र यांपैकीं फक्त औरसपुत्राला वारशाचा हक्क प्राप्त होईल.

दत्तक आणि अनौरस पुत्र.

२७. एखाद्या कुटुंबाच्या दत्तकपुत्राबरोबर अनौरस पुत्र वारशाचा दावा करीत असेल तेव्हां दत्तकपुत्रास औरसपुत्र समजून औरस आणि अनौरसपुत्र यांमध्यें वारशासंबंधीं जे नियम लागू असतील तेच नियम दत्तकपुत्राच्यासंबंधीं लागू पडतील

द्वयामुष्यायणाचे वारशाचा हक्क.

२८. द्वयामुष्यायण दत्तकपुत्रास

(क) जनक बापाचे कुटुंबांतील वारशाचा आणि सहभागिदारांचा परस्पर हक्क आणि धर्मक्रिया करण्याचा वगैरे सर्व हक्क आणि जबाबदाऱ्या कायम राहून.

(ख) दत्तक घेणाराच्या कुटुंबामध्यें दत्तकपुत्राचे सर्व हक्क आणि जबाबदाऱ्या प्राप्त होतात.

द्वयामुष्यायण आणि मागाहून जन्मलेला औरसपुत्र.

२९. द्वयामुष्यायण दत्तक झाल्यावर

(क) जर त्याचे जनक बापाला एक अगर अनेक औरसपुत्र होतील तर दरएक औरसपुत्रास जो हिस्सा मिळेल त्याचा अर्धा हिस्सा द्वयामुष्यायणाला मिळूं शकेल.

(ख) जर दत्तक घेणाऱ्या बापाला एक अगर अनेक औरस पुत्र होतील तर त्या कुटुंबामध्यें तशा स्थितींत दत्तक पुत्राला जो हिस्सा मिळूं शकेल त्याचे निम्मा हिस्सा द्वयामुष्यायणाला मिळूं शकेल; आणि

(ग) जर जनक आणि दत्तक कुटुंब या दोहोंमध्यें औरसपुत्र जन्मास येईल तर फक्त दत्तक घेणाराचे कुटुंबाचेमध्येंच द्वयामुष्यायणाचे वारशाचा हक्क कायम राहून त्याला अशा स्थितीमध्यें दत्तकपुत्रास जो भाग मिळेल तितकाच भाग मिळूं शकतो.

मिळकतीच्या झालेल्या व्यवस्थेसंबंधीं दत्तकाचा अधिकार.

३०. (१) दत्तविधान होण्यापूर्वी

(क) दत्तक घेणार बापानें मिळकतीसंबंधीं

(१) बक्षीस, खेरदी वगैरे केलेल्या सर्व व्यवहारांना आणि

(२) मृत्युपत्रावरून केलेल्या आणि अमलांत आलेल्या सर्व व्यवहारांना, त्याचप्रमाणें

(ख) दत्तक घेणार स्त्रीनें मिळकतीसंबंधीं

(३) स्त्रियेच्या मर्यादित अधिकाराला अनुसरून केलेल्या कोणत्याहि व्यवहारास,

मागाहून दत्तकपुत्र घेतल्याकारणानें कोणत्याहि प्रकारचा बाध येऊं शकणार नाहीं.

(२) परंतु दत्तक घेणार स्त्रीनें अनधिकारानें कांहीं व्यवहार केला असेल तर जितक्या पुरता तो व्यवहार अनधिकाराचा असेल तितक्या पुरता तो रद्द करून घेण्याचा दत्तकपुत्राला अधिकार आहे.

(३) दत्तविधान होण्यापूर्वी दत्तकबापानें स्त्रीला कांहीं मिळकत बक्षीस अगर मृत्युपत्रावरून दिली असेल आणि त्यानंतर त्या बायकोनें दत्तकपुत्र घेतला असेल तर त्या मिळकतीसंबंधीं दत्तक घेणाऱ्या आईचा अधिकार इतर उत्तराधिकारी यांचेसंबंधीं जितक्यापुरता मर्यादित मानला जाईल तितक्यापुरताच दत्तकपुत्रासंबंधीं मर्यादित मानला जाईल.

निविष्ट झालेल्या हक्कांवर दत्तकांचा अधिकार.

३१. (क) विधवेनें घेतलेला दत्तकपुत्र
(१) खुद्द त्या विधवेचे, आणि
(२) तिच्या सहविधवेचे,

(ख) अविभक्त कुटुंबामध्यें विधवेनें घेतलेला दत्तकपुत्र
(३) सहभागिदाराचे, आणि

(ग) दुसऱ्या कोणत्याहि वारसाचे संमतीनें घेतलेला दत्तकपुत्र
(४) अशी संमति देणाऱ्या इसमांचे,

दत्तक बापाच्या मिळकतीवर प्राप्त झालेलें स्वत्व स्वतः घेऊं शकतो.

मृत्युपत्रानें व्यवस्था केलेल्या वडिलोपार्जित मिळकतीवर दत्तकाचा अधिकार.

३२. वडिलोपार्जित कांहीं मिळकत दत्तक घेणाऱ्या बापानें कांहीं मृत्युपत्रावरून दुसऱ्या कोणी इसमास लिहून दिली असेल तेव्हां

(क) मृत्युपत्रानें याप्रमाणें लिहून दिलेल्या भागावर दत्तकपुत्राचा कांहीं हक्क प्राप्त होणार नाहीं, अशी दत्तकपुत्र सज्ञान असेल तर त्याचेबरोबर शर्थ करून, अगर

(ख) अज्ञान दत्तकपुत्रासंबधीं त्याला दत्तक देणार जनक बापाची अगर मातेची स्पष्ट समजूत करून आणि तशी त्यांची संमति घेऊन,

दत्तकपुत्र घेण्यांत आला नसेल तर त्या दत्तकपुत्राविरुद्ध त्या मृत्युपत्राचा अम्मल होऊं शकणार नाहीं.

दत्तकाच्या सम्मतीनें मिळकतीची व्यवस्था करण्याबाबदचा करार.

३३. दत्तक घेतेवेळीं
(क) सज्ञान दत्तक होणाऱ्या मुलाचे अगर
(ख) अज्ञान दत्तक होणाऱ्या मुलाचे बाबतींत त्याचे दत्तक देणार जनक बापाचे अगर आईचे

स्पष्ट संमतीनें दत्तकपुत्र या नात्यानें त्याचे हक्कावर परिणाम होईल अशी मिळकतीची कांहीं व्यवस्था करण्याचा कांहीं करार केला असेल आणि तो करार इतर रीतीनें योग्य आणि न्यायाचा असेल तर त्यास या निबंधांतील कोणत्याही ठरावावरून बाध येणार नाहीं.

उदाहरणें:—(१) अ नांवाच्या सज्ञान वयाचे इसमास ब दत्तक घेतो व दत्तक घेते वेळीं त्याचे बरोबर करार करतो कीं, आपल्या वडिलोपार्जित मिळकतीपैकीं एक घर तो आपल्या मुलीच्या मुलास बक्षीस देईल, त्यांत अचा कोणत्याही प्रकारचा हक्क पोहोंचणार नाहीं. अशा करारास अ सम्मती देतो हा करार अला बंधनकारक आहे.

(२) अ नांवाच्या अज्ञान मुलास ब नांवाची विधवा आपल्या नवऱ्यानंतर दत्तक घेते आणि अची दत्तक देणारी आई ड इजबरोबर करार करते कीं, मी आपले हयातीपर्यंत आपले नवऱ्याची सर्व मिळकत आपले ताब्यांत ठेवीन. या करारास ड सम्मती देते. हा करार अला बंधनकारक आहे.

दत्तक आईचा वारशाचा हक्क.

३४. एखाद्या इसमाच्या अनेक बायका असतील तर त्यांपैकीं कोणत्याही बायकोला मुख्य पद दिल्याशिवाय त्या इसमानें दत्तकपुत्र घेतला असेल तर त्या दत्तकपुत्राचे मिळकतीसंबंधीं त्या सगळ्या बायकांना माता या नात्यानें सारख्या रीतीनें वारशाचा हक्क प्राप्त होतो.

अनेक आईपैकीं दत्तक आईचा वारशाचा हक्क.

३५. कोणत्याही इसमास अनेक बायका असतील त्यांपैकीं

(क) एखाद्या बायकोला प्रधानपद देऊन त्या इसमानें आपले हयातींत दत्तकपुत्र घेतला असेल, अगर

(ख) त्या इसमाच्या मरणानंतर त्याच्या अनेक विधवांपैकीं एखाद्या विधवेनें दत्तक पुत्र घेतला असेल,

तेव्हां ती स्त्री दत्तक माता आणि बाकीच्या स्त्रिया सापत्न माता असें मानून दत्तकपुत्राच्या मिळकतीसंबंधीं त्यांचा वारशाचा हक्क नक्की करण्यांत येईल.

# बाब ७ वी.

## फिरकोळ.

बेकायदेशीर दत्तविधानाचे परिणाम.

३६. (१) या निबंधांतील ठरावाविरुद्ध जर दत्तकपुत्र घेण्यांत आला असेल तर तो दत्तक निरर्थक समजावा.

(२) अशा दत्तकपुत्रास दत्तक कुटुंबामध्यें कांहींहि हक्क प्राप्त होत नाहीं.

दत्तक न घेण्याबद्दल अगर तहकूब ठेवण्याबद्दल करार.

३७. (१) दत्तकपुत्र न घेण्याबद्दल अगर दत्तक घेण्याचे तहकूब राखण्याबद्दलचा करार निरुपयोगी आहे.

(२) एकदां दत्तविधान पूर्ण आणि कायदेशीर झालें ह्मणजे तें रद्द करितां येणार नाहीं, अगर त्याचा अम्मल तहकूब करितां येणार नाहीं.

# अविभक्त हिंदू कुटुंबाविषयीं निबंध.

उद्देश

हिंदुधर्मशास्त्रांतील अविभक्त हिंदू कुटुंबासंबंधींच्या मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा केला आहे:—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

संज्ञा.

१. (१) या निबंधाला "अविभक्त हिंदू कुटुंबासंबंधीं निबंध" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति.

(२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

सुरवात.

२. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यामध्यें अविभक्त हिंदू कुटुंबासंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतीरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेट-मध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ यानें अगर इतर कोणत्याहि नियमानें कोणत्याहिप्रकारें बाध येणार नाहीं.

व्याख्या. ३. या निबंधांत विषयावरून अगर पूर्वापार संबंधानें बाध येत नसेल, तर

(क) पुत्र या शब्दांत नातू आणि पणतू यांचा समावेश होतो. मग तो औरस असो, किंवा कायदेशीर दत्तक घेतलेला असो.

(ख) अनंश, अप्रतिबंध बारसा आणि सप्रतिबंध वारसा, या शब्दांचा अर्थ हिंदूवारशाचे निबंधांत या शब्दाची व्याख्या ज्याप्रमाणें केली आहे त्याप्रमाणें होतो.

---

# बाब २ री.

## अविभक्त कुटुंब.

अविभक्त कुटुंब ४. सहभागिदार आणि समाश्रित मिळून अविभक्त कुटुंब होतें.

सहभागीदार ५. अविभक्त कुटुंबांत राहणाऱ्या एका मूळ पुरुषाचे पुरुष वंशज आणि जिवंत असेल तर तो मूळ पुरुष हे सहभागीदार मानले जातात; परंतु एकाच वेळीं एखाद्या वंशजाचे पणजाचा बाप जिवंत असेल आणि तो सहभागीदार असेल, तर असा वंशज सहभागीदार होऊं शकत नाहीं. परंतु असा वंशज पणजाच्या बापाच्या मरणानंतर जर त्याचा बाप आजा अथवा पणजा जिवंत असेल तर त्यावेळीं सहभागीदार होतो.

खुलासा:—वंशजामध्यें दत्तक वंशजाचा समावेश होतो.

समाश्रित. ६. सहभागीदारांच्या

(क) बायका,

(ख) आई, आज्या, आणि पणज्या,

(ग) अविवाहित कन्या,

(घ) दासीपुत्र आणि

(ङ) मयत सहभागीदारांच्या विधवा,

(च) मयत सहभागिदारांच्या ज्या रक्षा त्यांच्या हयातीपर्यंत एकत्र कुटुंबांत राहिल्या असतील त्या, आणि

(छ) अनंश, त्यांच्या बायका विधवा, आणि अविवाहीत कन्या, यास सहभागीदार मानीत नाहींत; परंतु तीं अविभक्त कुटुंबांतील समाश्रित मानली जातात.

खुलासाः—(१) अनंशाचे पुत्र हे स्वतः अनंश नसतील तर कलम ५ यांतील ठरावास पात्र राहून सहभागिदार होऊं शकतात.

(२) जी स्त्री मयत सहभागिदाराबरोबर लग्न करून त्याची स्त्री ह्मणून राहिली असेल, परंतु जिचें लग्न कायद्याप्रमाणें निरर्थक होत असेल ती स्त्री या कलमाचे अर्थाअन्वयें रक्षा मानली जाते.

---

# बाब ३ री.

## सहभागीदारांची मिळकत.

सहभागीदाराची स्वार्जित मिळकत केव्हां मानली जाते.

७. (१) कुटुंबाचे समाईक मिळकतीचा व्यय न होतां स्वतंत्र रीतीनें प्रत्येक सहभागीदारानें

(क) (१) स्वतः जर विशिष्ट विद्या अगर कलाकौशल्य समाईक मिळकतीच्या खर्चानें मिळविलें नसेल, त्या विद्येचे किंवा कलाकौशल्याच्या मदतीनें,

(२) अविशिष्ट विद्या किंवा कलाकौशल्य समाईक मिळकतीचे खर्चानें किंवा खर्चाशिवाय मिळविले असेल तर त्या विद्येचे अगर कलाकौशल्याचे मदतीनें,

(३) शौर्यानें,

(४) आपल्या मित्राकडून मिळालेल्या बक्षिसानें अथवा

(५) लग्नाचे वेळीं मिळालेल्या बक्षिसानें,

जी मिळकत संपादन केली असेल ती मिळकत;

(ख) एखाद्या तिऱ्हाईत माणसानें हरण केलेली वडिलोपार्जित जंगम मिळकत स्वतः पुन्हां संपादन केलेली असेल ती मिळकत;

(ग) आईबापानीं किंवा त्या सहभागीदारांच्या वडिलांनीं प्रीतीनें जें बक्षीस दिलें असेल त्या बक्षीस रूपानें मिळविलेली मिळकत;

(घ) सप्रतिबंध वारशानें मिळालेली मिळकत;

(ङ) वर सांगितलेल्या तमाम मिळकतींमधून जें उत्पन्न झालें असेल, आणि त्याचे मदतीनें जी मिळकत मिळविली असेल तें उत्पन्न आणि ती मिळकत; आणि

(च) संपादन केलेली इतर मिळकत जी मुकदम्यांतील विशेष हकीकतीवरून न्यायाधीश स्वार्जित ठरवील ती मिळकत,

संपादन करणाऱ्या सहभागीदाराची स्वार्जित मिळकत मानली जाते आणि तिजवर इतर सहभागीदारांचा हक्क नाहीं.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, स्वसंपादित मिळकतीवरील आपला स्वतंत्र हक्क सोडून देण्याचे स्पष्ट अगर गर्भित हेतूनें कुटुंबाचे समाईक मिळकतींत सहभागीदार स्वसंपादित मिळकत बुद्धीपूर्वक एकत्र करील तर त्या मिळकतीचा स्वसंपादितपणा नष्ट होतो.

कोणती मिळकत अविभक्त कुटुंबाची समाईक मिळकत मानली जाईल.

८. (क) एकाच सामान्य पूर्वजाकडून पुरुष वंशजाकडे परंपरेनें आलेली, अथवा

(ख) कलम ७ मध्यें दर्शविलेल्या रीतीशिवाय इतर रीतीनें संपादन केलेली, आणि

(ग) तिचे अगर तिचे उत्पन्नाचे सहाय्यानें मिळविलेली, अगर

(घ) तिचे उपयोगानें किंवा मोबदल्यानें प्राप्त झालेली,

मिळकत अविभक्त कुटुंबाची समाईक मानली जाते.

कुटुंबाची नष्ट झालेली आणि पुन्हां प्राप्त झालेली मिळकत.

९. समाईक मिळकतीवरील कुटुंबाचा हक्क नष्ट होऊन ती दुसऱ्या कोणाकडे जाईल आणि तोच इसम फिरून तीच मिळकत अगर तिचा कांहीं भाग कुटुंबांतील एखादे सहभागीदाराला परत देईल तर तेवढ्यावरूनच मात्र ती मिळकत कुटुंबाची समाईक मिळकत होत नाहीं.

---

# बाब ४ थी.

## समाईक मिळकतींत सहभागीदारांचे परस्पर हक्क व जबाबदाऱ्या.

सहभागीदाराचे परस्पर हक्क.

१०. सर्व सहभागीदार कुटुंबाचे समाईक मिळकतीचे समाईक मालक आहेत; परंतु तिचे वांटप होईपर्यंत त्या मिळकतींतील किंवा तिच्या कोणत्याही भागांतील किंवा तिचे उत्पन्नांतील अमूक एक निश्चित भागाचा अथवा तिच्या स्वतंत्र हितसंबंधाचा स्वतंत्र रीतीनें कबजा मिळविणेचा आणि त्याचा स्वतःच उपभोग घेण्याचा कोणत्याही एका सहभागीदारास हक्क नाहीं.

११. एखादा सहभागीदार मरण पावेल तर त्याचा समाईक मिळकतींतील अनिश्चित हितसंबंध त्याचा अविभक्त मुलगा, नातू, आणि पणतू, जर हयात असतील तर त्याजकडे जातो आणि त्यांचे अभावीं इतर सहभागिदाराकडे वांटपाचे नियमास अनुसरून जातो.

एखाद्या सहभागीदाराच्या मरणानंतर त्याचा हितसंबंध कोणत्या रितीनें दुसऱ्याकडे जातो.

कोणत्या प्रकारचा खर्च सहभागिदाराला समाईक मिळकतींतून मिळूं शकेल.

१२. सहभागीदारास समाईक मिळकतींतून

(क) (१) स्वतःकरितां,

(२) स्वतःचे बायकोकरितां,

(३) स्वतःचे मुलाकरितां, आणि

(४) स्वतः ज्यांचें पालनपोषण करण्यास बांधला गेला असेल त्यांचेकरितां.

पालनपोषणाचा, आणि

(ख) स्वतः अगर रक्कम (क) मध्यें दर्शविलेल्या इतर इसमानीं करावयाच्या नेहमींच्या आणि योग्य धर्मक्रिया आणि संस्कार करण्याचा,

(ग) आपल्या मुलांचे शिक्षणाचा, आणि

(घ) स्वतःचे मुलीचे आणि आपल्या कुटुंबांतील इतर आश्रित स्त्रियांचे लग्नाचा,

कुटुंबाचे स्थित्यनुसार जरूरीचा खर्च मिळण्याचा हक्क आहे.

१३. कोणत्याहि सहभागीदाराला कुटुंबाचे समाईक मिळकतीमधून किंवा तिचे कोणत्याहि भागाचे समाईक कबज्यांतून, उपभोगांतून, आणि वहिवाटींतून काढून टाकण्याचा, अथवा अशा मिळकतीचे नुकसान करण्याचा अथवा तिचा स्वतः होऊन गैरकायदेशीर उपयोग करण्याचा

मिळकतीच्या उपयोगासंबंधीं सहभागिदारांचा हक्क.

अथवा त्या मिळकतीचे स्वरूपांत आणि तिचा उपयोग करण्याचे रीतींत फेरफार करण्याचा कोणत्याहि सहभागीदारास हक्क नाहीं.

अविभाज्य मिळकतींतून सहभागिदार आणि समाश्रित यांना मिळण्याचा हक्क आहे.

१४ अविभक्त कुटुंबाची मिळकत सर्वांशीं अथवा बऱ्याच भागानें अविभाज्य असून एकाच माणसाकडे जात असेल तेव्हां त्या कुटुंबाचे इतर समाश्रित इसमांना पालनपोषणासाठीं रक्कम मिळण्याचा आणि इतर इसम जे ती मिळकत अविभाज्य नसती तर सहभागिदार होऊं शकले असते त्या इसमांस कुटुंबाचे अब्रूप्रमाणें त्यांचें पालनपोषणाकरितां त्या मिळकतींतून स्वतंत्र नेमणूक घेण्याचा हक्क आहे.

सहभागिदारास हिशेब घेण्याचा किंवा हिस्सा मागण्यासाठीं हक्क नाहीं

१५. एकाद्या कुटुंबाचा अविभक्तपणा चालू राहील तेथपर्यंत कोणाहि सहभागीदारास इतर वहिवाट करणारे अगर न करणारे सहभागीदारापासून हिशेब घेण्यासाठीं अथवा स्पष्ट कराराच्या अभावीं स्वतः केलेल्या खर्चाबाबत इतर सहभागीदाराकडून हिस्सा मागण्यासाठीं फिर्याद करण्याचा हक्क नाहीं.

हिशेब मागण्याचा प्रकार.

१६. सहभागीदार,

(क) वांटप करावयाचे मिळकतीचें स्वरूप किंवा किंमत नक्की करण्यासाठीं, आणि

(ख) (१) कुटुंबाची समाईक मिळकत सहभागीदाराचे एकट्याचेच कबजांत असल्यामुळें, अथवा

(२) समाईक मिळकतीची तो वहिवाट करणार असतांहि त्याची वहिवाट कपटाची किंवा अविचाराची असल्यामुळें, अथवा

(३) इतर सहभागीदारांच्या अज्ञानपणांत स्वतः कपटपूर्वक अतिशय निष्काळजीचें अथवा उधळपट्टीचें वर्तन केल्यामुळें,

एखाद्या सहभागीदाराच्या मरणानंतर त्याचा हितसंबंध कोणत्या रितीनें दुसऱ्याकडे जातो.

११. एखादा सहभागीदार मरण पावेल तर त्याचा समाईक मिळकतींतील अनिश्चित हितसंबंध त्याचा अविभक्त मुलगा, नातू, आणि पणतू, जर हयात असतील तर त्याजकडे जातो आणि त्यांचे अभावीं इतर सहभागिदाराकडे वांटपाचे नियमास अनुसरून जातो.

कोणत्या प्रकारचा खर्च सहभागिदाराला समाईक मिळकतींतून मिळूं शकेल.

१२. सहभागीदारास समाईक मिळकतींतून

(क) (१) स्वतःकरितां,

(२) स्वतःचे बायकोकरितां,

(३) स्वतःचे मुलाकरितां, आणि

(४) स्वतः ज्यांचें पालनपोषण करण्यास बांधला गेला असेल त्यांचेकरितां.

पालनपोषणाचा, आणि

(ख) स्वतः अगर रकम (क) मध्यें दर्शविलेल्या इतर इसमानीं करावयाच्या नेहमींच्या आणि योग्य धर्मक्रिया आणि संस्कार करण्याचा,

(ग) आपल्या मुलांचे शिक्षणाचा, आणि

(घ) स्वतःचे मुलींचे आणि आपल्या कुटुंबांतील इतर आश्रित स्त्रियांचे लग्नाचा,

कुटुंबाचे स्थित्यनुसार जरूरीचा खर्च मिळण्याचा हक्क आहे.

मिळकतीच्या उपयोगासंबंधीं सहभागिदारांचा हक्क.

१३. कोणत्याहि सहभागीदाराला कुटुंबाचे समाईक मिळकतीमधून किंवा तिचे कोणत्याहि भागाचे समाईक कबज्यांतून, उपभोगांतून, आणि वहिवाटींतून काढून टाकण्याचा, अथवा अशा मिळकतीचे नुकसान करण्याचा अथवा तिचा स्वतः होऊन गैरकायदेशीर उपयोग करण्याचा

अथवा त्या मिळकतीचे स्वरूपांत आणि तिचा उपयोग करण्याचे रीतींत फेरफार करण्याचा कोणत्याहि सहभागीदारास हक्क नाहीं.

अविभाज्य मिळकतींतून सहभागिदार आणि समाश्रित यांना मिळण्याचा हक्क आहे.

१४ अविभक्त कुटुंबाची मिळकत सर्वांशीं अथवा बऱ्याच भागानें अविभाज्य असून एकाच माणसाकडे जात असेल तेव्हां त्या कुटुंबाचे इतर समाश्रित इसमांना पालनपोषणासाठीं रक्कम मिळण्याचा आणि इतर इसम जे ती मिळकत अविभाज्य नसती तर सहभागिदार होऊं शकले असते त्या इसमांस कुटुंबाचे अन्नप्रमाणें त्यांचें पालनपोषणाकरितां त्या मिळकतींतून स्वतंत्र नेमणूक घेण्याचा हक्क आहे.

सहभागिदारास हिशेब घेण्याचा किंवा हिस्सा मागण्यासाठीं हक्क नाहीं

१५. एकाद्या कुटुंबाचा अविभक्तपणा चालू राहील तेथपर्यंत कोणाहि सहभागीदारास इतर वहिवाट करणारे अगर न करणारे सहभागीदारापासून हिशेब घेण्यासाठीं अथवा स्पष्ट कराराच्या अभावीं स्वतः केलेल्या खर्चाबाबत इतर सहभागीदाराकडून हिस्सा मागण्यासाठीं फिर्याद करण्याचा हक्क नाहीं.

हिशेब मागण्याचा प्रकार.

१६. सहभागीदार,

(क) वांटप करावयाचे मिळकतीचें स्वरूप किंवा किंमत नक्की करण्यासाठीं, आणि

(ख) (१) कुटुंबाची समाईक मिळकत सहभागीदाराचे एकट्याचेच कबजांत असल्यामुळें, अथवा

(२) समाईक मिळकतीची तो वहिवाट करणार असतांहि त्याची वहिवाट कपटाची किंवा अविचाराची असल्यामुळें, अथवा

(३) इतर सहभागीदारांच्या अज्ञानपणांत स्वतः कपटपूर्वक अतिशय निष्काळजीचें अथवा उधळपट्टीचें वर्तन केल्यामुळें,

उत्पन्न झालेली जबाबदारी नक्की करण्यासाठीं, कुटुंबाचे समाईक मिळकतीचें वांटप करते वेळीं हिशेब मागूं शकेल.

---

# बाब ५ वी.

## इतर माणसासंबंधीं सहभागीदारांचे हक्क व जबाबदाऱ्या.

कर्ता कोणास ह्मणावा.

१७. सहभागीदारांपैकीं कोणीही एक कुटुंबाचे मिळकतीची वहिवाट करूं शकतो आणि इतर इसमासंबंधीं कुटुंबाचा व्यवहार चालवूं शकतो, अशा सहभागीदाराला कर्ता ह्मणतात.

कर्त्यानें केलेल्या दावा वगैरेनें इतर सहभागीदारावर होणारा परिणाम.

१८. कलम १९, २० आणि २१ यांतील ठरावास पात्र राहून,

(क) कुटुंबाचा कर्ता सर्व कुटुंबाच्या वतीनें एकादा दावा आणील,

अथवा

(ख) कुटुंबाचे कर्त्यावर त्यानें आपल्या अधिकारास अनुसरून सर्व कुटुंबाकरितां केलेल्याव्यवहाराचे बाबतींत दावा करण्यांत येईल तर, अथवा सर्व कुटुंबाविरुद्ध दाव्याचें कारण होऊन कर्त्याविरुद्ध त्यांचा प्रतिनिधी ह्मणून दावा करण्यांत येईल,

तेव्हां जर त्या कुटुंबाचे तर्फेनें त्या कर्त्यानें पूर्ण आणि योग्य तऱ्हेनें दाव्याचें काम चालविलें असेल तर त्या दाव्यांत झालेले हुकूम आणि दाव्यासंबंधींचे नंतरचे सर्व हुकूम, बजावण्या वगैरे सर्व सहभागीदारांना ते पक्षकार आहेत अशारीतीनें बंधनकारक होतात.

## दृष्टांत

(१) अ, ब, क यांचे हातांत त्यांचे वडिलांचा धंदा आला. अ, ब त्याची वहिवाट करित होते. धंद्यासंबंधींचें देणें देण्याकरितां अ आणि ब ह्यांनीं कुटुंबाची कांहीं मिळकत ड ला गहाण दिली त्या वेळीं क हा अज्ञान होता. डनें अ आणि ब यांजवर गहाण-खतावरून दावा आणिला आणि ती गहाण ठेविलेली मिळकत स्वतः बजावणीमध्यें खरेदी केली.

यांत जरी क गहाणखतांत किंवा दाव्यांत पक्षकार नव्हता तरी सदरहू विक्रीवरून कचा त्या मिळकतींतील हितसंबंध डला प्राप्त होतो.

(२) एका हिंदू कुटुंबाचे समाईक मालकीच्या कांहीं जमिनीच्या आकार बाकी पोटीं अ इसमानें त्या कुटुंबाचा वहिवाट करणार आणि त्या जमिनीचा कबजेदार ब यांजवर दावा आणिला हुकूमनाम्याच्या बजावणींत ती जमीन विकण्यांत आली.

यांत देण्याची जबाबदारी सर्व कुटुंबाची असल्यामुळें सर्व कुटुंबाचा त्या जमिनीवरील हितसंबंध त्या जमिनीचे खरेदीदारास प्राप्त होतो.

(३) अ नांवाचा वहिवाट करणार इसम कुटुंबाची गहाण ठेविलेली मिळकत सोडविण्याकरितां दावा आणितो. गहाण शाबीद करण्या-करितां पुरावा दाखल करण्याच्या ऐवजी प्रतिवादी कायदेशीर शपथ घेईल तर आपणास ती बंधनकारक आहे असें अ कबूल करितो. प्रतिवादीनें त्याप्रमाणें शपथ घेतल्यावरून दावा नामंजूर झाला.

यांत दाव्याचें काम योग्य आणि पूर्णपणें चालविण्यांत न आल्या-मुळें तो हुकूमनामा कुटुंबास बंधनकारक होत नाहीं; परंतु जर या कामांत वहिवाट करणाऱ्यानें प्रतिवादीच्या शपथेवर मात्र आधार न ठेवितां पंचमार्फत निकाल करण्याचें अथवा तडजोड करण्याचें कबूल केलें असेल तर तें काम त्या कारणावरूनच कुटुंबाचे इतर सहभागी-दारास बंधनकारक नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

(४) वरील दृष्टांतांत दावा करणार वहिवाट करणारा नसेल अगर त्यानें कुटुंबाच्यातर्फे दावा आणिला नसेल तर दाव्याचें काम योग्यरितीनें चाललें असेल तरी पण, त्याचा निकाल सर्व कुटुंबास बंधनकारक होत नाहीं.

कोणत्या व्यवहारांनीं कुटुंबाच्या जातीवर अगर मिळकतीवर जबाबदारी पडत नाहीं.

१९. (क) सर्व भागीदार ज्या व्यवहारांत भाग घेतात अथवा जो व्यवहार करण्यास ते स्पष्ट संमति देतात तो व्यवहार आणि

(ख) २० व्या कलमांत सांगितलेल्या कोणत्याहि कारणास्तव वस्तुतः किंवा कायदेशीर वहिवाट करणाराबरोबर एखादा व्यवहार करण्यांत आला असेल आणि इतर सहभागीदारांनीं त्याकरितां गर्भित संमति दिली असेल, अथवा मागाहून कबूल केला असेल तो व्यवहार

या शिवायचे इतर व्यवहारावरून सर्व कुटुंबाचे जातीवर अगर मिळकतीवर जबाबदारी उत्पन्न होत नाहीं.

### दृष्टांत

(१) अ नांवाचा सहभागीदार दुसऱ्या हयात ब नांवाच्या भागीदाराच्या संमतीशिवाय एका मयत सहभागीदाराचे रक्षेस एक शेत बक्षीस देतो.

यांत बला ती मिळकत परत मिळण्याचा हक्क आहे. कारण त्याचे संमतीशिवाय ती बक्षीस देण्यांत आली होती.

(२) अ आणि ब सावत्र भाऊ आहेत आणि ते अविभक्त कुटुंबांत राहतात. ब अभ्यासाकरितां परदेशी जातो, आणि अला कुटुंबाचे धंद्याची वहिवाट सोंपून जातो. अला बच्या बहिणीचे लग्नाकरितां आणि कुटुंबाचा धंदा चालविण्याकरितां पैशाची जरूर आहे ह्मणून कुटुंबाचे मालकीचें एक घर कला विकून टाकतो.

यांत व कडून तें घर मिळण्याचा कला हक्क आहे कारण कीं, घर कुटुंबाचे जरूरीकरितां विकण्यांत आलें आणि अला कुटुंबाचे कृत्यासाठीं आणि कुटुंबाचे धंद्याचे वहिवाटीसाठीं ठेवण्यांत आला होता. ह्मणून अच्यासंबंधानें सदर्हू व्यवहाराकरितां बची गर्भित संमति मानली पाहिजे.

सहभागीदारास कोणतीं कृत्ये करण्याचा अधिकार आहे.

२०. (१) इतर सहभागीदार अज्ञान असल्यामुळें किंवा इतर कारणामुळें संमति देण्यास असमर्थ असतील तेव्हां, तशा संमतीशिवाय वस्तुतः किंवा कायदेशीर रीतीनें वहिवाट करणार एक अथवा अधिक सहभागीदारास

(क) कुटुंबाच्या फायद्यासाठीं अगर कायदेशीर जरूरीचे कारणासाठीं किंवा कुटुंबाचे मिळकतीचे फायद्यासाठीं सर्व व्यवहार,

(ख) अविभक्त कुटुंबाचें पालनपोषणासाठीं जरूरीचा व्यवहार,

(ग) कुटुंबाचे समाईक मिळकतीच्या रक्षण आणि वहिवाटीसाठीं जरूरीचे व्यवहार व कृत्यें,

(घ) अवश्य धर्मक्रिया,

(ङ) सहभागीदारांची त्याच्या मुलींची आणि अनंशाची आणि अनंशाच्या मुलींचीं लग्नें अगर इतर संस्कार करण्यासाठीं जरूर ते व्यवहार आणि कृत्यें,

करण्याचा अधिकार आहे.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं अशा व्यवहारानींच पोटकलम [१] मध्यें दर्शविलेल्या असमर्थ सहभागीदारांच्या जातीवर कोणतीहि जबाबदारी उत्पन्न होत नाहीं.

२१. (१) साधारण जाणता मनुष्य आपल्या मिळकतीवर अगर जातीवर विविक्षित प्रसंगीं जितकी जबाबदारी घेऊं शकेल तितकीच जबाबदारी कलम (२०) प्रमाणें अविभक्त कुटुंबाच्या एखाद्या मिळकतीचे स्वत्वार्पण करण्यांत आलें असेल, अगर अविभक्त कुटुंबाकरितां कांहीं कर्ज केलें असेल तर त्या व्यवहाराकरितां कुटुंबावर पडेल.

कोणता व्यवहार कुटुंबास केवळ्यापुरता बंधनकारक आहे.

(२) परंतु स्वत्वार्पण स्वीकारणार अथवा सावकार तो व्यवहार कायदेशीर होईल अशी स्थिति असल्याबद्दलची योग्य काळजीपूर्वक खात्री करून घेऊन शुद्ध बुद्धीनें वागला असेल, तर असा व्यवहार कलम २० प्रमाणें झाला आहे असें धरून सर्व कुटुंबास बंधनकारक होईल.

२२. (१) एकादा सहभागीदार कुटुंबाची सर्व समाईक मिळकत अथवा तिचा भाग यांवरील आपला हितसंबंध अथवा समाईक मिळकतींतील कांहीं विविक्षित मिळकत कायदेशीर मोबदला घेऊन देऊन टाकील तेव्हां आणि त्याचे खासगी देण्यामुळें किंवा जबाबदारीमुळें झालेल्या हुकूमनाम्याचे बजावणींत वर सांगितलेला हितसंबंध किंवा विविक्षित मिळकत विकण्यांत येईल तेव्हां असें सत्वार्पण स्वीकारणारास किंवा खरेदीदारास त्या मिळकतीचा समाईक कबजा मिळण्याचा हक्क नाहीं; परंतु समाईक मिळकतीचे वांटपांत त्या सहभागीदाराच्या भागास जो हिस्सा येईल त्यांतून तो हितसंबंध प्राप्त करून घेणेचा त्याला हक्क असतो.

सत्वार्पण केलेली अगर विकलेली मिळकत कोणत्या रीतीनें प्राप्त करतां येईल.

(२) परंतु वर लिहिल्याप्रमाणें वांटप खालीलप्रमाणें करणेंचे आहे :—

(क) सत्वार्पण करणाऱ्या सहभागीदाराचा हिस्सा जर एकादा नवीन सहभागीदार जन्मल्यानें कमी होत असेल तर त्या कामीं झालेल्या हिश्यापुरताच त्या

खरेदीदाराचा हक्क राहील. परंतु जर एकादा सहभागीदार मयत झालेमुळें तो हिस्सा वाढला असेल, तर त्या खरेदीदाराचा हक्क त्या वाढलेल्या हिश्यावर राहणार नाहीं.

(३) इतर प्रथम स्वत्वार्पणानें घेणारास अगर हक्क खरेदी करणारास अन्याय होत नसेल तर तीं स्वत्वार्पण केलेली किंवा विकलेली विविक्षित मिळकत त्या सहभागीदाराच्या हिश्यांतच गेली पाहिजे.

सहभागीदारांचा सहभागीदारपणा हितसंबंध देऊन टाकल्यानें नष्ट होत नाहीं.

२३. एकाद्या सहभागीदाराचा समाईक मिळकतींतील हितसंबंध एखाद्या दुसऱ्या इसमास कायदेशीर रीतीनें देण्यांत आला असेल अथवा विकून टाकण्यांत आला असेल तेवढ्यावरूनच त्याचा सहभागीदारपणा नष्ट होत नाहीं.

सहभागीदारावर काम अगर बजावणी कोणत्या रीतीनें चालवितां येईल.

२४. एखादा सहभागीदार मयत झाल्यानें,

(क) त्या सहभागीदारास कायदेशीर मोबदला देऊन समाईक मिळकतींतील कांहीं मिळकत स्वत्वार्पणानें घेणारास किंवा त्याचा हक्क खरेदी करणारास कलम २२ प्रमाणें तजवीज करण्यास आणि

(ख) त्या सहभागीदाराचे जातीवरील हुकूमनाम्याचे बजावणींत समाईक मिळकत किंवा तिचा भाग किंवा त्यावरील हितसंबंध त्याच्या हयातींत जप्त करण्यांत आला असेल तेव्हां त्या बजावणीचें काम पुढें चालविण्यास

हरकत येत नाहीं.

कर्त्यानें केलेला करार केव्हां रद्द करतां येईल.

२५. कर्त्यानें अथवा कर्ता ह्मणून एखाद्या सहभागीदारानें कपटाचा व्यवहार केला असेल तेव्हां सहभागीदारांपैकीं कोणाही एकाला तो रद्द करवून घेण्याचा हक्क आहे.

---

## बाब ६ वी.

### समाश्रित इसमांचे हक्क.

अनंश केव्हां सहभागीदार होतो.

२६. मिळकतीचें वांटप होण्यापूर्वी अनंशाचे शारीरिक अगर मानसिक दोष दूर होतील तेव्हां तो सहभागीदार होतो. आणि वांटप झाल्यावर तो सदरहूप्रमाणें दोषरहित होईल तर दोषरहित होण्याचे वेळीं इतर सहभागीदारांच्या हातांत जी वाटलेली मिळकत असेल तितक्यापुरता त्यांतून आपला योग्य हिस्सा घेण्याचा त्यास हक्क प्राप्त होतो.

समाश्रितांचा समाईक मिळकतींतून अन्नवस्त्राचा हक्क.

२७. कलम ६ मध्यें सांगितलेल्या सर्व समाश्रितांना समाईक मिळकतींतून अन्नवस्त्र मिळणेचा हक्क आहे. आणि त्यांत दर्शविलेल्या मुलींना त्याचप्रमाणें लग्नाचा खर्च मिळण्याचा हक्क आहे; परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, त्यांत दर्शविलेल्या पत्नी, विधवा आणि रक्षा जर व्यभिचार करीत असतील तर त्यांचा हक्क नष्ट होतो.

विधवा आणि समाश्रित यांचा सहभागीदाराच्या मरणानंतर त्याची मिळकत घेणाऱ्याकडून अन्नवस्त्राबद्दलचा हक्क.

२८. मयत सहभागीदाराचे विधवेस आणि ज्यास त्यानें आपल्या हयातींत आपल्या कुटुंबांतील माणसें ह्मणून मानलें असेल अशा इतर समाश्रितांना, त्या सहभागीदाराच्या मरणानंतर त्याची मिळकत वारशानें मृत्युपत्रावरून किंवा अनुजिविक स्वत्वाच्या हक्कानें घेणार इसमाकडून अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क आहे. परंतु जर मयत सहभागीदारानें कांहीं मिळकत मागें ठेविली नसेल तर अथवा त्याची मागें राहिलेली मिळकत तो जिवंत असता तर जें कर्ज अथवा जबाबदारी आदा करण्यास पात्र जाहली असती तें कर्ज किंवा जबाबदारी आदा करण्यासाठीं त्याच्या मरणानंतर विकून टाकण्यांत आली असेल तर, अशा अन्नवस्त्राचा हक्क नष्ट होतो.

## दृष्टांत.

अ नांवाच्या एका हिंदुविधवेनें आपला सासरा आणि दीर याजवर अन्नवस्त्राचा दावा मांडला. सासऱ्याजवळ वडिलोपार्जित मिळकतीपैकीं एक लहानसें घर होतें, आणि तें घर त्यानें आपल्या देण्यापोटीं अच्या नवऱ्याच्या मरणानंतर विकून टाकलें होतें.

यांत अचा नवरा आपल्या हयातींत आपल्या बापाचें कर्ज देण्यासाठीं घराची विक्री होण्यास अटकाव करू शकला नसता म्हणून अ आपल्या नवऱ्याच्या हयात सहभागीदाराकडून स्वतंत्र अन्नवस्त्र मागण्यास हक्कदार होत नाहीं.

सहभागीदाराच्या विधवेला अन्नवस्त्रासाठीं निराळी नेमणूक.

२९. मयत सहभागीदाराची विधवा व्यभिचाराशिवाय इतर कोणत्याहि करणामुळें एकत्र कुटुंबापासून निराळी राहील अगर निराळी राहण्याची इच्छा करीत असेल तेव्हां जर,

(क) कुटुंबाची मिळकत एवढी मोठी असेल कीं, तींतून अन्नवस्त्रासाठीं निराळी नेमणूक तिला देतां येईल आणि

(ख) तिच्या नवऱ्यानें तिला कुटुंबांत राहण्याची आज्ञा केली नसेल अथवा नवऱ्यानें तशी आज्ञा केली असतांहि अविभक्त कुटुंबांत न राहण्यास तिला योग्य आणि पुरेसें कारण असेल,

तर तिला अन्नवस्त्राबद्दल निराळी नेमणूक मिळण्याचा हक्क आहे.

अन्नवस्त्र मिळणाराना घरांत राहण्याचा हक्क.

३०. अविभक्त कुटुंबांत कुटुंबाचे मालकीचें घर असेल तर त्या कुटुंबाचे मिळकतीवर ज्याचा अन्नवस्त्राचा बोजा पडतो त्यास त्या घरांत राहण्याचा पण हक्क आहे.

अन्नवस्त्राच्या हक्कानें बोजा उत्पन्न होत नाहीं.

३१. (१) अविभक्त कुटुंबाकडून घेण्याचे अन्नवस्त्राचे हक्कानें कुटुंबाचे मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा उत्पन्न होत नाहीं.

(२) परंतु मृत्युपत्र, करार, अथवा न्यायाधिशाचा हुकुमनामा यांवरून अशा हक्काचा कुटुंबाचे सर्व मिळकतीवर किंवा तिचे विविक्षित भागावर बोजा उत्पन्न होऊं शकतो.

(३) कुटुंबाचे समाईक मिळकतीवर अथवा तिचे भागावर अन्नवस्त्राचा बोजा टाकण्यांत न येईल तोंपर्यंत योग्य मोबदल्यानें कुटुंबाची समाईक मिळकत स्वत्वार्पणानें देणाऱ्या इसमानें अन्नवस्त्र मिळणाऱ्या इसमाचा हक नष्ट करण्याच्या इराद्यानें ती मिळकत स्वत्वार्पण करून दिली नसेल आणि असा हक आणि इरादा याबद्दल स्वत्वार्पण घेणाऱ्या इसमास खबर नसेल तर त्या स्वत्वार्पणानें घेणाऱ्या इसमावर अन्नवस्त्राची जरूरी पडत नाहीं.

मागाहून स्वत्वार्पण घेणारास अन्नवस्त्राचा बोजा केव्हांपुरता बंधनकारक आहे.

३२. कुटुंबांतील समाश्रित इसमाच्या कबज्यांत त्याच्या अन्नवस्त्राबद्दल कुटुंबाची समाईक मिळकत किंवा तिचा कांहीं भाग असेल अथवा तो कुटुंबाच्या घरांत रहात असेल, अथवा राहण्यासाठीं दिलेल्या कोणत्याही घरांत रहात असेल अथवा न्यायाधिशाच्या हुकूमनाम्यावरून किंवा रजिस्टर दस्तऐवजावरून, किंवा ज्याची स्वत्वार्पण घेणारास खबर असेल अशा करारावरून एखाद्या विवक्षित मिळकतीवर त्या अन्नवस्त्राचा बोजा टाकण्यांत आला असेल तर त्यानंतर होणाऱ्या सगळ्या स्वत्वार्पणामुळें त्यास त्या समाश्रितांचे हक्कास बाध येत नाहीं. परंतु कांहीं कर्ज किंवा जबाबदारी वडिलार्जित किंवा कुटुंबाची असल्यामुळें किंवा अन्य रीतीनें कुटुंबाचे मिळकतीवरील अन्नवस्त्राचे जबाबदारीपेक्षां श्रेष्ठ मानली असेल अथवा समाश्रित इसमाच्या संमतीनें अथवा स्वत्वार्पणानें घेणाराच्या हक्काविरुद्ध समाश्रिताकडून बांधा न

घेतला जाईल अशा कोणत्याही प्रसंगीं ते स्वत्वार्पण करण्यांत आले असेल तर त्या स्वत्वार्पणास बाध येत नाहीं.

### दृष्टांत

(१) अ नांवाच्या विधवेनें ब आणि क नांवाच्या आपल्या दिरावर दावा आणिला. मागाहून आपसांत समजूत झाल्यानें तडजोडीप्रमाणें हुकूमनामा करण्यांत आला कीं ब आणि क यांनीं अला दरमहा रुपये २० वीस अन्नवस्त्र ह्मणून द्यावे. आणि याच्या तारणादाखल अमूक विवक्षित मिळकत ठेवावी. हुकूमनामा झाल्यावर ब आणि क यानें तीच मिळकत ज्यास सदरहू तडजोडीची किंवा हुकूमनाम्याची खबर नव्हती अशा ड इसमास गहाण दिली. डनें त्या गहाणखतावरून अला पक्षकार केल्याशिवाय दावा आणून हुकूमनामा मिळविला. आणि बजावणींत तें घर स्वतः खरेदी घेतलें. मागाहून अनें डला ती मिळकत गहाण दिल्यानंतरचे अन्नवस्त्राचे बाकीसाठीं आपल्या हुकुमनाम्यापोटीं त्याच घराची विक्री करविली.

यांत अला तसें करण्याचा हक्क आहे. कारण कीं गहाणापूर्वी अन्नवस्त्राचा बोजा त्या घरावर ठेवण्यांत आला होता. आणि ती स्वतः जें देणें देण्याबद्दल जबाबदार असेल ते देण्याबद्दल तें घर गहाण टाकण्यांत आलें नव्हतें.

(२) बच्या नवऱ्यानें गहाण ठेवलेलें घर गहाण ठेवणार अ इसमानें बच्या नवऱ्याचे मरणानंतर त्यावर हुकुमनामा मिळवून विकलें. आणि ब त्यांत रहात आहे असें जाणूनसुद्धां स्वतःच तें खरेदी केलें.

यांत अच्या कर्जाचा हक्क बच्या अन्नवस्त्राच्या हक्कापेक्षां श्रेष्ठ आहे ह्मणून अला तें घर पूर्ण मालकीनें मिळतें.

३३. या निबंधाचे कोणत्याहि कलमाप्रमाणें एखाद्या मिळकतींतून जो अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क आहे त्याबद्दलचा हक्क

अन्नवस्त्राच्या हक्काचा कित्येक प्रसंगीं अबाधितपणा.

(क) अविभक्त कुटुंबांत एकच सहभागीदार अवशिष्ट राहिला या कारणामुळें

(ख) एखादी मिळकत अवशिष्ट राहिलेल्या शेवटच्या सहभागीदाराच्या वारसास मिळाल्याकारणानें

(ग) शेवटच्या अवशिष्ट सहभागीदारानें अथवा ज्या इसमानें ती संपादन केली असेल त्यानें इतर एखाद्या इसमास ती सर्व मिळकत मोबदल्याशिवाय दिल्या कारणानें

(घ) सहभागीदाराच्या गैरवर्तणुकीमुळें ती मिळकत सरकारजमा करण्यांत आल्याकारणानें अथवा

(ङ) वारस नसल्यामुळें मिळकत सरकारांत गेल्यामुळें नष्ट होत नाहीं.

## बाब ७ वी.

### वांटप.

वांटप.

**३४.** अविभक्त कुटुंबांतील इसम ज्या क्रियेनें एकमेकापासून निराळे होऊन सहभागीदारींतून मुक्त होतात तिला वांटप असें ह्मणतात. या क्रियेंत सहभागीदारांचा भाग निश्चित करणें, आणि त्यांचा भाग, हक्क, आणि जबाबदाऱ्या पृथक करणें यांचा समावेश होतो. जेव्हां एकत्र कुटुंबाची समाईक मिळकत नसेल तेव्हां ही क्रिया निराळे होण्याचा इरादा दर्शविण्यानें आणि ते दर्शविणारें कृत्य करण्यानें घडते.

**खुलासा**:—उत्पन्नाचें वांटप करून तें निश्चित अंशांत ठरविलें असेल तरी पण सहभागीदाराच्या सोईसाठीं मिळकतीचा पृथक् पृथक् कबजा असेल तरी पण, अथवा मिळकतींतील हितसंबंधाची वांटणी करण्याचे बुद्धीशिवाय हिरशाची आणेवारी केल्यानें वांटप होत नाहीं.

**खुलासा :**—२ ज्या सहभागीदारांस अविभक्त राहण्याची इच्छा असेल त्यास एकत्र राहूं देऊन बाकीचे एक अगर अनेक सहभागीदार विभक्त होऊं शकतात.

कोणत्या प्रसंगीं कुटुंब अविभक्त राहूं शकतें.

३५. जेव्हां मात्र विवक्षित मिळकतीचें वांटप होतें तेव्हां ज्या मिळकतीचें वांटप झालें नसेल तितक्यापुरते तें कुटुंब एकत्र राहतें.

सहभागीदार विभक्त झाले असें केव्हांपासून मानतात.

३६. समाईक कुटुंबाचे सर्व मिळकतींतील किंवा तिचे भागामधील हितसंबंध पृथक करण्याचे बुद्धीनें दावा करण्यांत आला असेल अथवा पंचमार्फत निवाडा होण्यासाठीं काम सोंपविण्यांत आलें असेल आणि त्यावरून कायदेशीर हुकूमनामा किंवा निवाडा करण्यांत आला असेल आणि त्यावरून ज्या सहभागीदारांची आपला हिस्सा नक्की करवून घेण्याची मर्जी असेल त्या सहभागिदारांचा हिस्सा शर्तीनें किंवा शर्तीशिवाय पाडण्यांत आला असेल तेव्हां तो अगर ते हुकूमनाम्याचे किंवा निवाड्याचे तारखेपासून विभक्त होतात; परंतु मुकदम्यांतील हकीकत आणि पक्षकारांचा इरादा लक्षांत घेऊन हुकूमनाम्यांत किंवा निवाड्यांत विभक्त झाल्याची दुसरी कोणतीहि तारीख ठरविण्यास न्यायाधीश किंवा पंच मुखत्यार आहेत.

सहभागिदारास आपल्या हिश्याची वांटणी करवून घेण्याचा हक्क आहे.

३७. प्रत्येक सज्ञान वयाचे सहभागीदारास कोणत्याही वेळीं आपल्या हिश्शाची वांटणी करून मागण्याचा हक्क आहे.

अज्ञान सहभागीदाराच्या तर्फे वांटप करून मागतां येणार नाहीं.

३८. अज्ञान सहभागीदाराचे वतीनें वांटप मागतां येणार नाहीं.

परंतु

(क) कपटी वर्तणूक अथवा अविभक्त कुटुंबाच्या निष्काळजीपूर्वक अथवा उधळपट्टीच्या व्यवस्थेमुळें

(ख) समाईक मिळकतींतून सर्वांशीं अगर अंशतः त्यास वगळण्यांत येत असल्यामुळें :

(ग) सज्ञान वयाच्या सहभागीदाराकडून त्याचें पालनपोषण करण्यांत निष्काळजी दाखविण्यांत येत असेल तर किंवा तसें करण्याचें नाकारण्यांत येत असेल त्यामुळें अथवा

(घ) इतर योग्य कारणामुळें,

समाईक मिळकतींतून त्याचा भाग निराळा काढून संरक्षण करविणें हें अज्ञानाच्या शारीरिक किंवा द्रव्यसंबंधीं फायद्याचें आहे, असें असेल तेव्हां तशी वांटणी मागतां येऊं शकेल.

सहभागीदाराच्या गैरहजरीमध्यें आणि अज्ञानपणामध्यें केलेलें वांटप.

३९. (१) जेव्हां असें दिसून येईल कीं, एखाद्या सहभागीदाराच्या गैरहजरींत केलेलें वांटप त्याचें हितसंरक्षण होईल अशा योग्य काळजीपूर्वक आणि कायदेशीर रीतीनें करण्यांत आलें होतें तेव्हां तें वांटप रद्द होऊं शकणार नाहीं.

(२) एखाद्या सहभागीदाराच्या अज्ञानपणांत केलेलें वांटप वाजवी रितीनें करण्यांत आलें असेल आणि त्याचे तर्फे एखादा इसम त्याचा योग्य प्रतिनिधी ह्मणून शुद्धबुद्धीनें आणि हितसंरक्षण होईल अशा रीतीनें वागला असेल तर असें वांटप रद्द होऊं शकणार नाहीं.

वांटप न करण्याचा करार.

४०. (१) वांटप न करण्याचा अथवा समाईक मिळकतीपैकीं एकादी विविक्षित मिळकत न वांटण्याचा करार निरर्थक आहे.

(२) परंतु अमुक मुदतपर्यंत वांटप न करण्याचा अथवा विविक्षित मिळकत न वांटण्याचा करार कायदेशीर मोबदला घेऊन करण्यांत आला असेल तर तो करार करणाऱ्या इसमास बंधनकारक आहे. पण असा करार त्याचे वारस अथवा कायदेशीर वारस वकील यांस बंधनकारक नाहीं.

कोणती मिळकत सहभागीदारापाशीं राहूं शकते.

४१. स्वतःचे उपयोगाच्या वस्तु, उदाहरणार्थ कपडे, गाडी, घोडा आणि दागिने ज्या सहभागीदाराकरितां किंवा त्यांचे बायकाकरितां करण्यांत आले असतील किंवा जे ते वापरीत असतील त्या वस्तु त्यांचेपाशीं ठेवण्याचा त्यांस हक्क आहे. परंतु त्यांचे हिस्शास जो भाग येईल त्याचे किंमतीपेक्षां त्या वस्तु अधिक किंमतीच्या असतां कामा नयेत.

जात उपभोगाचे मिळकतीचें वांटप.

४२. जातीनें उपभोगावयाच्या वस्तु कीं ज्या कोणा सहभागीदाराच्या किंवा त्यांचे स्त्रियांच्या खास उपयोगासाठीं दिलेल्या नसतील अथवा खास उपयोगासाठीं दिलेल्या असतांहि हिस्शापेक्षां जास्त दिल्या असतील आणि त्यांचा विभाग होऊं शकेल असे नसेल, तर त्या आणि जी मिळकत इतकी लहान असेल कीं तिचा विभाग करणें अशक्य असेल तर ती विकून टाकिल्या पाहिजेत आणि त्यांचें उत्पन्न वांटून घेतलें पाहिजे.

स्वाभाविक स्वरूपामुळें अविभाज्य वस्तु.

४३. ज्या वस्तूंचा स्वाभाविक स्वरूपामुळें विभाग होऊं शकेल असें नसेल, जसें :—

कुरणें, जाण्यायेण्याचे मार्ग, विहिरी आणि तलाव, कुटुंबाचें देवालय इत्यादि—त्या वस्तू विभाग होण्यास पात्र नाहींत परंतु त्यांचा उपयोग सर्व सहभागीदार पूर्वीप्रमाणें करूं शकतात.

वंशपरंपरेचें वतन किंवा वृत्ति यांचें वांटप कोणत्या रीतीनें करावें.

४४. वंशपरंपरेचें वतन किंवा वृत्ति अशा मिळकतीचें वांटप खालीलप्रमाणें करितां येतें :—

(क) त्याचें उत्पन्न हिस्शाप्रमाणें वांटून घेऊन किंवा

(ख) ठरलेल्या पाळीप्रमाणें उपभोग करून.

येण्याचें कोणत्या रीतीनें वांटप करावें.

४५. कुटुंबाचें येणें सहभागीदाराचे संमतीनें वांटण्यांत आलें नसेल तर जेव्हां तें वसूल होईल तेव्हां त्यांतून सहभागीदारास आपला हिस्सा घेण्याचा हक्क आहे.

भाग घेण्याची इच्छा न करणारे कोणत्या रीतीनें विभक्त होऊं शकतात.

४६. कुटुंबाचे मिळकतींत भाग घेण्याची इच्छा न करणारा सहभागीदार

(क) वांटपादाखल कांहीं क्षुल्लक वस्तु घेऊन अगर

(ख) त्या भागावरील सर्व हक्क सोडून देऊन अथवा आपला हिस्सा एक अथवा अधिक सहभागीदारांस इतर सहभागीदारांच्या संमतीनें देऊन टाकून,

विभक्त होतो.

कोणती मिळकत वांटपाचे वेळीं दाखल करावी.

४७. वांटपासाठीं दावा करणाऱ्या सहभागीदारानें अविभक्त कुटुंबाची त्याचे ताब्यांतील मिळकत आणि त्यामुळें संपादन केलेली इतर मिळकत वांटपांत दाखल केली पाहिजे.

वांटपाच्या दाव्यांत एकंदर समाईक मिळकत दाखल केली पाहिजे.

४८. वांटपाच्या दाव्यांत अविभक्त कुटुंबाची एकंदर मिळकत दाखल केली पाहिजे; परंतु जर त्या दाव्यांत न आणलेली मिळकत

[क] न्यायाधिशाचे हुकमतींत नसेल,

(ख) तिऱ्हाईताचे कबज्यांत गहाणासंबंधीं किंवा तशाच इतर कांहीं कारणामुळें असेल,

(ग) ती मिळकत मात्र कुटुंबाचीच नसून त्याशिवाय तिच्यावर तिऱ्हाईत इसमाचा समाईकपणाचा अगर भागीचा हक्क असेल,

(घ) वादी त्यावरील आपला हक्क सोडून देईल आणि इतर सहभागीदार त्यासंबंधीं बांधा घेत नसतील तर, अगर

(ङ) दाव्यांत दाखल न करण्यास योग्य आणि पुरेसें कांहीं कारण असेल तर,

तशी मिळकत दाव्यांत दाखल करण्याची जरूरी नाहीं.

वांटप फक्त एकवारच होतें.

४९. वांटप फक्त एकवारच होतें; परंतु

(क) जेव्हां एकादी मिळकत पुढें वांटप करण्यावर ठेविलेली असेल,

(ख) जेव्हां एकाद्या सहभागीदाराच्या कपटानें अगर चुकीनें कांहीं मिळकत वांटल्याशिवाय राहिली असेल,

(ग) जेव्हां पहिल्या वांटपाचे वेळीं एखाद्या सहभागीदारास दिलेली मिळकत तिऱ्हाईत इसमानें त्यांचेकडून घेतली असेल आणि त्यावर त्याचा हक्क स्थापित झाला असेल,

(घ) जेव्हां कुटुंबाची एकादी चोरीस गेलेली अगर नष्ट झालेली मिळकत पुन्हां प्राप्त झाली असेल,

(ङ) जेव्हां कलम ४८ मध्यें लिहिलेल्या कारणास्तव ती मिळकत वांटपाचे वेळीं वांटण्यांत आली नसेल, अथवा

(च) इतर कांहीं योग्य आणि पुरेसें कारण असेल,

तेव्हां जरूर तितके तिचें पुन्हाही वांटप होतें.

वांटप केव्हां रद्द होऊं शकेल.

५०. ज्या कारणावरून एखादा राजमान्य करार रद्द होऊं शकतो, त्याच कारणास्तव लागूं पडूं शकेल तितक्यापुरतें वांटप पण रद्द होण्यास पात्र असते.

पुन्हा प्राप्त झालेल्या मिळकतीचें वांटप.

५१. खालीं दर्शविलेल्या मिळकतीचा म्हणजे,

(क) तिऱ्हाईत माणसानें बळकाविलेल्या आणि इतर भागीदारांच्या स्पष्ट अगर गर्भित संमतीनें कांहीं दुसऱ्या सहभागीदारांच्या अथवा वडिलार्जित मिळकतीच्या मदतीशिवाय एका सहभागीदारानें परत मिळविलेल्या स्थावर मिळकतीचा एकचतुर्थांश भाग

संपादन करणाऱ्यासाठीं निराळा काढण्यांत येतो, आणि बाकीची ती मिळकत संपादन करणार आणि इतर सहभागीदार यांजमध्यें त्यांच्या हिश्शाप्रमाणें वांटण्यांत येते.

कोणत्या गोष्टी वांटपाचा पुरावा म्हणून मानल्या जातात.

५२. (क) जेवणखाण, धर्मक्रिया आणि रहाणें हीं निरनिराळीं होणें,

(ख) समाईक मिळकतीचा अथवा तिच्या भागाचा स्वतंत्र रीतीनें भोगवटा करणें,

[ग) मुलकी दप्तरांत समाईक मिळकतींतील निरनिराळ्या सहभागीदारांच्या नांवें निरनिराळे भाग चढविणें,

[घ] समाईक मिळकतीचा स्वतंत्र व्यवहार करणें,

(ङ] स्वतंत्र येण्यादेण्याचा व्यवहार ठेवणें, आणि

[च] परस्पर बक्षिस देणें, जामीन रहाणें, व्यापार करणें, आणि समाईक मिळकतीचा व्यवहार करणें,

ह्या आणि अशाच गोष्टी वांटप झाल्याचा पुरावा ह्मणून मानल्या जातात. परंतु त्या निर्णायक मानल्या जात नाहींत.

प्रत्यक्ष मिळकतीचेच भाग पडूं शकतात.

५३. [१] कुटुंबाच्या समाइक मिळकतींच्या वांटपाचा दावा होईल त्यावेळीं अथवा वांटप करतेवेळी प्रत्यक्ष जितकी असेल तितकीचेच भाग पाडण्यांत येतात, आणि निरनिराळ्या सहभागीदाराकरितां झालेल्या कमजास्त खर्चाबद्दल विचार करण्यांत येत नसतो.

[२] परंतु,

[क] जेव्हां एखाद्या सहभागीदारास कुटुंबाचे समाईक मिळकतीच्या किंवा तिच्या भागाच्या उपभोगांतून अजिबात वगळण्यांत येत असेल, तेव्हां त्या मिळकतीच्या आपल्या हिश्शाखेरीज आणखी अशा सहभागीदारास वगळ-

त्याचे तारखेपासून वर सांगितलेल्या मिळकतीच्या नक्की उत्पन्नांत त्याचा जितका हिस्सा असेल, तितका मिळतो ;

(ख) जेव्हां एखाद्या सहभागीदारानें समाईक मिळकतीची अफरातफर केली असेल, अथवा तिचा अगदी गैर-वाजवी रीतीनें भाग घेऊन टाकला असेल अथवा कपट केलें असेल, अथवा अतिशय व अविचाराची उधळपट्टी किंवा निष्काळजीपणा केला असेल, आणि अशी उधळपट्टी आणि निष्काळजीपणा इतर सह-भागीदारांनीं कोणत्याही रीतीनें कबूल केला नसेल तर तशा कारणामुळें समाईक मिळकतींत तुटवडा पडला असेल तितक्यापुरती रक्कम पुरी करून देण्यास तो बांधला गेला आहे.

स्वतंत्र कबजांतील आणि सुधारलेल्या मिळकतींत सहभागीदाराचा हक्क.

५४. (१) एखाद्या सहभागीदारानें इतर सहभागीदारांच्या स्पष्ट किंवा गर्भित संमतीनें आपल्या स्वतंत्र कबज्यांत कांहीं मिळकत ठेविली असेल आणि तिची सुधारणा केली असेल तर वांटपाचे वेळीं अशी मिळकत त्याचा हिस्सा ह्मणून ठेवण्यास त्याला हक्क आहे, परंतु जर

(क) ती सुधारणा त्यानें आपल्या स्वतंत्र मिळकतींतून केली असेल आणि सुधारणा करण्यापूर्वी ती मिळकत त्याच्या योग्य हिश्शापेक्षां जास्त किंमतीची असेल अथवा,

(ख) ती सुधारणा समाईक मिळकतींतून केली असेल, आणि सुधारणा व जास्त वाढ यांसह ती मिळकत त्याच्या योग्य हिश्शापेक्षां मोठी असेल,

तर त्यानें त्या वाढीबद्दलचा मोबदला इतर सहभागीदारांस द्रव्यद्वारां अथवा अन्य रीतीनें दिला पाहिजे.

(२) जर अशी मिळकत एखाद्या सहभागीदारानें इतर सहभागीदारांच्या इच्छेविरुद्ध ठेविली असेल आणि त्यांचे स्वताच्या मिळकतीनें त्यांत सुधारणा करण्यांत आली असेल तर सुधारणा करण्यापूर्वी जी मिळकत असेल तींत आणि त्याचे कबज्याचे दरम्यान झालेल्या उत्पन्नांत इतर सहभागीदारांच्या हिश्शांचे प्रमाणानें सुधारलेल्या मिळकतींतून सर्वास हिस्सा मिळतो.

समाईक मिळकतींत कोणाचा किती हक्क पोंचतो.

५५. कुटुंबाचे समाईक मिळकतींत

(क) सर्व भावांस तसेंच त्यांचे बापास सारखा हिस्सा मिळणेचा हक्क आहे.

(ख) दत्तकपुत्रास, दत्तक बापाला, दत्तविधान झाल्यानंतर जर औरस मुलगा अगर मुलगे झाले, तर एका औरस मुलास जो हिस्सा मिळेल त्याचा चौथा भाग मिळण्याचा हक्क आहे.

आई वगैरे स्त्री यांचा हिस्सा.

५६. एखाद्या सहभागीदाराची आई आणि सावत्र आई तसेंच त्याचे बापाची आई आणि सावत्र आई आणि त्याच्या आजाची आई आणि सावत्र आई या प्रत्येकीस त्या त्या स्त्रीच्या पुत्राचे हिश्शाइतका हिस्सा मिळतो, आणि जेव्हां पुत्र जिवंत नसेल तेव्हां नातवाचे इतका हिस्सा मिळतो. आणि जेव्हां पुत्र किंवा नातू कोणीहि जिवंत नसेल तेव्हां पणतूचे हिश्शाइतका हिस्सा मिळतो. परंतु तिच्या नवऱ्याकडून अथवा त्याचे कुटुंबाकडून स्त्रीला स्त्रीधन मिळालें असेल तर तिचा हिस्सा नक्की करण्यांत सदर मिळकत विचारांत घेतली पाहिजे. या कलमाप्रमाणें त्यास मिळालेला हिस्सा त्यांचे स्वतंत्र आणि पूर्ण मालकीचा हिस्सा मानला जाईल; आणि ज्याप्रमाणें इतर सहभागीदाराच्या हिश्शावर समाश्रित इसमांच्या बाबतींत किंवा इतर रीतीनें बोजा पडतो त्याप्रमाणें त्यांच्या हिश्शावर सुद्धां पडतो. त्याचप्रमाणें समाईक मिळकतीचे बापाच्या मरणानंतर भावाभावामध्यें वांटप होतें वेळीं अविवाहित बहिणींना बापाचे

मिळकतींतून भावाचे एकचतुर्थांश हिश्शापर्यंत अन्नवस्त्र आणि लग्न-खर्च मिळण्याचा हक्क आहे.

आविभक्त कुटुंबाचे जबाबदारीची वांटपाचे वेळीं करण्याची व्यवस्था.

५७. (१) वांटप करण्यापूर्वी अविभक्त कुटुंबाच्या जबाबदाऱ्या-संबंधीं खालीं दर्शविलेल्या कोणत्याही एका रीतीनें व्यवस्था केली पाहिजे ह्मणजे--

(क) ती पुरी करण्यासाठीं समाईक मिळकतीचा कांहीं भाग अथवा उत्पन्न निराळें काढून, अथवा

(ख) समाईक मिळकतींत सहभागीदारांच्या हिश्याप्रमाणें सहभागीदारांमध्यें ती जबाबदारी वांटून देऊन.

(२) सदरप्रमाणें कोणतीही व्यवस्था केल्यानें ज्या इसमाकरितां ती जबाबदारी पुरी करण्याची असेल त्याचे संमतीशिवाय त्या व्यवस्थे-मुळें तो इसम बांधला जात नाहीं.

[३] पोट कलम १ यांतील जबाबदाऱ्या खालीलप्रमाणें आहेतः--

(ग) कायदेशीर रीतीनें कुटुंबावर ज्याची जबाबदारी पडते असें वडिलोपार्जित कर्ज,

(घ) कुटुंबाकरितां केलेलें कर्ज,

(ङ) समाश्रितांच्या पालनपोषणासाठीं करावयाची तजवीज, आणि

(च) भाऊ आणि बहिणी यांची आणि मयत सहभागी-दारांच्या मुलींचीं लग्नेंसुद्धां आवश्यक धर्मक्रिया करण्याची तजवीज.

वांटप झाल्यानंतर गर्भ राहून जन्मलेल्या सहभागीदाराचा हक्क.

५८. वांटप झाल्यानंतर गर्भ राहून जन्मलेल्या सहभागीदारास वांटप होतेवेळीं बापानें आपल्या स्वतःकरितां भाग ठेवला असेल तर वांटप पुन्हां करून माग-णेचा हक्क नाहीं. परंतु त्याच्या बापाच्या अथवा

जे त्याचे बरोबर विभक्त झाले नसतील अगर संसृष्ट झाले असतील त्यांचे हिश्यांतच स्वतः हक्क धारण करतो. जर बापानें आपला भाग राखून ठेवला नसेल तर मात्र वांटप पुन्हा करून मागण्याचा हक्क त्यास प्राप्त होतो.

५९. वांटप होते वेळीं जो सहभागीदार,

वांटपाचे वेळीं गर्भांत असलेल्या अगर परागंदा झालेल्या सहभागीदाराचा हिस्सा.

(क) गर्भस्थ असून वांटप झाल्यानंतर जन्मला असेल तो, आणि

(ख) नष्ट झालेला मानण्यांत येणारा परागंदा झालेला वांटपानंतर परत येईल तो,

आपला हिस्सा वांटप झाल्यावर मागेल तेव्हां, त्या वेळचे समाईक मिळकतींतून आपापल्या हिश्याप्रमाणें त्याचा हिस्सा पुरा करून दिला पाहिजे.

---

## बाब ८ वी.

### संसृष्टाविषयीं.

६०. जेव्हां विभाग झाल्यावर विभाग करणार सर्व भागीदार अथवा त्यांपैकीं कांहीं अशा इरायानें संसृष्ट होतील कीं, त्यांची हल्लींची त्याचप्रमाणें पुढें होणारी मिळकत समाईक मानली जाईल, तेव्हां ते संसृष्ट झाले आहेत असें ह्मणावें.

संसृष्ट ह्मणजे काय.

६१. जेव्हां संसृष्ट इसमांमध्यें फिरून वांटप होईल तेव्हां संसृष्ट इसमांना मिळणारे हिस्से सारखे असतील मग अशा रीतीनें संसृष्ट होते वेळीं त्यांनीं आणलेली मिळकत कमीजास्त असेल तरीपण त्याची हरकत नाहीं.

संसृष्ट इसमामध्यें फिरून वांटणी.

६२. संसृष्ट कुटुंबांत अनुजीविक स्वत्वाचा नियम लागूं पडत नाहीं; परंतु वांटप झाल्याशिवाय संसृष्ट सहभागीदाराच्या मरणानंतर त्याचा भाग हिंदु वारशाच्या निबंधाची बाब ५ यांत दर्शविलेल्या क्रमाप्रमाणें जातो.

संसृष्ट सहभागीदाराच्या मरणानंतर वारशाचा क्रम.

६३. संसृष्ट इसमाचे पुरुष वारस समाईकपणांत राहतील तर त्यांस संसृष्ट कुटुंबाचे नियम लागू होतील.

संसृष्ट इसमांच्या पुरुष वारसाची स्थिति.

६४. या बाबतींत इतर रीतीनें ठरविलें असेल त्याशिवायकरून संसृष्ट कुटुंबाच्या माणसाचे हक्क आणि कर्तव्यें अविभक्त कुटुंबाच्या माणसाप्रमाणेंच असतील.

संसृष्ट इसमाचें हक्क आणि कर्तव्यें.

---

## बाब ९ वी.

### किरकोळ.

६५. कोणतेंही हिंदु कुटुंब विरुद्धपणें शाबीत करण्यांत येईल तोंपर्यंत तें अविभक्त आहे असें अनुमान होतें. सदरहू अनुमान सख्या काकाच्या मुलापेक्षां बाप आणि त्याचे पुत्र यासंबंधीं अथवा भावासंबंधीं जास्त मजबूत होऊं शकतें, आणि जसजसा मूळ पुरुषाचा वंशज अधिक शेवटीं शेवटीं जाईल तसतसें हें अनुमान कमी कमी होत जातें.

अविभक्तपणाचें अनुमान.

६६. जेव्हां कुटुंबांतील कित्येक माणसें इतरांपासून विभक्त असतील तेव्हां बाकीचीं माणसें सहभागीदार आहेत असें दाखवीपर्यंत तीं विभक्त झालीं आहेत असेंच मानणेचें आहे.

सहभागीदार विभक्त असल्याचें अनुमान.

६७. जेव्हां एखादे हिंदू कुटुंब एकवार अविभक्त होतें असें कबूल करण्यांत आलें असेल अथवा शाबीत करण्यांत आलें असेल तेव्हां कलम ६५ चे ठरावास पात्र राहून, तें कुटुंब, तसेंच त्याची मिळकत पण दाव्याचे तारखेपर्यंत अविभक्त होती असें अनुमान होतें; परंतु ते विभक्त झाल्याचें दाखविण्यांत येईल, अगर तक्रारी मिळकत वांटप झाल्यामुळें किंवा इतर रीतीनें स्वतंत्र असल्याचें शाबीत करण्यांत येईल तर त्याप्रमाणें अनुमान होऊं शकणार नाहीं. परंतु जेव्हां असें कबूल करण्यांत येईल अगर शाबीत करण्यांत येईल कीं, कुटुंबाचा वेगळेपणा झाला आहे, तेव्हां तो वेगळेपणा अमुक वेळीं झाला आहे असें खास अनुमान होऊं शकत नाहीं.

अविभक्तपणाचीं अनुमानें कोणत्या रीतीनें करावी.

६८. (१) जेव्हां एखाद्या कुटुंबाचे जेवणखाण, धर्मक्रिया, राहणें एकत्र असल्याचें आणि त्याचे कबज्यांत कांहीं समाईक मिळकत असल्याचें कबूल करण्यांत अगर शाबीत करण्यांत येईल तर त्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें अनुमान होईल कीं-

एकत्रपणावरून कोणतीं अनुमानें करतां येतील.

(क) कुटुंबांतील एखाद्या इसमाच्या कबज्यांतील सर्व मिळकत कुटुंबाची समाईक मिळकत आहे.

(ख) कुटुंबाचे मिळकतीचा कबजा कुटुंबाचे वतीनें त्याचेकडे आहे आणि त्याचा कबज़ा कुटुंबाचे हक्काविरुद्ध नाहीं.

(ग) आपल्या नांवानें खरेदीनें, गहाणानें किंवा पट्टयानें संपादन केलेली कोणतीहि मिळकत अथवा स्वतः करून घेतलेले दस्तऐवज हीं त्यानें कुटुंबाचे वतीनें संपादन केलेली आहेत, अगर

(घ) कुटुंबाकरितां केलेला सर्व खर्च त्यानें कुटुंबाचे समाईक मिळकतींतूनच केलेला आहे.

(२) परंतु खालीं लिहिल्याप्रमाणें कबूल करण्यांत अगर शाबीत करण्यांत येईल तर तसें अनुमान होत नाहीं. ह्मणजे :—

(ङ) कुटुंबाच्या मिळकतीची यापूर्वीच वांटणी करण्यांत आलेली आहे.

(च) कुटुंबाची माणसें आपापली स्वतंत्र मिळकत धारण करितात, अथवा

(छ) याप्रमाणें मिळकत संपादन करण्यांत, दस्तऐवज करण्यांत किंवा केलेल्या खर्चांत समाईक मिळकतीचा व्यय झाला नाहीं, अगर स्वतंत्र मिळकतींतूनच खर्च केलेला आहे.

परधर्म स्वीकारणारा.

६९. इतर कायद्यास पात्र राहून, जे इसम परधर्म स्वीकारतील ते इसम त्या वेळेपासून अविभक्त हिंदू कुटुंबाचे अंगभूत मानले जाणार नाहींत.

# हिंदू वडिलार्जित कर्ज वारण्याच्या नियमनासंबंधीं निबंध.

उद्देश. हिंदुधर्मशास्त्रांतील "हिंदू वडिलार्जित कर्ज वारण्याच्या नियमनासंबंधींच्या" मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीलप्रमाणें कायदा केला आहे:—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

संज्ञा. १. (१) या निबंधास "हिंदू वडिलार्जित कर्ज वारण्याच्या नियमनासंबंधीं निबंध" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति. (२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

सुरवात. २. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं. (२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यांमध्यें हिंदू वडिलार्जित कर्ज वारण्याच्या नियमनासंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतिरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेटमध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ यानें अगर इतर कोणत्याही नियमानें कोणत्याहीप्रकारें बाध येणार नाहीं.

३. या निबंधांत "कर्ज" या शब्दामध्यें कोणी हिंदू इसम जिवंत असेल तर, त्याच्याविरुद्ध जे हक्क अमलांत येऊं शकले असते आणि सदरहू इसमाच्या वारसप्रतिनिधीविरुद्ध ज्याकरितां दावा आणतां येईल अशा कोणत्याहि हक्कावरून उत्पन्न होणाऱ्या सर्व जबाबदारींचा समावेश होतो.

अर्थ.

मयत हिंदू इसमाचा मुलगा किंवा मुलाचा मुलगा अशा नात्यामुळेंच मात्र मयताचे कर्जाबद्दल जबाबदार होणार नाहीं.

४. कोणत्याहि मयत हिंदू इसमाच्या कोणत्याहि कर्जाकरितां त्याच्या मुलाविरुद्ध अथवा मुलाच्या मुलाविरुद्ध त्याच्या या नात्यामुळेंच मात्र दावा होऊं शकणार नाहीं.

वारशानें मिळालेल्या मिळकतीपुरतीच जबाबदारी; आणि वाजवी रीतीनें व्यय केलेला नसेल तितक्यापुरती जातीनें जबाबदारी.

५. (१) कोणी मयत हिंदू इसमाच्या मुलाला, मुलाचे मुलाला, किंवा दुसऱ्या एखाद्या वारसाला,

(क) स्वतःला, अगर

(ख) आपल्या मुखत्यारामार्फत,

सदरहू मयत इसमाची कांहीं मिळकत,

(ग) मिळाली असेल, किंवा

(घ) कबज्यांत आली असेल,

तर याप्रमाणें मिळकत मिळालेल्या किंवा कबज्यांत आलेल्या सबबीवरूनच मात्र सदरहू इसमाच्या कोणत्याहि कर्जाबद्दल तो जातीनें जबाबदार होणार नाहीं.

(२) परंतु सदरहू कर्जासंबंधीं तो मुलगा, मुलाचा मुलगा, किंवा वारस, जसें असेल त्याप्रमाणें, सदरहू मयत इसमाचा वारस प्रतिनिधी म्हणून जबाबदार राहील; आणि ती जबाबदारी

(ङ) त्यास, किंवा

(च) (१) त्याचे सांगण्यावरून, अगर

(२) त्याच्या हिताकरितां,

—दुसऱ्या कोणी इसमास

त्या मयत इसमाची जी मिळकत मिळाली असेल अगर कबज्यांत आली असेल आणि जिचा व्यय झाल्याशिवाय राहिली असेल त्यांतून, आणि तितक्यापुरती आदा होऊं शकेल.

(३) पण याप्रमाणें मिळालेल्या अगर कबज्यांत आलेल्या मिळकतींपैकीं जितक्या मिळकतीचा त्या मुलानें, मुलाच्या मुलानें किंवा वारसानें, जसें असेल तसें, वाजवीरीतीनें व्यय केला नसेल तितक्या मिळकतीपुरता तो जातीनें जबाबदार होईल.

# हिंदू मिळकतीचे व्यवस्थेसंबंधींचा निबंध.

उद्देश. हिंदुधर्मशास्त्रांतील "हिंदू मिळकतीचे व्यवस्थेसंबंधींच्या" मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीलप्रमाणें कायदा केला आहे:—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

१. (१) या निबंधास "हिंदू मिळकतीचे व्यवस्थेसंबंधींचे निबंध" असें ह्मणावें.

संज्ञा.

(२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

स्थानिक व्याप्ति.

२. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

सुरवात.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यांमध्यें हिंदू मिळकतीचे व्यवस्थेसंबंधीं प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतिरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेटमध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित 'कायदेकानूंस' या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ या नियमानें अगर इतर कोणत्याही नियमानें कोणत्याहीप्रकारें बाध येणार नाहीं.

---

# बाब २ री.

## मृत्युपत्रावरून व्यवस्था करण्याबाबत.

मृत्युपत्रानें मिळकतीची व्यवस्था कोण करूं शकेल.

३. या निबंधांतील यापुढील ठरावास पात्र राहून, जो इसम

(क) अज्ञान नसेल, आणि

(ख) सावध असेल,

तो मृत्युपत्रानें आपल्या मिळकतीची व्यवस्था करूं शकतो.

कोणत्या व किती मिळकतीची मृत्युपत्रानें व्यवस्था करतां येईल.

४. (१) कोणाहि

(क) पुरुष आपली

(१) स्वसंपादित,

(२) वांटप झालेली स्वतंत्र, किंवा

(३) अविभक्त कुटुंबाच्या सहभागीदारांपैकीं शेवटी स्वतः एक

टाच जिवंत राहिल्याकारणानें
जी त्याची अवशिष्ट
—मिळकत असेल तिची, आणि

(ख) स्त्री, तिला नवऱ्याकडून वारशानें मिळालेल्या स्थावर अगर जंगम मिळकतीशिवाय तिच्या स्वतंत्र स्वामित्व असलेल्या मिळकतीची

मृत्युपत्रानें व्यवस्था करूं शकतात.

(२) परंतु कोणीहि इसम ज्या मिळकतीचें जितक्यापुरतें आपण जिवंत असतां बक्षिसानें स्वत्वार्पण करूं शकेल, त्यापेक्षां जास्त, त्या मिळकतीची मृत्युपत्रानें व्यवस्था करूं शकणार नाहीं.

मृत्युपत्रानें व्यवस्था केलेल्या मिळकतीचा कोण लाभ घेऊं शकेल.

५ (१) मृत्युपत्रानें केलेल्या व्यवस्थेवरून कोणीहि इसम, मग तो अज्ञान असो किंवा अनंश असो तरी पण लाभ घेऊं शकतो.

(२) परंतु मृत्युपत्र करणार इसमाचें मरणसमयीं मृत्युपत्रांतील व्यवस्थेअन्वयें लाभ घेणारा इसम हयात असला पाहिजे; तसेंच सदरहू व्यवस्था अमलांत येण्याचें वेळीं त्या व्यवस्थे आधारें लाभ घेण्यास तो इसम लायख असला पाहिजे.

**खुलासा**:—मृत्युपत्रांतील व्यवस्था अमलांत आणण्याचे वेळीं जें मूल गर्भस्थ असेल तें मृत्युपत्रांतील व्यवस्थेवरून लाभ घेण्याचे कारणासाठीं जन्मलेलेंच आहे असें समजावें.

शर्तीची व्यवस्था हिंदुधर्मशास्त्रास असंमत असतां कामा नये.

६. मृत्युपत्रानें शर्तीची व्यवस्था कारण्यांत येत असेल तर तशी शर्त हिंदुधर्मशास्त्राशीं असंमत असतां कामा नये.

(२) परंतु जर ती शर्त हिंदुधर्मशास्त्रांशीं असंमत असेल, पण तिच्यावर व्यवस्था अवलंबून नसेल तर जणूं काय ती शर्त नव्हतीच याप्रमाणें व्यवस्थेचा अम्मल होईल.

उदाहरण:—स्वतंत्र स्वामित्वासह दिलेल्या बक्षिसाला जोडलेली स्वत्वार्पणास अवरोधकारक शर्त, तसेंच विभागास अवरोधकारक शर्त हिंदुधर्मशास्त्राशीं संमत नाहीं.

(३) जी व्यवस्था सरळपणें होऊं शकत नाहीं तीच व्यवस्था जिम्मेदाराची नेमणूक करून आडमार्गानें पण मृत्युपत्र करणाऱ्या इसमाकडून होऊं शकत नाहीं.

मृत्युपत्राच्या व्यवस्थेनें मिळकत स्वामित्वरहीत ठेविली जाणार नाहीं.

७. भविष्यकाळीं एखाद्या अनिश्चित वेळीं घडणारी गोष्ट घडून येईपर्यंत कोणतीही मिळकत स्वामित्वाशिवाय मृत्युपत्राच्या व्यवस्थेनें ठेवतां येणार नाहीं.

मृत्युपत्र करण्याची रीति.

८. मृत्युपत्र करण्यासाठीं एखादी विशेष रीति अगर विधि यांची अवश्यकता नसते.

मृत्युपत्राचा अर्थ.

९. मृत्युपत्र करणार इसमाचा शाबीत झालेला इरादा प्रधान मानून मृत्युपत्राचा अर्थ केला पाहिजे.

---

# बाब ३ री.

## स्त्रीचें स्वामित्व.

स्वतंत्र स्वामित्व असलेल्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा स्त्रीचा अधिकार.

१०. ज्या मिळकतीवर एखाद्या स्त्रीचें स्वतंत्र स्वामित्व असेल त्या मिळकतीचें कोणत्याही प्रकारें स्वत्वार्पण अगर व्यवस्था करण्यास त्या स्त्रीस अधिकार आहे.

११. (१) ज्या मिळकतीवर एखाद्या स्त्रीचें मर्यादित स्वामित्व असेल त्या मिळकतीचा पूर्णपणें उपभोग करण्याचा मात्र त्या स्त्रीस अधिकार आहे.

मर्यादित स्वामित्व असलेल्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा स्त्रीचा अधिकार.

(२) परंतु,

(क) 'कुटुंबाचे' किंवा कुटुंबाचे 'मिळकतीचें' संरक्षण' अगर' फायदा यासाठीं, चा

(ख) कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठीं किंवा शिक्षणासाठीं जरूर असेल, असा

(ग) अवश्य धर्मक्रियेसाठीं जरूर असेल, असा

(घ) कुटुंबांतील मुलींचें लग्न करण्यासाठीं जरूर असेल असा, आणि

(ङ) असाच दुसरा कायद्याप्रमाणें जरूर असेल, असा

व्यवहार यांशिवाय इतर कोणत्याही प्रसंगीं अशा मिळकतीचें कांहींही स्वत्वार्पण अगर इतर व्यवस्था करण्याचा त्या स्त्रीस अधिकार नाहीं.

१२. (१) मर्यादित स्वामित्व असलेल्या एखाद्या स्त्रीनें आपल्या मिळकतीची व्यवस्था कांहीं जरूरीचे कारणासाठीं केली असेल तर जितक्यापुरती एखादा साधारण जाणता इसम आपल्या मिळकतीवर किंवा जातीवर विविक्षित प्रसंगीं जबाबदारी घेऊं शकेल तितक्यापुरती त्या व्यवस्थेसंबंधींची जबाबदारी त्या मिळकतीवर उत्तराधिकारी याजविरुद्ध पडते.

मर्यादित स्वामित्व असलेल्या मिळकतीच्या केलेल्या व्यवस्थेनें पडणारी जबाबदारी.

(२) परंतु स्वत्वार्पण स्वीकारणार अगर सावकार ती व्यवस्था ज्या वस्तुस्थितीमुळें कायदेशीर जरूरीची मानली जाईल अशा वस्तुस्थितीचे अस्तित्वाबद्दल योग्य काळजीपूर्वक खात्री करून, शुद्धबुद्धीनें वागला असेल तर त्या व्यवस्थेची जबाबदारी त्या मिळकतीवर सर्व उत्तराधिकारी यांजविरुद्ध पडते.

मर्यादित स्वामित्व असलेल्या मिळकतीची स्त्रीनें केलेली व्यवस्था अगदीं निरर्थक नाहीं.

१३. (१) मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीनें बिन अधिकारानें केलेली मिळकतीची एखादी व्यवस्था अगदीं निरर्थक नाहीं. त्या स्त्रीस तिच्या हयातींत . . . . . . . .

ती व्यवस्था बंधनकारक राहून तिच्या हयातीनंतरच्या उत्तराधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें ती रद्द करितां येण्याजोगी मानली जाते

(२) परंतु स्वत्वार्पण स्वीकारणारानें सदरहू व्यवस्था ज्या वस्तुस्थितीमुळें कायदेशीर जरूरीची मानली जाईल अशा वस्तुस्थितीच्या अस्तित्वाबद्दल योग्य काळजीपूर्वक खात्री करून शुद्ध बुद्धीनें, आणि मोबदला देऊन ती व्यवस्था स्वीकारली असेल तर उत्तराधिकाऱ्याच्या मर्जीवरून ती व्यवस्था रद्द करतेवेळीं मोबदल्याचा ऐवज त्यास परत दिला पाहिजे.

उत्तराधिकारी यांच्या संमतीचा परिणाम.

१४. मर्यादित स्वामित्व असलेल्या एखाद्या स्त्रीनें आपल्या मिळकतीची कांहीं व्यवस्था केली असेल त्यांत अग्रहक्क धारण करण्याऱ्या सर्व उत्तराधिकाऱ्यांची संमती मिळविली असेल तर तशी व्यवस्था सर्व उत्तराधिकाऱ्यांस बंधनकारक होते. . . . . .

मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीविरुद्ध मिळविलेला हुकूमनामा कोणास बंधनकारक होतो.

१५. (१) मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीविरुद्ध मिळविलेला हुकूमनामा फक्त त्या स्त्रीचे जातीवर आणि त्या मिळकतींतील तिचे हितसंबंधावर बंधनकारक होतो.

(२) परंतु जर सर्व कुटुंबाच्या हिताकरितां केलेल्या व्यवस्थेसाठीं कुटुंबाची वहिवाट करणार या नात्यानें त्या स्त्रीविरुद्ध हुकूमनामा मिळविला असेल तर

(क) त्या स्त्रीच्या हातांतील सर्व मिळकत, तिच्या उत्तराधिकाऱ्याच्या हितसंबंधासह त्या हुकूमनाम्यासाठीं जबाबदार मानली जाते आणि

(ख) त्या स्त्रीच्या जातीवर, अगर त्या मिळकतींतील तिच्याच हितसंबंधावर त्या हुकूमनाम्याची जबाबदारी पडत नसते.

मर्यादित स्वामित्व असलेल्या स्त्रीस मिळकतीचा गैरउपयोग करण्यापासून अटकाव करण्याचा उत्तराधिकाऱ्याचा अधिकार.

१६. मर्यादित स्वामित्व असलेली एखादी स्त्री आपल्या हातांतील मिळकतीचा

(क) गैरउपयोग अगर बिघाड करीत असेल, अगर

(ख) तिजवरील उत्तराधिकाऱ्याच्या हितसंबंधास हानिकारक कांहीं कृत्य करीत असेल,

(ग) रकम (क) यांतील प्रसंगीं तसें कृत्य होऊं न देण्याबद्दल अटकाव करण्याचा मनाई हुकूम मिळण्याकरितां अगर

(घ) रकम (ख) यांतील प्रसंगी तें कृत्य आपल्यास बंधनकारक नाहीं, असा आपला हक्क स्थापन करण्याकरितां दावा करण्याचा

(ङ) अग्रहक असलेल्या उत्तराधिकाऱ्यास, अगर

(च) त्याचें पण कपट असेल तर कोणत्याही उत्तराधिकाऱ्यास अधिकार आहे.

# हिंदू आईबाप आणि मुलगे याविषयींचा निबंध.

उद्देश. हिंदुधर्मशास्त्रांतील "हिंदू आईबाप आणि मुलगे" याविषयींच्या निबंधाचे मूलतत्वांची व्याख्या करून निबंध करणें इष्ट वाटल्यावरून श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर यांनीं खालीलप्रमाणें कायदा केला आहे :—

## बाब १ ली.

### प्रारंभीचे नियम.

संज्ञा. १. (१) या निबंधास "हिंदू आईबाप आणि मुलगे याविषयींचा निबंध" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति. (२) हा निबंध सर्व कोल्हापूर इलाख्यास लागू आहे.

सुरवात. २. (१) हा निबंध कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४२ ता० ११ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवी रोजीं अमलांत येईल.

देशाचाराला व कुलाचाराला बाध येत नाहीं. (२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंही कुटुंब अगर देश यांमध्यें हिंदू आईबाप आणि मुलगे याविषयींच्या प्रमाण मानलेल्या आणि मान्य होऊं शकेल अशा चालू रीतिरिवाजाला यांतील कोणत्याही बाबतीनें प्रतिबंध होत नाहीं.

(३) तसेंच, करवीर सरकारनें करवीर सरकारचे ग्याझेटमध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या प्रचलित कायदेकानूंस' या निबंधांतील कलम २ मधील पोट कलम २ यानें अगर इतर कोणत्याही नियमानें कोणत्याहीप्रकारें बाध येणार नाहीं.

३. या निबंधांत सांगितलेल्या कोणत्याही बाबतीमुळें पाल्यपालक निबंधास अथवा त्यावेळीं अमलांत असलेल्या पाल्यपालक संबंधावर परिणाम करणाऱ्या एखाद्या निबंध-नियमास बाध येणार नाहीं.

पाल्यपालक निबंधाचा अबाधितपणा.

४. या निबंधांत विषयावरून अगर पूर्वापार संबंधावरून बाध येत नसेल तर पुत्र, दासीपुत्र, इत्यादि शब्दांचा अर्थ हिंदु वारशाचे निबंधांत या शब्दांची व्याख्या केली आहे, त्याप्रमाणें होतो.

व्याख्या.

५. या निबंधांतील कोणत्याही ठरावानें समाईक मिळकतीची व्यवस्था करण्याचे अविभक्त कुटुंबाच्या कर्त्याच्या हक्कास बाध येत नाहीं.

कर्त्याच्या हक्काचा अबाधितपणा.

---

## बाब २ री.

### पालकपणाविषयीं.

६. अज्ञान मुलाचें पालन करण्याचा हक्क खालील इसमांस जर ते कायदेशीर रीतीनें नालायख नसतील तर, खालील क्रमानें मिळतोः—

पालकपणाचा हक्क.

(क) बापाला,

(ख) त्याच्या मरणानंतर आईला,

(ग) सत्रांत अधिक नजिकच्या नातलगांना आणि त्यांत स्त्रियांपेक्षां पुरुषांना आणि सारख्या दरज्याच्या नातलगांचे बाबतींत आईच्या बाजूचे नातलगापेक्षां बापाचे बाजूचे नातलगांना, आणि

(घ) अनौरस मुलाचे बाबतींत फक्त आईला, मुलगे सज्ञान होईपर्यंत आणि मुलीचें लग्न होईपर्यंत त्यांस निबंधांत ठेवण्याचा हक्क आहे.

अपवादः—(१) आंगावरील मुलांचें पालन करण्याचे बाबतींत बापापेक्षां आईचा हक्क श्रेष्ठ आहे.

(२) कन्येचें लग्न झाल्यावर तिचा पति जर तो कायदेशीर रीतीनें नालायक नसेल तर, कायदेशीर पालन करणारा आहे, आणि त्याचे अभावीं पतीचा कोणताही नजीकचा नातलग, अथवा कन्येचा बाप अथवा आई, अथवा बापाच्या बाजूचे अथवा आईच्या बाजूचे कोणीही लायक नातलग तिचे पालक आहेत.

७. (१) आईबापापैकीं जे अज्ञान मुलांचें कायदेशीर पालन करणार असतील त्यांचें त्या मुलाचें पालनपोषण करण्याचें कर्तव्य आहे.

मुलाचें पालन· पोषण कोणी करावें.

(२) मुलगे उपजीविकेच्या साधनाविरहित आपल्या वृद्ध आईबापांचें पालनपोषण करण्यास बांधले गेले आहेत.

८. (१) बापास, आणि बापाच्या मरणानंतर जर बापानें आईला अन्य तऱ्हेनें फर्माविलें नसेल तर, आईला आपल्या धर्मांत आपल्या अज्ञान बालकास वाढविण्याचा हक्क आहे; मग तो धर्म त्यांचा मूळचाच असेल किंवा नवीन स्वीकारलेला असेल, तरी पण कांहीं हरकत नाहीं.

अज्ञानास आपल्या धर्मांत वाढविण्याचा बापाचा हक्क.

(२) परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं जर मुलें दुसऱ्या धर्मांत इतक्या लांब काळापर्यंत अथवा इतक्या वयापर्यंत वाढविण्यांत आलीं असतील, अथवा त्या धर्माचीं मूलतत्वें त्यांनीं इतक्या काळापर्यंत ग्रहण केलीं असतील कीं, त्यांचा धर्म बदलल्यानें त्यांची धर्मा-

वरील श्रद्धा नष्ट होईल, अथवा अन्यतऱ्हेनें त्या बालकाचे हिताचें नुकसान होईल तर पोट कलम १ मधील हक्क नष्ट होतो.

९. अज्ञानाचें शिक्षण, त्याचें लग्न आणि पालनपोषणासाठीं सर्व जरूरीचा खर्च पालन करणार करूं शकतो आणि असा खर्च अज्ञानाचे मिळकतींतून वसूल होण्यास पात्र आहे.

अज्ञानाच्या शिक्षण वगैरेचा खर्च.

---

## बाब ३ री.

### मिळकतीविषयीं.

१०. बाप आणि मुलगे मिळून एक अविभक्त कुटुंब होतें. आणि या निबंधांत अन्य रीतीनें ठरविलें नसेल तर त्यांचे आणि त्या कुटुंबांतील समाश्रितांचे हक्क "अविभक्त हिंदु कुटुंबाविषयीं निबंध" यांत दिल्याप्रमाणें असतात.

बाप आणि मुलगे मिळून एक अविभक्त कुटुंब.

११. (१) बापाला त्याचा बाप, आजा, अथवा पणजा यांजकडून जी मिळकत अनुजीविक स्वत्वाच्या हक्कानें, वारशानें अथवा त्यास स्वतंत्र मालक बनविल्याशिवाय बक्षिसानें अथवा मृत्युपत्रानें मिळाली असेल, ती आणि तशा सर्व मिळकतीचें उत्पन्न आणि त्यांचे मदतीनें मिळविलेली मिळकत बापाची वडिलोपार्जित मिळकत मानली जाते.

कोणती मिळकत बापाची वडिलोपार्जित मानली जाते.

(२) कुटुंबाचे मिळकतीच्या वांटपांत अविभक्त कुटुंबाचा सहभागीदार ह्मणून जी मिळकत बापाला मिळाली असेल, ती आणि तशा मिळकतीचें उत्पन्न आणि त्यांचे मदतीनें मिळविलेली मिळकत पण वडिलोपार्जित मिळकत मानली जाते.

(३) वरील पोटकलम १ व २ यांत दर्शविलेल्या मिळकतीशिवाय इतर सर्व मिळकत बापाची स्वसंपादित मिळकत मानली जाते.

मुलगा बापाचा सहभागीदार.

१२. कायद्यानें अगर रुढीनें अविभाज्य नसेल अशा वडिलोपार्जित मिळकतीचा, गर्भांत असेल तेव्हांपासून, आणि कायदेशीर दत्तक घेतलेल्या मुलाचे बाबतींत त्यास दत्तक घेण्यांत येईल त्या तारखेपासून तो मुलगा आपल्या बापाबरोबर सहभागीदार होतो; आणि वडिलोपार्जित मिळकतींतून आपला हिस्सा निराळा पाडून घेण्याची बापाची मर्जी नसेल तरी पण त्यास हक्क आहे.

मुलाच्या स्वार्जित मिळकतींत बापाचा हक्क नाहीं.

१३ (१) अविभक्त कुटुंबाचे निबंधान्वयें जी मिळकत मुलाची स्वार्जित मिळकत मानली जाईल अशा मिळकतींत बापाला कांहींही हक्क नाहीं.

(२) मुलाला आपल्या आईकडून किंवा मामाकडून मिळालेल्या मिळकतींत बाप कोणत्याही प्रकारचा हक्क धारण करूं शकत नाहीं.

वडिलोपार्जित मिळकतीच्या, बापानें केलेल्या वांटपाचा परिणाम.

१४. वडिलोपार्जित मिळकतीच्या, योग्य रीतीनें, व निःपक्षपातपणें बापानें केलेल्या वांटपानें बापाचा स्वतःचा, त्याचप्रमाणें मुलांचे हिस्से निरनिराळे करण्यांत आले असतील, तर तें वांटप मुलांचे संमतीनें अथवा संमतीविना केलें असेल तरीपण, कायदेशीर आहे आणि बापाला स्वतःस आणि मुलांस बंधनकारक आहे.

स्वतःच्या मिळकतीसंबंधीं बापाचा अधिकार.

१५. आपल्या स्वसंपादित मिळकतीचें वांटप करण्यास बाप बांधला गेला नाहीं. आणि त्याच्या मर्जीस येईल तर सदरहू मिळकतीचे विषम विभाग पण तो करूं शकतो.

अविवाहित मुलीचा हक्क.

१६. अविवाहित मुलीला हिस्सा मिळणेचा हक्क नाहीं. परंतु वांटपाचे वेळीं तिच्या लग्नासाठीं आणि पालनपोषणासाठीं व्यवस्था केली पाहिजे.

बापाला कुटुंबाची वहिवाट करण्याचा हक्क.

१७. बाप कायदेशीर रीतीनें नालायक नसेल तर कुटुंबाचा कर्ता ह्मणून काम करण्याचा त्याला हक्क आहे.

वडिलोपार्जित मिळकतींतून बापानें केलेलें कर्ज फेडीस पात्र आहे.

१८. कुटुंबाकरितां नसूनही खालीं लिहिलेल्या प्रकारचें बापानें केलेलें कर्ज आणि जबाबदारी फेडण्यांत कुटुंबाची तमाम वडिलोपार्जित मिळकत उपयोगांत आणण्यास पात्र आहे; ह्मणजे :-

(क) बाप एखाद्या माणसासाठीं हजर जामीन झाला असेल, अथवा एखाद्या इसमाच्या प्रामाणिकपणाबद्दल किंवा अब्रूकरितां स्वतः खात्री करून दिली असेल, आणि त्याबद्दल कांहीं मोबदला घेतला असेल, अथवा कुटुंबास त्याचा कांहीं फायदा झाला असेल, तर त्यावरून उत्पन्न झालेली जबाबदारी,

(ख) एखाद्या तिऱ्हाईत इसमानें आपलें वचन किंवा जबाबदारी पुरी करण्याची बापानें जामीनगिरी घेतली असेल आणि ती पुरी करण्यांत तिऱ्हाईत इसम कसूर करील तर त्यावरून उत्पन्न झालेली जबाबदारी,

(ग) अनीतीचीं किंवा ग़ैरकायदेशीर नसतील अशीं कर्जें, अथवा

(घ) धर्मादायाच्या कामासाठीं आणि प्रीतीनें बापानें आपल्या बायकोला, मुलीला, मुलाला किंवा सुनेला कुटुंबाचे मिळकतीस प्रमाणशीर दिलेलें बक्षिस.

वडिलोपार्जित मिळकतीचे विक्रीस हरकत घेणाऱ्या मुलानें काय शाबीत केलें पाहिजे.

१९. वडिलोपार्जित मिळकतीवरील कुटुंबाचा सर्व हक्क देणें फेडण्यासाठीं अथवा देण्यास तारण ह्मणून बाप स्वत्वार्पण करील, अथवा त्या देण्यासाठीं झालेल्या हुकूमनाम्याच्या बजावणींत सदरहू हक्क विकण्यांत येईल तेव्हां स्वत्वार्पण केलेल्या अथवा विकलेल्या मिळकतींतील आपला भाग मिळण्यासाठीं दावा करणाऱ्या

मुलावर सदरहू देणें आपल्यांस कलम १८ प्रमाणें बंधनकारक नाहीं असें शाबीत करण्याचा बोजा पडतो.

वांटपानंतर बापाचे देण्याबद्दल मुलाची जबाबदारी.

२०. वडिलोपार्जित मिळकतीचें वांटप झाल्यावर सदरप्रमाणें वांटप होण्यापूर्वी कलम १८ मध्यें दर्शविलेल्या प्रकारचें बापाचें जें देणें असेल तें देणें, वांटपाचे वेळीं आपल्या हिश्शास वडिलोपार्जित मिळकतीपैकीं जितका हिस्सा आला असेल त्या हिश्यांतून देण्यास मुलगा बांधला गेला आहे.

स्वार्जित मिळकतीवर बापाची सत्ता.

२१. (१) बापाला आपल्या स्वार्जित मिळकतीचें स्वत्वार्पण करण्याची आणि तिची वाटेल ती व्यवस्था करण्याची पूर्ण सत्ता आहे.

(२) परंतु आपलीं सज्ञान मुलें निराश्रित होतील अशा रीतीनें आपली मिळकत बक्षिसानें किंवा मृत्युपत्रानें बाप देऊं शकत नाहीं.